रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २४ डिसेंबर २०२३



# काँग्रेसच्या 'गुहेत' काळा पैसा ?

आधुनिक केसरी

**'अलिबाबा आणि चाळीस चोर' ही कथा ऐकत आलो आहोत! त्या गुहेत मौल्यवान हिरे, सोने दागिन्यांचा गुप्त खजीना पाहून आश्चर्यही वाटते! या कथेला साजेल अशी सत्य घटना भारतात झारखंड येथे घडली. काँग्रेसचे खा.धीरजप्रसाद साहू यांच्या गुहेत गुप्त खजीना आयकर विभागाला आढळून आला.यापूर्वी पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्याकडे धाडीत नोटांचा ढीग सापडला होता. देशातील राजकीय नेते उद्योजक, धनदांडगे कर चुकवितात, तो पैसा, दागिने बँकेत ऐवजी घरात, गोदामात, लपवून ठेवतात. मोदी सरकार त्यांचेवर धाडी टाकून हा काळापैसा बाहेर काढत आहे. तरीही विरोधी पक्ष मोदी सरकारला काळापैसा कोठे आहे? असा प्रश्न विचारत आहे, याचे आश्चर्य वाटते!**

महाराष्ट्रातील ज्येष्ठ काँग्रेस व गांधीवादी नेते बाळासाहेब भारदे यांनी २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस काल, आज, उद्या हे पुस्तक लिहिले. त्यावेळी भाजपाने पंतप्रधानपदाचे संभाव्य उमेदवार म्हणून नरेंद्र मोदी यांचा जोमाने प्रचार सुरु केला होता. त्यांनी त् पुस्तकात काँग्रेसबद्दल मत व्यक्त केले आहे. 'काँग्रेस धर्मकारणात सर्वधर्मसमभाव, राजकारणात लोकशाही, अर्थकारणात सहकारी व समाजवाद,समाज- कारणात रचनात्मक सेवाकार्य, विश्वकारणात पंचशील व क्रांतिकारणात सत्याग्रह या तत्वाच्या आधारे समाज परिवर्तनाचे उद्दीष्ट होते.तसेच पक्षाची पूर्वीची ध्येयवादी, नि:स्वार्थ, सेवाभावी, अशी जी परंपरा होती,ती आता खंडित होऊ लागली आहे.'असा स्पष्ट म्हंटले.काँग्रेसने या तत्वाला  तिलांजली दिली आहे. पक्षात गांधीवादी विचाराचे नेते राहिले नाहीत.मं गांधी विचारापेक्षा



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

सद्याच्या गांधी परिवार व त्यांचे हित महत्वाचे वाटते. त्यामुळे पक्षाचा ऱ्हास होत चाललेला आहे.या पक्षात भ्रष्टाचारी प्रवृत्ती वाढत चालली आहे.स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सत्तेत आल्यानंतर १९४८ पहिला जीप घोटाळा झाला. भारत सरकारने लंडनच्या कंपनीसोबत २ हजार जीपसाठी ८० लाख रू.चा करार केला. पण प्रत्यक्षात १५५ जीप प्राप्त आल्याच नाहीत. ब्रिटनचे तत्कालिन भारतीय उच्चायुक्त वी.के कृष्णमेननचा या घोटाळ्यात हात असल्याचे समोर आले. या घाटोळ्याची चौकशी १९५५ मध्ये बंद केली गेली. उलट तत्कालिन पंडित नेहरू यांनी मेनन यांचा मंत्रिमंडळात घेतले. या घोटाळ्यातील एक रुपयाही वसूल झालेला नाही. काँग्रेस सरकारने भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला. या पक्षाने भ्रष्टाचाराला जन्म दिला. त्यानंतर१९५१ मध्ये सायकल घोटाळा झाला.तर मारोती घोटाळ्यात तर माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी संजय गांधी यांना परवाना देण्यास मदत केली होती.१९७६ तेल घोटाळ्यात भारताला १३ कोटीचा चूना लावले गेला. त्यानंतर १९८७ पानडूब्बी घोटाळा तर १९८७ बोफार्स ,१९९२ हर्षद मेहता शेअर्स,१९९२ मध्ये १३ हजार कोटी रूपये, लालू प्रसाद यांचा घाटोळा,तसेच काँग्रेस सरकारने टू.जी.व कोळसा खाण लिलाव भ्रष्टाचाराचे प्रकरण चांगले गाजले होते. २०१४ मध्ये काँग्रेस सरकार भ्रष्टाचाराच्या कारणावरुन गेले.तरी पक्षाला याची लाज वाटत नाही. पंतप्रधान मोदी यांनी सरकार 'ना खाऊंगा ना खाणे देऊंगा'. ज्यांनी प भ्रष्टाचाराच्या मार्गाने लोकांचा पैसा लुटला, त्यांना तो पैसा ना पैसा परत करावा लागेल,अशी ग्यारंटी मोदींनी दिली आहे. देशातील भ्रष्ट राजकीय नेत्यांवर ईडी व सी.बी.आय. व आयकर विभाग धाडी टाकत आहे.आतापर्यंत ईडीने २१ राजकीय पक्षाच्या १२२ नेत्यावर कारवाई केली. विरोधी पक्षावर कारवाई प्रमाण ९५ टक्के आहे. केवळ विरोधी पक्ष नेत्यांकडे नोटांचे भांडार कसे काय सापडत आहेत? ईडीने कारवाई केली त्यात! काँग्रेस पक्षाचे २४,तृणमूल काँग्रेस १९,राष्ट्रवादी काँग्रेस- ११, बसपा-४ आर जे.डी.- ५,डी.एम.के- ६, शिवसेना-४ सपा-५ व टी. डी. पी-५, आम आदमी-४ बी जे.डी- ६ व भाजपा ६ नेते आहेत.देशात ईडीने २०१४ ते२०१९ मध्ये ३३ हजार ८६२२० लाख संपत्ती जप्त केली आहे. २०१९ ते २०२३ पर्यत ६९ ०५४.८९ कोटी सपत्ती जप्त केली. यात उद्योजक नीरव मोदी,विजय माल्यांचा समावेश आहे. आयकर विभागाने बेनामी कर बुडव्यावर मोठ्या प्रमाणात कारवाया करत आहे. सी. बी. आय. ने भ्रष्टाचाऱ्यांचा पर्दाफाश करत आहे. काँग्रेस सरकारने अशी कारवाई करण्याची हिंमत दाखवली का नाही? कारण 'कुंपण शेत खात असेल मग कारवाई तरी कोणावर करणार म्हणा! काँग्रेसचे सत्तर वर्षात दरोडे ७० टाकले. काँग्रेस पक्षाचे खा. धीरजप्रसाद साहू यांच्या गुहेत कोट्यवधी रुपये सापडतात,यावरुन सिध्द होते.'अरबी भाषेतील अलिबाबा आणि चाळीस चोर' लोककथा काँग्रेस पक्षाला शोभते! पक्षाच्या नेत्याच्या गुहेत कोट्यवधीचे छूपे धन सापडत आहे, हे नेते भ्रष्ट नाहीत काय? यांचेवर कारवाई केली जाऊ नये काय? जर देशातील घटनात्मक संस्था त्यांचेवर कारवाई असतील त्या विरोधात विरोधी पक्ष ओरड का करत आहे? देशात सामान्य माणसाच्या उत्पन्नाची मर्यादा सात लाख रुपये आहे. त्यापेक्षा अधिक वेतन असेल तर प्राध्यापक, शिक्षक,कर्मचाऱ्यांना

करप्रणालीनुसार आयकर भरावाच लागतो.आयकराचे विविध टप्पे आहेत.यात आयकर न भरणाऱ्याला ३३ टक्यापासून दोनशे पट्ट दंड व कर आकारला जातो. मग राजकीय पक्षाचे नेत्यांना उत्पन्नाची मर्यादा नाही काय? अनेक राष्ट्रात नागरिकाला दरवर्षी स्वत: उत्पन्न व त्याचे स्त्रोत्र लेखी स्वरूपात देणे बंधनकारक आहे, पण भारतात तसा कायदा नाही.सर्वात अधिक भ्रष्टाचार राजकीय क्षेत्रात आहे.कांही नेते विकास कामात गैरकारभार करुन कोट्यवधी रुपये कमवितात. इतकेच नव्हे, गरीब योजनांचा पैसा लुटूतात,हा पैसा तो गुप्त ठिकाणी ठेवला जातो. २०१८ मध्ये प्रकाशित झालेला 'रेड' चित्रपट काँग्रेस नेत्यांच्या घरावर धाडीचा आहे. त्या नेत्याकडे प्रचंड पैसा सापडतो तो मोजण्यासाठी मोठा वजनकाटा आणला जातो. तो नेता आपल्या घरावरील धाड थांबवावी, यासाठी श्रीमती इंदिरा गांधीकडे जातो व हस्तक्षेप करावा, अशी विनंती करतो. झारखंड काँग्रेस खासदार साहू यांचे गुहेत साडे- ३५१ कोटीची रक्कम सापडली आहे.तेव्हा काँग्रेस पक्ष आमचा संबंध नाही,असे म्हणून हात झटकत आहे. वास्तविक भ्रष्ट साहू नेता काँग्रेसची राजकीय देण आहे. पण म.गांधी विचाराच्या पक्षाने या दारू व्यवसाय करणाऱ्या या साहूला तीन वेळेस राज्यसभेवर घेतले गेले?.साहू हे झारखंड राज्यातील लोहरगावचे आहेत. त्यांचा केवळ दारूचा अनेक वर्षापासून व्यवसाय आहे. त्यांची यातून महिन्याला शंभर कोटीची कमाई आहे. या गावात महात्मा गांधी रस्त्याच्या बाजूला दारूची भट्टी आहे,त्या  रस्त्याला 'भट्टी गल्ली' असे म्हंटले जाते. यांची संपत्ती मोठ्या प्रमाणात आहे.त्याचा तेथे पांढरा




अलिशान ( व्हाईट हाऊस) बंगला आहे.पण ते राहत नाहीत. त्यांचे कुटुंब ऐष करण्यासाठी येथे जात असतो या नेत्याने गावात तलाव,मंदिर स्टेडीयम,उभारले आहेत. तो समाजसेवक म्हणून वावरतो. दरोडेखोरांने रात्री दरोडे टाकायचे आणि दिवसा पुण्य व दानधर्म म्हणून गरिबाला मदत करत!असेल तर त्याला समाजसेवक म्हणायचे काय ?याच प्रवृत्तीने काँग्रेसने देशाला लुटलेले आहे. या साहूने काँग्रेसला व नेत्यांना किती पैसा दिला? याची चौकशी केली पाहिजे. गांधी यांच्या 'भारत जोडो'चा खर्च साहू यांनी केल्याची माहीती आहे. साहू बेशरमपणे खुलासा करत आहेत! हा माझा दारूच्या कमाईचा पैसा आहे.त्याचा माझ्याकडे हिशोब आहे,मग त्यांनी हा पैसा बँकेत का ठेवला नाही तो लपवून का ठेवला? काँग्रेसने त्यांना भ्रष्ट नेत्याला पक्षातून काढले नाही. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांच्या भ्रष्टाचाराच्या सुरस व सत्य घटना अनेक आहेत. पश्चिम बंगाल मध्ये२०१८ तत्कालीन शिक्षणमंत्री यांचे अर्पिता मुखर्जीकडे नोंटांचा ढीग सापडला.आम आदमी पक्षाचे दोन मंत्री भ्रष्टाचारात जेलमध्ये आहेत. लालूप्रसादने नोकरीच्या बदल्यात जमीन घेतल्याच्या प्रकरणाची चौकशी चालू आहे.उत्तर प्रदेशच्या धाडीत बाराशे कोटी रुपायांचा काळापैसा तर राजस्थानमध्ये एका छाप्यात तीनशे कोटीच्यावर पैसा सापडला.वीजचे वस्तु तयार करणाऱ्या कंपनीकडे बेहिशोबी मालमत्ता आढळली. २०२१ मध्ये २१-३२ लाख करदात्यांना ४५ हजार ८९६ कोटी रुपये परतावा रक्कम देण्यात आली आहे.तरी आयकर भरणाऱ्यांची संख्या कमी आहे.महाराष्ट्रात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रसने नेत्यांनी सहकार क्षेत्र लुटून खाल्ले!सहकार संस्था,साखर कारखाने,सहकारी बँका भंडाऱ्याचा प्रसाद म्हणून सर्वांनी खाल्ला. नागपूर सहकारी बँकेतील दीडशे कोटीच्या भ्रष्टाचार प्रकरणी काँग्रेस नेत्याला दोषी ठरविले आहे. आज भ्रष्टाचारात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे.

नांदेड शहराच्या परिसरात डॉक्टर व व्यापारी व राजकीय नेत्यांनी जमीनी घेतल्या आहेत,या जमिनीत लाखो रुपायांचे उत्पन्न झाल्याचे दाखविले जाते. म्हणजे, ही मंडळी काळापैसा पांढरा करतात! अनेक सिमेंट लोखंड, व्यापारी पावत्या  देत नाहीत.ते उद्योजक, व्यापारी, डॉक्टर वार्षिक उलाढाल कमी दाखवितात.अनेक व्यापारी चेक, डी.डी. ऑनलाईन पैसे  घेत नाहीत.ते ''रोकडा' म्हणजे नगदी पैसे मागतात. 'इंडी' आघाडीतील प्रत्येक पक्ष घराणेशाही व भ्रष्टाचारात गुंतलेला आहे. काँग्रेसचा इतिहास पहाता,श्रीमती इंदिरा गांधी यांना तर निवडणुकीत भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंब केला प्रकरणात त्यांची निवड रद्द केली गेली.त् सद्याचे गांधी परिवार भ्रष्टाचार प्रकरणात जामीनावर आहे. नुकतेच, या गांधी परिवाराची नॅशनल हेराल्ड प्रकरणात ७५२ कोटीची संपत्ती जप्त केली गेली.मोदी सरकारने नोटांची छपाई बंद करून डिझिटल पध्दतीने आर्थिक व्यवहार करण्याचे बंधन घालावे. किमान वेतना इतकी रक्कम व्यवहारास परवानगी द्यावी, असे केले तरच नोटांची साठवण करणे बंद होईल.यातून देशातअर्थिक क्रांती होईल.

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्यामुळे प्रवासात बाटलीबंद पाणीच प्यायलो. आयुष्यात बाटलीला हात लावला असेल तर तो पाण्यासाठीच ! असो. पण व्हायचे ते झाले. सर्दी, ताप वगैरेंनी त्रस्त होऊन शेवटी डॉक्टरांना शरण गेलो. त्या डॉक्टरांनी गोळ्या औषधे तर दिलीच पण जो काही सल्ला दिला तो फार आवडला. ते म्हणाले, ' दिवसातून चार पाच वेळा थोडे थोडे खात जा . ( आपल्या भाषेत ' चरत जा ' ) म्हणजे पोट व्यवस्थित भरेल. आणि तब्येतीच्या तक्रारी राहणार नाहीत. ' बरं ज्यांनी हा सल्ला दिला ते डॉक्टर पुण्याचे आणि अनुभवी. त्यामुळे त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष थोडेच करता येणार ? तरी त्यांना मी भीत भीतच माझ्या मनातील शंका विचारली. ' डॉक्टर, पण ते दीक्षित तर दोनपेक्षा जास्त वेळा खाऊ नका म्हणतात. ' यावर डॉक्टर फक्त हसले. ( बहुधा मनातल्या मनात असं म्हणत असतील की काय मूर्ख माणूस आहे हा ! मी सांगतो यावर याचा विश्वास दिसत नाही. ) मग ते म्हणाले,' अहो, सर्वांसाठी तसं आवश्यक नाही. तुम्ही त्याचा विचार करू नका. मग काय पुन्हा ' चरैवती चरैवती ' आठवलं.

खरं तर चरैवती चरैवती म्हणजे चालत राहा. चालणं आरोग्यासाठी खूप महत्वाचं आहे. आम्ही ते दोन्ही अर्थानं घेतलं इतकंच. आता बघू या. डॉक्टरांचा सल्ला पाळतो आहे. त्याप्रमाणे चालत राहू.केवळ दोन वर्षांचा असलेला प्रणाद त्याच्या आईवडिलांसोबत एका पुस्तक महोत्सवात गेला. तेथील एका स्टॉलवर असणारे आकर्षक छोटे पुस्तक पाहून हे पुस्तक मला पाहिजेच म्हणून त्याने हट्ट धरला आणि मग त्याच्या आईबाबांना ते पुस्तक घ्यावेच लागले. त्या लहानग्याला वाचता येत नव्हते पण पुस्तकातील रंगीबेरंगी चित्रांनी त्याला आकर्षित केले. माझ्या मते हा पुस्तकाचा सगळ्यात छोटा ग्राहक असावा आणि हेच पुणे येथे भरलेल्या पुस्तक महोत्सवाचे वेगळेपण आहे असे मला वाटते. आपल्या मुलांना अनेक ठिकाणे दाखवण्यासाठी आपण घेऊन जातो पण पालकांनी आपल्या मुलांना घेऊन या पुस्तक महोत्सवाला जरूर जावे असे मला वाटते आणि अनेक सुज्ञ पालक तसा लाभ आपल्या मुलांना मिळवून देत आहेत. आजच्या मोबाईलची क्रेझ असलेल्या जमान्यात आपल्या मुलांवर जर वाचनसंस्कार करायचा असेल तर असे हे पुस्तक महोत्सव त्यांना दाखवायलाच हवे.



# आनंदी पहाट

## निसर्गाशी नाते जोडावे

आधुनिक केसरी

दिवसभर विश्रांती घेतल्याने तणाव कमी होण्यास, तणाव कमी करण्यास किंवा चिंता कमी करण्यास मदत होऊ शकते. पण आपण अनेकदा कामामधून ब्रेक, थोडीसुद्धा विश्रांती घेत नाही.
तुमचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी १० मिनिटेही पुरेशी आहेत. आज १० मिनिटे वेळ काढून स्वतःसाठी काहीतरी करणे गरजेचे असते. अर्थपूर्ण नातेसंबंधांमुळे आपुलकीची भावना निर्माण होऊ शकते. काळजी घेणे, मूल्यवान आणि समर्थित असल्याची भावना आपल्याला अधिक लवचिक बनण्यास मदत करू शकते. यालाच सामाजिक संबंध म्हणतात. इतरांशी संपर्क साधणे आपल्याला तणावाचा सामना करण्यास आणि अधिक लवचिक बनण्यास मदत करू शकते. तुमचा समुदाय, कुटुंबातील सदस्य किंवा मित्रांपर्यंत पोहचणे त्यांच्याशी संपर्कात राहणे आवश्यक असते. तुमच्या भावना किंवा कोणत्याही चिंतांबद्दल तुमचा विश्वास असलेल्या एखाद्या व्यक्तीशी बोलावे. सांस्कृतिक, आध्यात्मिक किंवा धार्मिक कार्यांसाठी थोडातरी वेळ काढावा. तुम्हाला स्वारस्य असलेल्या संस्थांसह स्वयंसेवक म्हणून योगदान द्यावे. ह्या योगदानातून इतरांना परत देणे तुम्हालाही मदत करू शकते. इतरांसह घराबाहेर पडा, निसर्गाशी संपर्क साधा आणि हिरवीगार जागा शोधून निसर्गाच्या सानिध्यात राहून वेळ आनंदी बनवावा. शारीरिकदृष्ट्या निरोगी राहिल्याने तुमचे भावनिक आरोग्य सुधारू शकते. फळे आणि भाज्या, पातळ प्रथिने, सर्व प्रकारची कडधान्य आणि कमी किंवा चरबी नसलेले दुग्धजन्य पदार्थ घ्यावेत. अस्वास्थ्यकर चरबी, मीठ आणि साखर असलेले पदार्थ मर्यादित खावेत. दररोज रात्री लवकर झोपायला जावे आणि सकाळी लवकरात लवकर त्याच वेळी जागे व्हावे, जेणेकरून तुम्हाला चांगली झोप लागेल. प्रौढांना प्रति रात्र ७ किंवा अधिक तास झोपेसाठी आवश्यक असतात. प्रत्येक लहान शारीरिक क्रियाकलाप शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्या देखील मदत करते. सुरुवातील अल्पकालावधीचा प्रारंभ करावा आणि आठवड्यातून त्याचे प्रमाण तसेच वेळ वाढवत जावी.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# कळी...

आधुनिक केसरी

कळीचं सुंदर रूप म्हणजे उमरलेले फुल. झाडाला कळी लागली की आपण त्या कळीचे फुल होण्याचं वाट बघत असतो. जेव्हा पूर्ण फुल उमलतं तेव्हा आपल्या ला खूप आनंद होतो. आणि आपण ते फुल देवाला वाहण्यासाठी तोडतो. आपल्या मनात ती एकच इच्छा असते कळी उमरल्यानंतर ते सुंदर फुल प्रथम देवाला वाहायचे. मग गर्भातल्या कळीला ती उमलण्याआधीच का खुडतात ? ती उमलु का देत नाही? तिचं आपलं जग पाहण्याआधीच तिची हत्या का करतात ? किती वेदना होत असतील आई आणि लेकीला ? झाडाची साल ओरबडावी तशी आईच्या पोटातून ,गर्भातून ती कळी ओरबाडली जाते. दोन्ही जीवांना अतोनात वेदना होतात. ज्यांना खरंच माणसाचं काळीज असेल ती लोक ही पाप करत नसतील. जी पाषाण हृदयी लोक असतात तेच एका कोमल कळीची हत्या करू शकतात. जरा मेंदूचा भुगा करून विचार केला तर ह्या पापी लोकांना लक्षात येईल की कळीची निर्मिती किती अवघड असते? भाग्यवान आईच्या गर्भात तिची निर्मिती होत असते .आणि अगदी सहज तिची हत्या हे लोक करतात .परंतु आईने बंड पुकारले पाहिजे. मी माझ्या बाळाची हत्या करणार नाही. तरच या हत्यारांना आळा बसेल. आईला एवढ्या वेदना होतात मग ती का करते हे पाप? का करते स्वतःच्याच बाळाची हत्या? कुठेतरी हे विघातक कृत्य थांबवायला हवं .त्यासाठी आईचे सहकार्य खूप मोलाचे आहे. सुंदर, नाजूक, गोड, गोजिऱ्या कळीला ही जग पाहू द्या. निर्बुद्ध माणसांनो तिची हत्या करू नका. ती जगाची निर्माती आहे. तिच्याशिवाय सर्व विश्व अपूर्ण आहे. " ती तीच आहे". तिच्यामुळे आज आपण या जगात आहोत....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.29

# बुड बुड घागरी

आधुनिक केसरी




एकदा एका जंगलात उंदीर जातो. तिथे त्याला एक माकड आणि मांजर भेटले. त्या तिघांची चांगली मैत्री जमली. एक दिवस त्या तिघा मित्रांनी खीर करण्याचे ठरविले. माकड म्हणाले 'मी साखर आणतो'. मांजर म्हणाले 'मी दूध आणतो'. उंदीर म्हणाला 'मी शेवया आणतो'. तिघांनी पातेलेभर खीर केली. मग माकड म्हणाले 'चला आपण आंघोळ करून येऊ आणि मगच खीर खाऊ'. इकडे मांजराच्या तोंडाला पाणी सुटले होते. ते अर्ध्या वाटेतूनच परत आले. त्याने सगळी खीर खाऊन टाकली. थोडया वेळाने माकड व उंदीर आले. पहातात तो काय, खिरीचे पातेले रिकामे! त्यांनी मांजराला विचारले 'खीर कोणी खाल्ली ?' मांजर म्हणाले, 'मला नाही माहीत.' मग माकडाने एक घागर घेतली व सर्वजण नदीवर गेले. माकडाने घागर पाण्यात पालथी घातली. त्यावर उभे राहून माकड म्हणाले ' हुप हुप करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड बुड घागरी'. पण घागर काही बुडाली नाही.
मग उंदीर घागरीवर उभा राहिला व म्हणाला 'चूं चूं करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड बुड घागरी'. पण घागर काही बुडाली नाही. आता मांजराची पाळी आली. मांजर खरे तर घाबरले होते. कसेबसे ते घागरीवर उभे राहिले व म्हणाले ' म्यांव म्यांव करी, वरचे डोंगरी, मी खीर खाल्ली तर बुड बुड घागरी'. अन काय आश्चर्य, घागर पाण्यात बुडाली. चोरून खीर खाल्ल्याची मांजराला शिक्षा मिळाली.


# निरुपण

आधुनिक केसरी

ऐसी लोकलाज होईल ।वडिलांचें नांव जाईल ।
आतां रुण कोण देईल ।लग्नापुरतें ॥९॥
मागें रुण ज्याचें घेतलें ।त्याचें परतोन नाहीं दिल्हें ।
ऐसें आभाळ कोंसळलें ।उद्वेगाचें ॥१०॥
आपण खातों अन्नासी ।अन्न खातें आपणासीं ।
सर्वकाळ मानसीं ।चिंतातुर ॥११॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्गुरु वचन अपूर्व है, भव दुख टारनिहार । ग्रहण करहु विश्वास तें, धोखा और अपार ।।११०।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/११०
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : सद्गुरूंचे वचन (वाक्य) उपदेश अति मूल्यवान तथा महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या द्वारे सांसारिक त्रयतापांचा विनाश होतो आणि साधक-शिष्य-भक्त सर्व प्रकारांनी सुखी होतात. म्हणून सद्गुरूंचा आदेश आणि उपदेश श्रद्धा विश्वास पूर्वक ग्रहण करणे सर्व मुमुक्षु साधकांसाठी आवश्यक आहे. याच्या विपरीत आचरणाने अपार क्षति आणि मानव जीवन व्यर्थ व्यतीत होणे ध्रुव निश्चित आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

# आशंकानिरूपण

आधुनिक केसरी

पण---परब्रम्ह हे एकच असे आहे की ते अतिंद्रीय आहे. तिथे बुध्दीला, वाणीला, इंद्रियांना प्रवेश नाही. आपण जे ब्रम्ह म्हणतो त्यांचें साम्राज्य अनन्य किंवा अद्वैताचे, तर बुध्दीचे साम्राज्य वेगळे पणाचे किंवा द्वैताचे असते. परब्रम्हाला तो अमुकतमुक आहे असं आपणं सांगू शकत नाही. त्यामुळे आपण त्याला उपमा देवू शकत नाही. त्याला कशाचीच अपेक्षा नाही. किंवा त्याला तुलना पण आवडत नाही. परब्रम्हास प्राणिमात्रांचा संसर्ग नाही.त्याला कशाचीही अपेक्षा नाही. तो निःसंग, निर्मळ आहे त्याच्या ठिकाणी भाषेचा प्रकार नाही.कोणताही दोष नाही. रूप नाही रंग नाही.ते हात लावून आपण दाखवू शकत नाही.की बाबा रे तुला परब्रह्म सच्चिदानंद सदगुरू म्हणून, म्हणतो ते हेच आहे. असे आपण दाखवू शकत नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# मला जनप्रियत्व फार आवडते

आधुनिक केसरी

इथून जाणाऱ्या मंडळींना निरोप देताना मला खरोखरच फार वाईट वाटते. पुन्हा आपली भेट होईल की नाही ते काही सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी अत्यंत प्रेमाने वागा. प्रेमाने जग जिंकता येते. तुम्ही माझ्यापासून जनप्रियत्व शिका. मला जनप्रियत्व फार आवडते. कारण जो लोकांना आवडतो, तोच भगवंताला आवडतो. जो निःस्वार्थी असेल त्यालाच जनप्रियत्व येईल. जो भगवंताच्या इच्छेने वागेल त्यालाच जनप्रियत्व येईल. आपण आपल्यासाठी जे करतो ते सगळ्यांसाठी करणे, हे भगवंताला आवडते. आपण आपल्यापुरते न पाहता सर्व ठिकाणी भगवंत आहे असे पहावे. प्रत्येकाला आपण हवेसे वाटले पाहिजे. असे वाटण्यासाठी लोकांच्या मनासारखेच वागले पाहिजे किंवा त्यांना आवडेल तेच बोलले पाहिजे असे नाही. प्रेम करायला कशाचीही जरूरी लागत नाही; पैसा तर बिलकूल लागत नाही, हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. जगात कुणी कधी भोगली नसेल एवढी गरिबी मी भोगली आहे. अशा गरिबीमध्ये राहूनही माझे अनुसंधान टिकले, मग तुम्हाला ते टिकवायला काय हरकत असावी ? मी जर काही केले असेल तर मी कधीही कुणाचे अंतःकरण दुखवले नाही. तेवढे तुम्ही सांभाळा. जो जो कोणी मला भेटला, तो तो मी आपलाच मानला. मी नुसता खेळ मांडला आणि तो खेळलो; त्यामुळे त्याचे सुखदुःख मला कधी बाधले नाही. नाम घ्यायची इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून मी पुन्हा जन्मास आलो. मला तुम्ही सगळे रामरूप दिसत आहात. मला जे सांगायचे असेल ते मारुतीरायाला सांगावे म्हणजे ते मला कळते. माझा मनुष्य कुठेही असला तरी तो माझ्याकडेच येणार. मला दुश्चित्तपणा अगदी आवडत नाही. ज्यांनी माझी निंदा केली त्यांना तर मी कोण हे कळले नाहीच; पण ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना मी कोण आहे हे त्याहून कळले नाही. प्रत्येकाला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे, मी मात्र वागायचा तसाच वागेन; हे कसे शक्य आहे ? नाम घेतल्याने आपले सर्व अवगुण आपल्यालाच कळून येतील याबद्दल खात्री बाळगा आणि अंतःकरणपूर्वक नाम घ्या. एक भगवंताचे नाम घट्ट धरावे, त्यामधे अती उत्कटता ठेवून एकतानता करावी आणि स्वतःला पूर्ण विसरून जावे. 'मी नाम घेतो' हे देखील विसरून जावे. हाच खरा परमार्थ होय. नामामधे एकतानता होण्यासाठी भगवंताच्या साक्षित्वाने वागा; हवे-नकोपण टाकून द्या; राम कर्ता ही भावना ठेवा; विषय मालकीने भोगा; आपला गुण भगवंताकडे लावा; लहान मूल होऊन देवाकडे जा; रामाला आपले सुखदुःख सांगा; देहभोगाला कंटाळू नका; काळजी 'घ्या' पण काळजी 'करू' नका आणि निर्भय बना आणि अशा रीतीने जिवंतपणी आपले मरण पहा.



# जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

ज्याला बाबाजी समजले त्यांच्या साठी बाबाजी प्रत्येक ठिकाणी जळी,स्थळी,काष्ठी ,पाषाणी त्यांच्या जवळच आहे. श्री संत जनार्दन स्वामींनी शेवटी समाजाला संदेश दिला " चला उठा कामाला लागा ! सतत उद्योग करा." मौनगिरी महाराज मराठवाड्यात एका साध्या खेड्यात शेतकरी कुटुंबात शके १८३६ दि.२४.९.१९१४ वार गुरवार, नक्षत्र अनुराधा, तिथी ललिता पंचमी, या महान पर्वकाळी पूज्य बाबाजी अवतरित झाले. जनार्दन स्वामी महाराज यांचे आजोळ "टापरगाव". आयुष्यभर बाबाजींनी शिव भक्तीचा प्रचार आणि प्रसार केला. १६ वर्ष कठोर तपसाधना केली त्यानंतर पिंडीमधून ३ वेळेस भगवान शिवाचे दर्शन झाले. श्री बाबाजी लहानपानापासून विरक्त, अनासक्त, वैराग्यशील, जनकल्याणाचा वारसा घेतलेले. बाबाजींनी सुरूकेलीली परंपरा – जप, तप, अनुष्ठान, यज्ञ, पारायण आणि नित्य नियम विधी.

रविवार, २४ डिसेंबर २०२३
⦿ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⦿ मराठी ⦿ दैनिक
⦿ वर्ष - ०३ ⦿ अंक - १३२
⦿ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 24 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-132 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-05

# २० जानेवारीला मुंबईत आमरण उपोषण

## मनोज जरांगे पाटील : बीडमध्ये 'निर्णायक इशारा सभा'

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : आज मराठ्यांच्या एकजुटीचा महाप्रलय जमला असून मराठा आरक्षण आता कसे आणायचे ते बघाच, मराठा आरक्षण मिळवणारच. मराठा समाज आतापर्यंत शांत आहे, पण सरकारने झोपू नये. ते येवल्याचे येडपट माझी शाळा काढते, याला मंत्री कुणी केला? असा सवाल करत जरांगे यांनी राज्याचे मंत्री छगन भुजबळांवर तुफान हल्ला केला. मुंबईत २० जानेवारीला आमरण उपोषण करणार. मराठ्यांवर दबाव टाकणे सोप्पे नाही, असा इशाराही जरांगे-पाटलांनी सरकारला दिला आहे.**

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, मराठा समाजाला डाग लावण्यात आला आहे, कुणी म्हणते आमची घरे जाळली, तर कुणी म्हटले हॉटेल जाळली. आपल्यावर खोटे आरोप करण्यात आले. मराठा समाजाने आतापर्यंत शांततेत मोर्चे काढले, तो समाज कुणाची घरे कशाला पेटवेल? यांच्याच लोकांनी हॉटेले जाळली आणि नाव मराठा समाजावर घातले. सरकारही यांचेच ऐकते. पण आता मराठा समाज जागा झाला आहे. त्यामुळे मराठा आरक्षण कसें आणायचे ते बघाच.



राज्य सरकारला इशारा देताना जरांगे म्हणाले की, सरकारने शहाणपणाची भूमिका घ्यावी. त्या एकट्याचे ऐकून जर तुम्ही आमच्या विरोधात भूमिका घेणार असाल, आरक्षणामध्ये आडकाठी करणार असाल तर शहाणे व्हा. मराठा समाजाला ताटकळत ठेऊ नका. नाहीतर शांततेत तुमचा सुफडा साफ केला जाईल. तुमचे राजकीय अस्तित्व संपवले जाईल. तुम्ही ठरल्याप्रमाणे मराठा समाजाला आरक्षण द्या, नाहीतर पुढचं आंदोलन तुम्हाला 100 टक्के जड जाणार. मी यांना मॅनेज होत नाही हाच यांचा प्रॉब्लेम आहे. मी जिवंत असेपर्यंत मराठा आरक्षण मिळवून देणारच. मराठा समाज आणि माझे नाते हे माय-लेकाचे आहे. मराठा समाजाच्या पुढच्या पीढीला आरक्षण मिळवून देणार. या आधीच्या पीढीचे आयुष्य आरक्षणाविना उद्ध्वस्त झाले. आता मराठा जागा झाला आहे. देव जरी आडवा आला तरी मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळणार, आपण तेच घेणार असे मनोज जरांगे म्हणाले. मराठ्यांनी यांनी मोठे करायचे आणि मराठ्यांचे मुडदे पडत असताना यांनी त्याकडे पाहायचे नाही, आता तसे करायचे नाही. सरकार गांभिर्याने घेत नाही, पण आता त्यांना वठणीवर आणण्याची ताकद मराठ्यांमध्ये आहे, असे मनोज जरांगे म्हणाले. मराठ्यांची मते घेऊन त्या भुजबळासारख्यांना मोठे केले जाते. आमच्या जीवावर मोठे व्हायचे आणि आमचे पडणारे मुडदे बघत बसता.

**त्रुटी दूर करण्याचे काम वकिलांची फौज करेल :**
आताच सुप्रीम कोर्टाचा निर्णय झालाय, क्युरेटिव्ह पिटीशन 24 जानेवारीला कोर्ट ऐकणार आहे . ही याचिका फेटाळेल असे म्हटले जायचे . पण सुप्रीम कोर्ट हे ऐकणार आहे, त्यामुळे मराठा समाजासाठी मोठा दिलासा आहे . 24 जानेवारीला वकिलांची तज्ज्ञ फौज बाजू मांडेल, मराठा समाज मागास कसा आहे हे सांगेल, परिस्थिती सांगेल . सुप्रीम कोर्टाने ज्या त्रुटी मांडल्या होत्या, त्या दूर करण्याचे काम वकिलांची फौज करेल . मला वाटतं मराठा सामाजाला न्याय मिळेल असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले .

# ध्येयवेड्या योगेशची सफर! सत्तावीस देशांची भ्रमंती केली दुचाकीवर !!

आधुनिक केसरी न्यूज

**सदानंद माळी**

**कडेगाव :** दुचाकी खरं तर सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय मग ती पहिल्यादां धडपडत चालवलेली दुचाकी असो किंवा एकदम सुसाट आपल्या मित्र-मैत्रिणी समोर शायनिंग मारायला चालवलेली दुचाकी असो .दुचाकी ही लहान मुलांपासून मोठ्या माणसापर्यंत सर्वांच्या आवडीची अशाच दुचाकी वरुन योगेश आलेकरीला जग फिरण्याचे स्वप्न होते. पण या दुचाकीवरून 27 देशाचा 29 हजार किलोमीटरचा प्रवास सुद्धा करावा असं सहसा कुणाला वाटणार नाही अशी कल्पनाही शक्यतो आपण करू शकत नाही पण म्हणतात ना उम्मीद से ज्यादा सोचेंगे तो उसे दुगुता पाओगे तसं काहीच करांडेवाडी( ता. कडेगाव )येथील योगेश आलेकरीने जगभ्रमंती दुचाकीवरून करायचीच हे ठरवले .मुंबई ते लंडन असा प्रवास दुचाकीवरून करण्याचे ठरवले आत्ताचा तरुण मोबाईलच्या विळख्याच्या धुंदीत अडकल्याने रात्रीचा दिवस किंवा दिवसाची रात्र कशी होते हेच समजत नाही . पण योगेशने मुंबई ते लंडन वारीची सर्वतोपरी तयारी केली ऐन तारुण्यात सर्वात कमी दिवसात दुचाकीवरून जगाची सफर करण्याचा मान त्यांने पटकावत 27 देशाचा तब्बल 29000 KM चा प्रवास त्याने 129 दिवसात पार केला आहे. मुंबई ते लंडन वारीकरीता चार ते



पाच वर्षापासून सर्वतोपरी तयारी केली . तशी आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याला हे धाडस काहीसे वेगळे वाटत होते. पण त्यातूनही त्याने मार्ग काढण्याचे ठरवले आणि तयारी पूर्ण केली. वेगवेगळ्या देशाचे पासपोर्ट गाडीचे पासिंग तसेच ज्या ज्या देशात जायचे आहे त्या त्या देशातील आर्थिक चलन ट्रान्सफर असे अनेक कागदपत्रांची जुळवा जुळव केली. यासाठी त्याला भरपूर त्रास झाला. पण थांबेल तो योगेश कसला. त्याने जिद्द व मनाशी बांधलेली खून गाठ या जोरावरती सगळी कागदपत्रे पूर्ण केली. व एक बाईक एक रायडर असा प्रवास करण्याचा निश्चय करून तो प्रवासास निघाला. ५ ऑगस्ट रोजी त्याच्या खऱ्या प्रवासाला सुरुवात झाली. 'वसुदेव कुटुंबकम'चा जगाला संदेश देण्यासाठी तो मुंबईहून निघाला. आशिया आणि युरोप खंडातील २७ देश फिरण्याचा त्याचा निर्धार होता. या प्रवासा दरम्यान इराण, तुर्कीस्तान, ग्रीक अशा देशातील मोठ मोठी शहरे तसेच ग्रामीण भागातून आपल्या दुचाकीला भारताची शान तिरंगा झेंडा लावून तो चाललेला असताना त्याचे ठीक ठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले असे योगेशने सांगितले. यावेळी तुर्कीतील इस्तंबूल या ऐतिहासिक शहरात रोटरी क्लब ने विशेष असे स्वागत केले ते अविस्मरणीय स्वागत न विसरण्याजोगे आहे. असेही योगेश बोलला. तुर्कीच्या राजधानीत भारताचे राजदूत डॉ. एस. पोल. यांनी अतिशय उत्साहात स्वागत केले व प्रवासात योगेशला शुभेच्छापत्र दिले. यावेळी 'वसुदेव कुटुंबकम' संदेशाबद्दल राजदूतांना विशेष कौतुक वाटले. त्यानंतर तुर्कीच्या देशातून बाहेर पडून ग्रीकांच्या ग्रीस देशात योगेश ने प्रवेश केला. व अथेन्स या ऐतिहासिक शहरात दोन दिवस वास्तव्यास होता. लहानपणापासूनच शाळेत ग्रीक संस्कृती, अथेन्सबद्दल शिकलेला इतिहास 'याची देहा याची डोळा' पाहतोय अशी ही योगेशने प्रतिक्रिया व्यक्त केली. असाच दुचाकीवरून प्रवास सुरू असताना योगेशने काळा समुद्र, मारमारा समुद्र तशेच भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाच्या समुद्रकिनारी दुचाकी प्रवास करून आलेकरी याने तेथील संस्कृतीची माहिती घेतली. प्रवासादरम्यान योगेशला वेगवेगळ्या देशातील भाषांचीअडचण अनेकदा आली. यावेळी त्याला दुभाषकांची भरपूर मदत झाली असे योगेशने सांगितले. इराणमध्ये त्याला इरफान फदोसी या व्यक्तीने खूप मदत केली. एका ठिकाणी इराणी पैसे संपले आणि डॉलर स्वीकारले जात नव्हते अशावेळी या व्यक्तीने दूभाष्य करीत मोठ्या भावाप्रमाणे योगेशला रात्रीच्या अकरा वाजता आपल्या खात्यातून समोरच्या व्यक्तीला पैसे पाठवून योगेशला मदत केली. असे वेगवेगळे प्रवासादरम्यानचे किस्से योगेश यावेळी सांगत होता. यावेळी वेगवेगळ्या ठिकाणी अनेक ओळखी झाल्याचे तो सांगत होता. तुर्की ग्रीस इराण अशा वेगवेगळ्या देशांच्या खाद्य संस्कृतीचा मनसोक्त आस्वाद घेतल्याचेही तो सांगत होता. योगेश आलेकरी चा प्रवास इराणसह जाणंझिया, तुर्की, ग्रीस, बल्गेरिया, सबिया, मोटेनिग्रो, बोस्निया, क्रोसिया, हंगेरी, ऑस्ट्रेया,लेविस्टन, डोज, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, फ्रान्स, लगझमबर्ग, बेल्जियम, इंग्लंड, स्कॉटलंड, नेदरलँड, नेपाळ असे अनेक देश फिरून पुन्हा भारतात आलेला हा अवलिया आपल्या देशाचा एक स्वाभिमान अस म्हणावा लागेल. योगेश आलेकरी याने हा प्रवास १२९ दिवसात पूर्ण केला. यामध्ये त्याने २७ देश, २ खंड व २९,००० किलोमीटरचा प्रवास एकट्यानेच दोन चाकी वरून न थकता पूर्ण केला इच्छा शक्तीच्या बळावर आपण कोणतेही ध्येय साध्य करु शकतो. हे योगेश आलेकरी तरुणाने दुचाकी वरुन जगभ्रमंतीची सफर यशस्वी करुन दाखवले आहे.

# ...आणि चंद्रपुरातील भिंती बोलू लागल्या

## महानगरपालिकेच्या वतीने भित्तीचित्र महोत्सव महोत्सव स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

शाम हेडाऊ

चंद्रपूर : महानगरपालिकेच्या वतीने सध्या चंद्रपूर मध्ये भव्य स्वरूपात भिंती चित्र महोत्सव स्पर्धेच आयोजन करण्यात आलेल आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातून तब्बल 264 कलावंत चंद्रपूर मधील या महोत्सवात सहभागी झालेले आहेत. चंद्रपूर मधील मुख्य मार्गावर असलेल्या काही भिंती , जिल्हा क्रीडा संकुलाच्या परिसरातील भिंती आणि काही आजूबाजूच्या परिसरातील भिंती सुद्धा रंगविण्याचे काम या स्पर्धेच्या अनुषंगाने होते आहे .या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या महाराष्ट्रातील तमाम कलावंतांना मोठ्या रकमेच्या बक्षीसांची लयलूट सुद्धा महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेली आहे.

स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेने या उपक्रमाला हाती घेतले असून या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातून 264 कलावंतांना या ठिकाणी आपली कलाकृती साकारण्याची संधी मिळालेली आहे. या सर्व 264 कलावंतांना प्रत्येकी चार दिवस देण्यात आलेले होते या चार दिवसांमध्ये त्यांना जे स्थळ दिलेलं होतं त्या त्या ठिकाणी त्यांच्या भिंती रंगवावयाच्या होत्या. आपली कलाकृती आपल कौशल्य त्यांना त्या चित्राच्या माध्यमातून स्पष्ट करता येत होते. आणि कलावंतांनी या संधीचं सोनं केलं. महानगरपालिकेच्या वतीने राज्यभरातून आलेल्या 264 कलावंतांच्या निवासाची व्यवस्था व त्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली होती. एकूणच संपूर्ण चंद्रपूर आता नव्याने सुंदर दिसायला लागले आहे. आणि याची चर्चा चंद्रपूर मध्येही होत आहे .चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर विपीन पालीवाल यांनी हाती घेतलेल्या या उपक्रमाचे संपूर्ण चंद्रपूर मध्ये कौतुक होत आहे. महानगरपालिका आयुक्त आणि त्यांची संपूर्ण चमू ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी



अविश्रांत मेहनत घेत असून राज्यभातून आलेल्या कलावंतांना त्रास होणार नाही याची काळजी घेत आहेत. योगायोगाने यावर्षी होणाऱ्या 67 वी राष्ट्रीय शालेय मैदानी स्पर्धा चंद्रपूरमध्ये होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा तालुक्यातील विसापूर स्टेडियमवर होणाऱ्या या स्पर्धेमध्ये देशभरातून अनेक खेळाडू चंद्रपूर मध्ये दाखल होणार आहेत . या सर्व खेळाडू ,त्यांचे पालक व प्रशिक्षक यांच्या निवासाची व्यवस्था ही चंद्रपूर मध्ये करण्यात येत आहे. या राष्ट्रीय स्पर्धा 26 डिसेंबर पासून सुरू होणार आहे .त्यामुळे या स्पर्धेच्या अनुषंगाने देशभरातून संपूर्ण खेळाडू या ठिकाणी येतील. त्यांचे पालक येतील आणि प्रशिक्षक सुद्धा या ठिकाणी येणार आहेत. याच अनुषंगाने महाराष्ट्राच्या सर्व कलावंतांनी ज्यांनी या भिंतीवर आपले चित्र रंगविले आहे हे संपूर्ण कलावंत त्यांच्या कलेच्या माध्यमातून देशाच्या काना-कोपऱ्यात पोहोचणार आहेत. शहरात विविध मार्गांवर लागलेली विद्युत रोषणाई , चौकांच होत असलेले सौंदर्यीकरण , द्विभाजकांवर लागलेले अनेक दृश्य कलाकृती या सगक्यांमुळे चंद्रपूर सुद्धा आता सुंदर दिसायला लागलेल आहे. अनेक वर्षानंतर चंद्रपुरात होत असलेले हे चांगले बदल आता चर्चेचा विषय ठरत आहेत . हे शहर कायम असंच राहावं अशी अपेक्षाही आता लोकांकडून व्यक्त केल्या जात आहे. तर दुसऱ्या बाजूला चंद्रपूरकरांनी महानगरपालिकेद्वारे सुरू केलेले हे अभियान आणि त्यातून झालेली शहराची स्वच्छता व सौंदर्यकरण याची काळजी घ्यावी आणि चंद्रपूरच्या सौंदर्यात होत असलेले हे बदल स्वीकारत असतानाच आपले शहर स्वच्छ व सुंदर राहील यासाठी आपणही आपले जबाबदारी यशस्वीरित्या पूर्ण करावी असे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन पालीवाल यांनी केले आहे.

# सांस्कृतिक उच्च-नीचता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**ग्रामीण-शहरी, आदिवासी-नागरी, आर्यन-द्रविडी, प्रगत-मागास, पुरोगामी-प्रतिगामी, हिंदू-मुस्लिम, पुरुषी-स्त्रीवादी किंवा अशाच तत्सम द्विध्रुवात्मक टोकाच्या मांडणीतून सांस्कृतिक एककल्लीपणा निर्माण होत जातो. यात मग पुन्हा आपापली जात, उपजात, प्रदेश, भाषा, विचारधारा, शिक्षित-आशिक्षितपणाच्या बाजू सांभाळत प्रत्यक्ष दृश्यमान न होता अत्यंत पृष्ठस्तराखाली इतरांच्याप्रति द्वेष, असूया, चीड व्यक्त करत आणि आपापला गट सांभाळण्याची, त्यांच्यापुरताच आपलेपणा दाखवण्याची अमानवी रस्सीखेच सुरू होते. आपण इतरांपेक्षा किती श्रेष्ठ अथवा वेगळे आहोत आणि हे वेगळेपण टिकवून ठेवायचे तर आपण एकत्र आलो पाहिजे, ही धारणा दृढ होते.**



## क्षितिजापल्याड

आजपर्यंतच्या भारताच्या सांस्कृतिक इतिहासात महावीर, बुद्ध आणि शंकराचार्य यांच्या कार्यातूनच भारताच्या बहुतांश सांस्कृतिकतेची जडणघडण झालेली आहे. अहिंसा आणि तार्किकता, प्रेमपूर्वक अंतःकरण आणि सत्यान्वेषी भूमिका यापेक्षा वेगळा विचार यातून गोचर होत नाही. आधुनिक भारताच्या जडणघडणीत केवळ एकाच बाजूची तळी उचलून चालणार नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या दोन्ही मतांचे असलेले महत्त्व होय. अहिंसा आणि वेदांत या परस्परविरोधी बाजू नसून त्यांच्या समन्वयातून भारतीयत्व साकार करणे सहज शक्य आहे. विविध दार्शनिक बुद्धपुरुषांच्या विचारांचा शोध आधुनिक पद्धतीने घेऊन त्यांच्या विचारातील प्रासंगिकता शोधणे आणि ती समाजाला पटवून देणे ही आता काळाची गरज आहे. प्राचीनकालीन यज्ञ याग किंवा तत्सम विधी करून काही सिद्धी प्राप्त होणार नाही. कारण हा दंभधर्म असल्याचे बाराव्या शतकातच ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे. समाजात त्याची पुनरपी प्रतिस्थापना होत असेल आणि त्यावरून उच्च निचतेचे निकष कोणी मांडू इच्छित असेल तर त्याला त्यातील अतार्किकता दाखवून देणे महत्त्वाचे आहे. अशा विधींमध्ये कोणाचा अनादर होत नसेलही परंतु भारतीय परंपरेतील तार्किकतेची विचारधारा अशा कृत्यांमुळे खंडित होते हे मात्र नक्की. सत्य शोधनाचे अनेक मार्ग असू शकतात. केवळ माझाच मार्ग बरोबर आणि इतरांचे कुचकामी ही मनाची धारणा समाजधारणेसाठी मारक ठरते. कोण कोणत्या रस्त्याने जातो हे महत्त्वाचे नसून तो इप्सित स्थळी पोहचतो की नाही हे पाहणे आणि या सर्वांमध्ये एकप्रकारचा समन्वय साधने महत्त्वाचे आहे. भारताच्या संतुलित विकासासाठी जेवढे राम, कृष्ण महत्त्वाचे तेवढेच महावीर आणि बुद्धही महत्त्वाचे आहेत. इथे नामदेवादी संतापासून नानक, चक्रधर, बसवेश्वर, कबीर, तुकाराम, शेख महंमद हेही महत्त्वाचे आहेत. कारण या कोणाशिवायही भारतीय सांस्कृतिकतेची पार्श्वभूमी तयार होऊ शकत नाही. आपण आपल्या फाटक्या झोळीत किती सामावून घ्यायचे ते ठरवावे. मनाची कवाडं सताड उघडी ठेऊन या महापुरुषांना जेव्हा आपण सामोरे जातो तेव्हा खरेच आपली झोळी किती फाटकी आहे याचे प्रत्यंतर येते. म्हणून कोणत्याही सत्पुरुषांस आणि त्यांच्या विचारांना तुच्छ मानणे हे आपल्या संकुचित, कोत्या मनाचे प्रदर्शन असते. आम्ही आमचे जाणिवांचे दार आपल्याच हातांनी बंद करून घेऊन आतल्या आत सडण्याच्या प्रक्रियेला जन्मास घातलेले असते. त्यामुळे आपल्यातील दुर्गंधीमुळे जगात सर्वत्र दुर्गंधी पसरल्याचा भास किंवा भ्रम आपणांस होतो. त्यातूनच मग ही सहन न होऊ शकणारी दुर्गंधी कोठून येत आहे, याचा पत्ताच आपणांस लागत नसल्यामुळे आपण सोडून इतर सर्व कसे नीच प्रवृत्तीचे आहेत हे सिद्ध करण्याची चढाओढ सुरू होऊन सांस्कृतिक पेच निर्माण होतो. ही सांस्कृतिक चढाओढीची प्रक्रिया उच्च निचपणास जन्मास घालून परस्परविरोधी वातावरण तयार करण्यास कारणीभूत ठरते. वैयक्तिक दोषातून सामाजिक कलहापर्यंत आपण मारलेली बाजी एकूण वातावरण बिघडवून अशांतता, अस्थैर्य आणि सामाजिक संशय जन्मास घालत असल्यामुळे समाजात विश्वासाचे वातावरण राहत नाही. आधुनिक काळाचा विचार केला तरी राजा राम मोहनरॉय ते विनोबा यांच्यापर्यंत आणि लोकहितवादी



यांच्यापासून नरेंद्र दाभोलकर यांच्यापर्यंत ज्या सामाजिक विचारवंतांनी आणि कृतिशील कार्यकर्त्यांनी आपल्या जीवाची तमा न बाळगता हा समाज सुधारला पाहिजे यासाठी अहर्निश प्रयत्न केले, त्या सर्वांचा उद्देश समन्वयातून विकास साधने हाच होता. या समन्वयवादी विचारसरणीचे मेरूमनी ठरतात ते महात्मा गांधी. त्यांची ईश्वर-अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दो भगवान ही प्रार्थना याचे उत्तम उदाहरण आहे. ज्यास आपण आत्मसाक्षात्कार, अर्हतपद, निर्वाण म्हणतो ते केवळ पर्यायवाची शब्द ठरतात. शब्दांचा किस पाडणाऱ्यानी अशा कृती-उक्तीमुळे मने सांधण्यापेक्षा अगदी चलाखीने उच्च-निचतेची भावना समाजात प्रसृत केली, हे स्पष्ट आहे. भारतीय वेदांत शास्त्रांनी भौतिक जगतातील हिंसेचे समर्थन केले असले तरी मध्ययुगीन संतांनी त्यातील हिंसेला दूर सारून काळानुरूप त्यात आवश्यक बदल करत अहिंसेचे तत्त्व पुढे आणले. ही लोकधारा आजच्या काळात प्रवाहित झाली पाहिजे. तरच समाजाची निकोप वाढ आणि विकास शक्य आहे. अन्यथा परस्पर अविश्वास, द्वेष, मत्सर, संकुचितपणा वाढत जाईल. राजकारणावरून सांस्कृतिकता ओळखली न जाता सांस्कृतिकतेच्या पायावर राजकारण उभे राहिले पाहिजे. समाजातील व्यक्तींच्या जीवननिष्ठा रुंदावणारे, सम्यक कुतुहलाची पूर्तता करणारे, समतामूलक, उद्यमशील आणि समन्वयकेंद्री राजकारणच सांस्कृतिकतेतील आपपर भाव संपुष्टात आणू शकेल. अन्यथा सांस्कृतिक राजकारण हा विषय असा आहे की, ते लौकिक राजकारणाची दिशा बदलून समाजात विशिष्टांची कुरघोडी होण्यास मदत करणारे ठरेल. याच प्रकारातून मग पानसरे, दाभोलकर यांच्या हत्या होतात. अशा प्रवृत्तींचे एखाद्याची हत्या करणे हे अंतिम लक्ष्य नसून अशा विवेकी मांडणीला बळाच्या साह्याने दूर सारणे हा भाग त्यांच्यासाठी महत्त्वाचा असतो. खरेतर हा सांस्कृतिक कलह म्हणून याकडे आपण पाहिले पाहिजे. यातील व्यक्तिविशेष हे प्रतिकात्मक आहेत. या प्रकाराने आपणांस सांस्कृतिकता समजून घ्यावी लागेल. स्वतंत्र भारताच्या निर्मितीनंतर खरेतर संविधानकेंद्री सांस्कृतिक मूल्ये सरकारी पातळीवरून समाजात रुजवणे, भेदाभेद दूर करणे आणि उच्च-निचतेची दरी संपुष्टात आणणे गरजेचे होते, परंतु नियम भौतिक असतात आणि मूल्यभान मनाचा भाग असल्यामुळे निश्चितच काही मर्यादा येतात. केवळ नियमांवर बोट ठेवण्यापेक्षा प्रबोधन आणि जाणीवजागृतीच्या माध्यमातून आपण हे करू शकतो, हा आत्मविश्वास वाढला पाहिजे. शेवटी विवेकी समाजच सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत होऊ शकतो.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# अनाथाश्रम आणि वृद्धाश्रम

आधुनिक केसरी

**नित्य कर्म म्हणजे सकाळी उठल्यावर जसे करदर्शन करुन इतर विधी उरकल्यावर जो विधी केला जातो तो म्हणजे मोबाईल दर्शन!! वॉटस्अॅप आणि फेसबुकवर आलेल्या पोस्ट पहाणे.काही चांगल्या,काही वाईट,काही वैचारिक, काहीविविध दिवसाच्या शुभेच्छा, वाढदिवस, वगैरे वगैरे. यातही काही नकोशा असतात. ज्या वाचता समयी दुख:वाटते. कुणी तरी गेल्याच्या दुख:द बातम्या ही असल्याने कधी कधी सकाळ दुख:द होते. काही लोक उगाच काही तरी टाकायचे म्हणून काही प्रश्न टाकून ते मोकळे होतात. पण इतरांना विचारात पाडतात. काही तर हल्ली सल्ले विचारतात उदा.माझ्या मुलाचे वय इतके इतके आहे. त्याला अमुक अमुक त्रास आहे. उपाय सुचवा. आता हे खरे असतात की दुसर्याला कामाला लावून मोकळे व्हायचे काम करतात कुणास ठावूक..?**

फेसबुकवर अशा प्रश्नांना मजेशीर उत्तरेही काही लोक देतात. प्रश्न टाकणारे आणि उत्तर देणारे दोघेही रिकामेटेकडे असावेत असे प्रश्नोत्तरावरुन वाटते.काही जण खूप छान सामाजिक प्रश्न मांडून आपला अमूल्य वेळ सत्कारणी लावतात.

परवा असाच एक प्रश्न फेसबुकवर पहायला मिळाला. प्रसिद्ध अभिनेते अनेकांच्या मनात घर करुन असलेले नाना पाटेकर यांनी तो प्रश्न मांडला होता. आता नाना पाटेकर म्हटल्यावर त्यांचे फिल्म इंडस्ट्री मधील कार्य, तसेच ते आणि मकरंद अनासपुरे यांनी उभारलेली शेतकऱ्यांसाठीची उभारलेली नाम संस्था, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठीचे मदतकार्य या कारणाने ते सतत चर्चेत असतात. अनेकांच्या प्रमाणे मी ही त्यांच्या अभिनयाचा रसिक असल्याने त्यांनी मांडलेल्या विचारावर लिहावे वाटले.मात्र तो विचार त्यांचाच आहे की कुणी त्यांचा फोटो घेऊन त्या विचाराची पोस्ट पाठवली हे माहिती नाही. पण तो विचार इतका प्रभावी होता आणि मती गुंग करणारा असल्याने तो विचार त्यांचाच असेल असे समजून त्यावर लिहितो आहे. मागच्या काही दिवसांपूर्वी त्यांनी वृध्दाश्रम आणि अनाथाश्रम एकत्र केले तर काय होईल?किंवा करता येईल का...? खूप महत्त्वाचा, किती चांगला आणि अभ्यासपूर्ण विचार मांडला होता.आणि हे केले तर फार छान होईल अस मला तरी वाटतं. काही अनाथाश्रम मी पाहिले आहेत.तसेच वृध्दाश्रमात ही गेलो आहे. तेथील दोघांचेही मन कुठे तरी कुणाकडे तरी ओढले जात असल्याची जाणीव ते पहाताना होते.योगायोगाने हे दोन्ही माझ्या गावी असल्याने आणि तिथे तळमळीने कार्य करणाऱ्या लोकावर लेख लिहिण्याच्या प्रसंगातून तिथे जाणे झाले होते.



त्यामुळे वातावरण काय असते ते पहायला मिळाले. वृध्दाश्रमात मी समाजसेवेची शिबिरे घेऊन जात असे.त्यामुळे तेथील वातावरण वृध्द यांना जवळून अनुभवण्याचे योग आले. विद्यार्थ्यां बरोबर वृध्द इतके भरभरून बोलायचे की बस्स्!!जणू काही त्यांच्या घरची नातवंडं!!विद्यार्थी ही अगदी डोळ्यात पाणी आणून ते प्रसंग पुन्हा सांगत होते. शेवटी ती ही कुणाचे तरी नातवंडच होती आणि त्यांना त्यांच्यात आपले आजीआजोबा दिसत होते. ज्यांना ते होते त्यांना व ज्यांना आजीआजोबा नाहीत त्यांना ही तसेच वाटत होते. तिथून निघताना त्या दोघांचेही डोळे पाणावलेले पहायला मिळायचे. मुले त्यांनी आणलेल्या भेटवस्तू, खाद्यपदार्थ त्यांना देऊन समाधान पावायचे.ती वृद्ध मंडळीही खुशीत ते स्विकारत.या एका उदाहरणातून वृध्दांना प्रेमळ सहवासाची, कुणाच्या तरी बोलण्याची, सहानुभुतीची, आपुलकीच्या नात्याची, जवळीकतेची, जिव्हाळ्याची, आणि आधाराची किती गरज आहे हे दिसून येते. कैक वर्षे संसार नेटका करुन,मुलांचे दोनाचे चार हात करुन, नोकरी घरप्रपंच व्यवस्थित करुन शेवटी जर वृध्दाश्रमात जाव लागत असेल तर त्यांच्या मनाला होणाऱ्या वेदना सार्यांनी समजायला पाहिजेत.खरं तर भारता सारख्या संस्कार, संस्कृती,सभ्यता,मानणार्या, पाळणार्या,देशात वृध्दाश्रमच नको आहेत. हे वृध्दाश्रम म्हणजे भारतीय संस्कृती आणि सांस्कृतिकतेला लागलेला कलंकित शाप आहे असं वाटतं. तेच अनाथाश्रमात पहायला मिळतं.तिथे अनाथ बाळे लहानाची मोठी होतात ती आईबाबा विना.कुणी तरी नको असणारी ही बाळे कुठेतरी टाकलेली या अनाथाश्रम आणली जातात आणि तिथेच ती मोठी होतात. तिथल्या दाया,आया,सेविका यांच्या कडून त्यांचा सांभाळ व्यवस्थित होतो.पण ते शेवटी कर्मचारीच असतात. स्वतःच्या आईच्या कुशीत असणं आणि कर्मचाऱ्यांच्या कुशीत असणं यात असणारा फरक सुज्ञांना सांगणे न लगे.....!!आईच्या ऊबीत मुलाची वाढ ही जोमानं होते. सोबतीला आईचे दूधही असते.ते अनाथाश्रमात कसे मिळणार?त्यामुळे या मुलांची वाढ व आरोग्य आपल्या मुलांच्या मानाने थोडे कमी पहायला मिळते.अनाथालयांना येणारे फंडस् भरपूर असले तरी प्रेमाची ऊब तिथे कुठून येणार?मागे एक इंग्रजी कविता वाचनात आली होती.त्यात एक ओळ होती....

IF I HAVE A GOOD ENOUGH BOX.....
I SHALL COLLECT ALL THE
FRAGRANCE FROM THE SCHOOL,
NURSERY AND STREET.....
AND HIRE A GIANT TO DROP THE
BOX INTO THE DEEP DEEP SEA.

कवी म्हणतो की,मला जर एक मोठी पेटी मिळाली तर मी शाळा,बालवाडीतून,रस्त्यातून राग,रागीट नजरा,कपाळावरील आट्या गोळा करेल आणि व्यवस्थित ते सगळं भरून ती पेटी एखादा राक्षस भाड्याने घेऊन त्याच्याकडून ती पेटी खोल खोल समुद्रात टाकायला लावीन. ह्या कवीचे असे म्हणणे म्हणजे शाळा नर्सरी बालगृहात असणाऱ्या रागीट नजरा राग नष्ट करायचा आहे. पण ही अशक्य गोष्ट असली तरी त्यातील भावना महत्त्वाची आहे. मुलांना त्रासदायक काही नको हेच त्याचे म्हणणे असावे.बालसुधारगृहात किंवा अनाथाश्रमात मुलांना सर्व काही मिळत पण आईवडील आजीआजोबा यांचं प्रेम मिळत नाही. ते मिळण्यासाठी व वृध्दाश्रमातील लोकांना प्रेम वाटता येईल यासाठी दोन्ही एक होणे ठिक होईल. यासाठी नाना पाटेकर यांनी मांडलेला विचार मला खूप भावला. खरोखरच वृध्दाश्रम आणि बालकाश्रम/अनाथालय एकत्र केली तर.देणार्यांना देता येईल आणि घेणार्यांना घेता येईल. प्रेम,वात्सल्य, मायेची ऊब,पाठीवरची थाप,पाठीवरून फिरणारा आपुलकीचा हात आणि तो स्पर्श,कौतुकाची थाप,डोळ्यात सामावून घेणारे आपसूकच एकमेकांना भेटतील.आणि दोन आलय पैकी एकच आलय राहिल आणि ते म्हणजे प्रेमालय/प्रेमाश्रम/वात्सल्याश्रम....!!!

आदरणीय नानाजी काही चुकले असल्यास क्षमस्व!!

दत्ता तरलगट्टी सर
मुक्त पत्रकार, ९८८१६२९०४८

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देशी दारूचे 8 बॉक्स एरटिका गाडीमध्ये वाहतूक करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पिशोर दि. 22 रोजी 7.17 वाजता पोलिस स्टेशन पिशोर येथे मिळालेल्या माहिती नुसार, पोलीस उपनिरीक्षक बडे साहेब, बिट अमलदार विलास सोनवणे, किरण गंडे, सोपान डकले, संजय लगड, अन्सार पटेल ,होमगार्ड देवरे व गोरे या पथकाने पिशोर पोलिस ठाण्याचे सपोनि देवीदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शना खाली 9.00 वाजता पळशी खुर्द ते पळशी बुद्रुक जाणाऱ्या रोड वरती 700000 रू किमतीची ईरटीका कंपनीची चार चाकी वाहन तिचा रंग सफेद , पासिंग क्रमांक एम एच 14 डी एन ५१२५ यामध्ये सोपान उत्तम जाधव ,42 वर्ष, राहणार पळशी खुर्द, तालुका कन्नड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे ताब्यात 33600 रू किमतीच्या देशी दारू संजीवनी संत्र्याच्या 180 एम एल च्या 336 बॉटल व 5000 रू किमतीच्या 90 एम एल च्या 100 बॉटल मिळून आल्या. सदरची कारवाई मनीष कलवानिया सर, सुनिल लांजेवार सर,विजयकुमार ठाकूरवाड सर कन्नड, पोलीस स्टेशन पिशोर सपोनि देविदास वाघमोडे यांचे मार्गदर्शन मध्ये पिशोर बिट अमलदार विलास सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक बडे साहेब, बिट अमलदार विलास सोनवणे, किरण गंडे, सोपान डकले, संजय लगड, अन्सार पटेल,होमगार्ड देवरे व गोरे यांनी केली आहे.



# विकसित भारत रथ यात्रेचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात केंद्र सरकारचे आपलं संकल्प विकसित भारत यात्रा रथ विविध योजनाची माहिती व विविध योजनेची जागेवरच लाभार्थींना लाभ देण्यासाठी आरोग्य तपासणी पत्र वाटप गावा गावात रथ यात्रा द्वारे सुरू असुण यात ठिकठिकाणी विरोध होतानाचे चित्र आहे परंतु नेमकं विरोध कुणाला आहे याची सर्वत्र चर्चा सुरु आहे. तालुक्यांच्या गावा गावात सद्या केंद्र सरकारचे आपलं संकल्प विकसित भारत यात्रा रथ नागरिकांना विविध योजना व केलेले कार्य तथा आरोग्य तपासणी विविध योजन कार्ड वाटप प्रक्रिया यात्रा रथ दरम्यान सुरु आहे.या रथा चे आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी खुलताबाद येथे पुजाही केली. प्रथमता सराई येथून आपलं संकल्प विकसित भारत यात्रा रथाला सुरुवात झाली व येथेच सुरुवातीला विरोधाला सुरुवात झाली यात्रेत तहसीलदार, गटविकास अधिकारी ,तालुका आरोग्य अधिकारी आदिचा सहभाग होता सद्या गावा गावात मराठा आरक्षण ला घेवून प्रवेश बंद चे फलक लावले आहेत. पहिले आरक्षण तद्नंतर सर्व काही असी भुमिका गाव गावात सकल मराठा समाजाकडून घेण्यांत आलेली आहे.




# राम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी दीपोत्सव साजरा करणार : ढिवरे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली देशातील विद्यार्थी श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी दिपोत्सव साजरा करणार असल्याची माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांची पत्रकार परिषद घेऊन माहिती धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला वैभवी ढिवरे, अभाविपचे धुळे जिल्हा प्रमुख प्रा. डॉ. हेमंत देशमुख, धुळे शहर मंत्री प्रथमेश कुलकर्णी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत वैभवी धिवरे म्हणाल्या की, परिवर्तनाच्या या काळात देशातील विद्यार्थी आपली भुमीका सकारात्मक प्रध्दतीने बजावण्यास तयार आहेत. विद्यार्थी परिषद विकसीत भारत संकल्पनेवर काम करेल. २२ जानेवारी रोजी आयोध्येतील श्रीराम मंदिरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठेच्या शुभमुहूर्तावर देशभरातील विद्यार्थ्यांना दीपोत्सव साजरा करण्याचे आवाहन ढिवरे यांनी केले. हे राममंदिर नसून राष्ट्रमंदिर आहे. हा अस्मितेचा प्रश्न असल्याचेही ते म्हणाले. बदलत्या काळात देशातील विद्यार्थीमध्ये निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि डिजिटल स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी अभाविप काम करीत असून मुलांना खेळाकडे वळविणार असल्याचे त्या म्हणाल्या. जगातील सर्वात मोठी संघटना अभाविप असून या संघटनेचे ५० लाख ६५ हजार सदस्य आहेत. संघटनेला ७५ वर्ष पुर्ण होत असून दिल्लीत नुकतेच राष्ट्रीय अधिवेशन झाले. या अधिवेशनात ४ प्रस्ताव पारित करण्यात आले. एकुण १३ हजार विद्यार्थी या अधिवेशनासाठी उपस्थित होते. धुळ्यातील १२ विद्यार्थ्यांनी या अधिवेशनात सहभाग नोंदविला होता.

देशातील तरुणांची स्वप्ने पुर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने प्रयत्न करण्याची गरज असून विविध पदांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याचे आवाहनही ढिवरे यांनी केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने राष्ट्रीय अधिवेशनात देशातील सर्व राज्यातील जिल्हा केंद्रांवर जिल्हा सन्मेलन आयोजीत करण्याची घोषणा केली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# आता जेवढे वापरणार पाणी, तेवढेच येणार बील : नळजोडणीवर मीटर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेमार्फत शहरातील सर्व नळ जोडणीवर जलमापक ( मीटर ) लावण्यात आले असुन १ जानेवारी २०२४ पासुन याचा प्रत्यक्ष वापर सुरु होणार आहे. यापुढे पाण्याचा जेवढा वापर होईल तेवढेच देयक येणार असल्याने अनावश्यक खर्च व अनावश्यक पाण्याच्या वापरावर नियंत्रण येणार आहे.

चंद्रपूर शहरास ईरई नदी व धरणावरून पाण्याची उचल करून,रामनगर व तुकूम येथील जलशुद्धीकरण केंद्रावर प्रक्रिया करून १६ जलकुंभाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. शहराची गरज पाहता सध्या ४५ दशलक्ष लिटर पाण्याचे वाटप मनपाद्वारे दररोज करण्यात येते. आतापर्यंत नळ जोडणी धारकांकडुन वार्षिक पाणीपट्टी कर घेतला जात होता आणि तो सर्वांना सारखाच लागू होता.त्यामुळे पाण्याचा किती वापर



प्रत्येकाकडून केला जातो याचा अंदाज बांधणे कठीण होते. आता मीटर सुरु झाल्याने आवश्यक तेवढेच पाणी वापरले जाऊन पाण्याचा अपव्यय टाळण्यास मदत होणार आहे. अमृत योजना सुरु होण्यापुर्वी शहरात ३५ हजार अधिकृत नळ कनेक्शन होते, अमृत योजनेअंतर्गत त्यात वाढ होऊन ६० हजार पर्यंत नळ कनेक्शन देण्यात आलेले आहेत.परंतु त्या नळांना पाणी येत नसल्याची, कमी येत असल्याची किंवा पाण्याचे प्रेशर कमी येत असल्याच्या तक्रारी येत होत्या. तपासणी केली असता आढळुन आले कि अनेक ठिकाणी उगीच नळ सुरु ठेवणे, वाहने धुण्यास पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणे अश्या निष्काळजीपणाने पाणी पुरवठ्यावर परिणाम होत होता.सर्वांना आवश्यक ते पाणी मिळावे यासाठी पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक होते त्यामुळे मनपाद्वारे मीटर लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.आता जेवढे पाणी वापराल तेवढेच देयक द्यावे लागणार आहे. सदर मीटरचा वापर १ जानेवारी २०२४ सुरु होणार असुन त्रैमासिक ( ३ महिन्यांचे ) बील दिले जाणार आहे. बील प्राप्त होताच १५ दिवसात बील भरणाऱ्यांना १५ टक्के त्यानंतरच्या १५ दिवसात बील भरणाऱ्या नळ जोडणी धारकांना ५ टक्के सवलत दिली जाणार आहे तर थकबाकी असल्यास २ टक्के व्याज लावले जाणार आहे. पाणी ही एक जीवनावश्यक बाब आहे, त्यामुळे ते वापरावे लागणारच आहे. मात्र जितके काटकसरीने आपण ते वापरू तितके ते जास्त दिवस पुरणार आहे. सदर जलमापक ( मीटर ) बसविल्याने पाण्याचा किती वापर करावा याचा अंदाज येईल व ज्याप्रमाणे आपण पैशासाठी मासिक अंदाजपत्रक तयार करतो त्याचप्रमाणे पाण्यासाठी सुध्दा अंदाज पत्रक तयार केले तर कोणत्या वापरात आपण पाण्याची बचत करू शकतो याची कल्पना येवू शकेल.

# दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद यांच्या वतीने दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे तुळजाभवानी स्टेडियम येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल गुप्ता,पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका प्रांजल शिंदे,जि.प.चे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव,उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ,मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) शाम गोडभरले यांनी हेलन केलर,लुई ब्रेल,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पुजन करुनदीप प्रज्वलन केले.यावेळी क्रीडा ध्वज फडकवून व रंगीबेरंगी फुले हवेत सोडून उद्घाटन करण्यात आले.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी खेळाचे महत्व सांगितले.खेळामुळे तन,मन



शुध्द राहते.शरीर निरोगी राहते असेही त्यांनी सांगितले. गुप्ता यांनी दिव्यांग खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जि.प.चे जिल्हा समाज कल्याण अधिकारी देवदत्त गिरी यांनी केले. दिव्यांग शाळेतील 26 शाळांनी सहभाग घेतला आहे.यामध्ये 1300 विद्यार्थी खेळाडू सहभागी आहे. एकूण 13 क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. यामध्ये मुकबधीर,मतीमंद,अस्थिव्यंग व अंध प्रवर्ग आहेत.यामधून प्रथम आलेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये संधी मिळणार आहे.दोन दिवस या स्पर्धा चालणार असून खेळाडूंना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे श्री.गिरी यांनी सांगितले. कार्यक्रमांमध्ये दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी, प्रहार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष मयुर काकडे,दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप डोके,दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी तसेच दिव्यांग शाळेचे संस्थापक अध्यक्ष ॲड.भानुदास कलवले, बालाजी शिंदे,सचिन सरवदे,रफिक कोतवाल,प्रताप भायगुडे,चंद्रकांत जाधव,शहाजी चव्हाण,जुनेद शेरीकर यांचे स्वागत व सत्कार देवदत्त गिरी व जि.प.चे सहाय्यक लेखाधिकारी सुधीर जाधवर यांनी केले. तत्पूर्वी स्पर्धेची सुरुवात अस्थिव्यंग प्रवर्गातून 50 मीटर धावण्याच्या स्पर्धेने करण्यात आली. या स्पर्धेस उपस्थित पाहुण्यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात केली. कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,समाज कल्याण विभागातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बालाजी नादरगे यांनी केले.

# अष्टपैलू, दिलखुलास आणि पुरोगामी विचारांचे पत्रकार राम पाटील चौधरी

आधुनिक केसरी

" वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठाव " असे ठणकावून सांगणारे जगद्गुरू संत तुकाराम



वसंत खडसे
9373578429

महाराज भगवद्गीतेचे तत्वज्ञान मराठीत आणणारे संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या साहित्याचे गाढे अभ्यासक तद्वतच छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सतत झटणारे, जेष्ठ पत्रकार राम पाटील चौधरी हे पुरोगामी विचारांचे सत्यनिष्ठ पत्रकार म्हणून संपुर्ण वाशिम जिल्ह्यात सुपरिचित आहेत. राम पाटील चौधरी यांनी गेल्या दोन दशकात विविध वृत्तपत्रातून काम केले आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक शोध बातम्या काढून सामाजिक समस्यांना वाचा फोडली आहे. एकीकडे शाहु, फुले, आंबेडकरांच नाव घ्यायचं आणि दुसरीकडे आपल्याच बहुजन समाजातील बांधवांना अंधारात ठेवायचं. त्यांचा राजकारणासाठी उपयोग करुन घ्यायचा आणि आपली राजकीय दुकानदारी जोरात सुरू ठेवायची. अशा संधीसाधू राजकारण्यांचे आपल्या लेखणीतून कर्दनकाळ ठरलेले राम पाटील चौधरी हे नाव आजही जिल्ह्याच्या पत्रकारितेत दबदबा कायम ठेवून आहे. सामाजिकतेच भान आणि कर्तव्याची जाण यांचा सुरेख मेळ घालून



सामाजिक व राजकीय परिवर्तनात त्यांच्या धारदार लेखणीने अनेक वेळा जादू करुन दाखविली असल्याचे जिल्ह्यातील अनेक राजकीय तज्ञ सांगतात. जगदगुरु संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सतत त्यांच्या लेखणीतून तळपत असतात. भाकड कथा आणि अंधश्रद्धा यांचे कट्टर विरोधक असलेले राम पाटील चौधरी हे केवळ पत्रकारच नव्हे; तर बहुजन समाजासाठी धडपडणारे एक खंबीर नेतृत्व आहे. " एकच वारी, फक्त बारा जानेवारी " असे म्हणत सिंदखेड राजा येथे दरवर्षी साजरा होणाऱ्या जिजाऊ जन्मोत्सवाला आजपर्यंत एकदाही गैरहजर राहिलेले नाहीत. पत्रकारितेसोबताच ते हाडाचे शेतकरी सुद्धा आहेत. दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी म्हणुन काम पाहत असतानच वाशिम पासून १५ की.मी. असलेल्या पार्डी टकमोर या जन्मगावी जावून ते आपल्या शेतीची सुद्धा तन मन धनाने सेवा करतात. ऐवढेच नव्हे; तर रासायनिक शेतीला विरोध करून नैसर्गिक शेतीचे ते नेहमीच आपल्या लेखणीतून समर्थन करताना दिसतात. वाशिम वरून आपल्या गावी जात असताना काही दिवसाअगोदर त्यांच्या गाडीचा अपघात झाला होता. त्यात त्यांच्या एका पायाला गंभीर दुखापत झाली आहे. सदर पायाचे ऑपरेशन सुद्धा झाले आहे. त्यातून त्यांना लवकर सावरण्याची ईश्वर ताकद देवो अशी प्रार्थना करून आज त्यांच्या वाढदिवसा निमित्त आधुनिक केसरी परिवाराकडून त्यांचे अभीष्टचिंतन करून उदंड आयुष्यासाठी खुप खुप शुभेच्छा..!

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०१ वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले.**

दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल - ए - आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या.



चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान - ए - इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

# बळीराजाच्या कष्टाची काय कदर करता हो ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आज २३ डिसेंबर म्हणजे राष्ट्रीय किसान दिन आहे. आज शेतकरी प्रचंड आर्थिक तणावग्रस्त अन् मानसिक विवंचनेत आहे. चला तर, आजच्या दिनानिमित्त या परिस्थितीतून आपल्या अन्नदात्यास बाहेर काढण्याचा निर्धार आपण सर्वजण करुया! आज २३ डिसेंबर राष्ट्रीय शेतकरी दिवस म्हणून भारत देशभर साजरा होत आहे. एकीकडे भारत महासत्ता होणार असल्याचा आशावाद व्यक्त होतो. मात्र, दुसरीकडे देशातील शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा होतो, दुसरीकडे त्याच देशातील शेतकऱ्यांना त्याच्या शेती व्यवसायासाठी कुठलीही सुविधा मिळत नाही.**

दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या वाढतच आहेत. शेतकऱ्याला सन्मानाने बळीराजा म्हटले जाते; मात्र प्रत्यक्षात हा राजा अतिशय दीनदुबळा झालेला आहे. कर्जबाजारीपणा आणि आर्थिक विवंचना या आपत्तींचा बळी शेतकरी ठरलेला आहे. शासनासह समाजातील प्रत्येक घटकाने शेतकऱ्यांप्रती किमान कृतज्ञतेची भावना ठेवणे गरजेचे आहे.

हरितक्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त एक जून हा कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा हवा तसा परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनात झाल्याचे दिसून येत नाही. राज्यात पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी कृषीक्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल त्यांचा जन्मदिवस २९ ऑगस्ट शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला होता. त्यासाठी त्यांचे नातू आणि तत्कालीन राज्य सरकारमधील कृषिमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेतला होता. महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाने २०१७ पासून १५ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय महिला शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचे ठरविले. त्याचीही अंमलबजावणी सुरू झालेली आहे. हे सर्व पाहून शासन-प्रशासनाला राज्यातील शेतकऱ्यांबाबत फारच कळवळा आहे, असे दिसून येते. एवढा कळवळा शेतकऱ्यांविषयी आहे, तर मग त्यांच्यावर नवीन नियम व कायदे बळजबरीने का लादले जातात? त्यांना आपल्या क्षुल्लक मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, उपोषणे आदी मार्गांचा अवलंब वारंवार का करावा लागतो? आज फार मोठ्या आर्थिक, मानसिक विवंचनेतून हा शेतकरी जात आहे. कोणत्याही समस्येने बळीराजाला-शेतकऱ्याला ग्रासले असेल, तर त्याला मदतीचा हात नक्की दिला पाहिजे. ही जबाबदारी केवळ शासनाची नसून समाजातील प्रत्येक घटकाची आहे. भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचा वाढदिवस २३ डिसेंबर हा राष्ट्रीय किसान दिन म्हणून साजरा केला जातो.



देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेची- नाबार्ड त्यांनीच स्थापना केली. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये २००१ साली चौधरी चरणसिंह यांचा जन्मदिवस राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार तो आजही सुरू आहे. देशातील मंत्री, अधिकारी, उद्योजक, कर्मचारी, व्यापारी यांना शेतकऱ्यांबद्दल काहीच निष्ठा नाही, असे खेदाने म्हणावे लागत आहे. प्रशासनात अनेक शेतकऱ्यांची मुलं आहेत. त्यांनी बापाचे कष्ट जवळून पाहिले असतानाही त्याचा कैवार घेण्यास बहुतांश जण तयार होत नाहीत. नोकरदारवर्ग 'फिक्स रेट' सांगणाऱ्या व्यापाऱ्यांकडे भाव करत नाही. मात्र तो अन्नदात्याकडे शेतमाल व भाजीपाल्याचा भाव कमी करण्याचा आग्रह धरतो. व्यापारीसुद्धा ठोक व्यवहारात भाव कमी करण्यास भाग पाडतो व आपण मात्र चिल्लर विक्री म्हणून चढ्या दराने विकतो आणि शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या शेतीमालावर गडगंज पैसा कमावतो. म्हणूनच आज परत म्हणावसं वाटतंय, मातीतून सोन्याहून मोल्यवान असं अन्न उगवणारे तुम्ही, काळाच्या या ओघाला घाबरू नका! तुमच्या मनगटात ती धमक आहे, ज्याला घाबरून हा दुष्ट काळसुद्धा समोर उभारणार नाही. लढा, आत्तापर्यंत लढत आलात, तोच लढा चालू ठेवा. एक ना एक दिवस या जगाला तुमचे अस्तित्व मान्य करावेच लागेल. या निमित्ताने एवढंच सांगावंस वाटतंय, एक तास जेवायला उशीर झाला तर आपली काय अवस्था होते? जेवणात जर फक्त पाणीच मिळायला लागलं तर मग काय होईल? कल्पनाच करवत नाही! पण, आपले शेतकरी असेच मरत राहिले तर शेती उरणारच नाही. वेळीच उपाय, योग्य निर्णायक योजना, त्यांना मानसिक आधार, त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण, या व अशा अनेक योजना राबवून या दुष्ट चक्रातून शेतकऱ्यांना वेळीच बाहेर काढावे लागेल. बळीराजाचं अस्तित्व नाकारलं, तर या जगातील समस्त मानवजातीचं अस्तित्व संपुष्टात येण्यास कितीसा वेळ लागेल? याचा विचार करा. सगळ्यांनी अवती-भवती असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा स्वाभिमान जराही न दुखावता, हवी तेवढीच आणि तितकीच मदत अगदी स्वेच्छेने केली पाहिजे. त्याच्या कष्टाची कदर झाली पाहिजे. त्याच्यासाठी असलेल्या सर्व शासकीय योजना; सोयी-सवलती निव्वळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष त्याच्या बांधापर्यंत पोचल्या पाहिजेत. अनेक बांधवांचे शिक्षण अपूर्ण असल्याने त्यांना शासनाच्या योजनांची माहिती होत नाही किंवा शासनाच्या योजनांचा लाभ कसा घ्यावा? हे त्यांना कळत नाही. समाजात कितीतरी शेतकरी आधुनिक आणि पारंपरिक शेतीत योग्य तो समन्वय साधून शेती करू शकत नाही. त्याला योग्य तो शेतीपूरक जोड-धंदा कसा करायचा? याबाबत माहिती आपण देऊ शकतो. शेतकऱ्यांना सुखी-समाधानी आणि तृप्त जीवन जगण्यास आपण त्यांना धीर देऊ शकतो. त्यामुळे या संदर्भात आपल्याला या व्याकूळ झालेल्या शेतकऱ्यांना या विषयी माहिती देऊन शक्य तेवढी मदत केली पाहिजे. चला तर मग आज राष्ट्रीय किसान दिनानिमित्त एक निर्धार करू आणि आज आपला शेतकरी ज्या परिस्थितीत जगतोय त्याला यातून आपल्या मदतीने बाहेर काढू. इडा पिडा टळो व बळीचे राज्य येवो, अशी मनोकामना उरी बाळगुया! भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचा जन्मदिवस २३ डिसेंबर हा राष्ट्रीय किसान दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. आज शेतकरी प्रचंड आर्थिक तणाग्रस्त अन् मानसिक विवंचनेत आहे. सततची अवकाळी स्थिती आणि नासधूस, दरवर्षीची नापिकी तसेच कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी राजा नाउमेद झाला आहे. चला तर, आजच्या दिनानिमित्त या परिस्थितीतून आपल्या अन्नदात्यास बाहेर काढण्याचा निर्धार आपण सर्वजण करुया!

# सामाजिक विषयांचे सखोल चिंतन



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195


आधुनिक केसरी

**मनःपटलावर उमटलेल्या विचारलहरींना नेमकेपणाने आणि सुयोग्य शब्दालंकारानी अल्पाक्षरी रुपात सादर करणं , वाटते तितके सोपे नसते. मनात आले आणि कविता प्रगटली असे घडत नाही. काव्याची बीजे मनात रुजण्यासाठी मनाचे आवरण संवेदनशील असायला हवे, वाचनातून आकलन केलेले शब्द , त्याचे अर्थ सखोल जाणून घेणे गरजेचे असते, जाणिवा प्रगल्भ असायला हव्यात आणि आतून ती स्फूर्तता बाहेर यायला हवी. भारतीय आणि पाश्चात्य साहित्यमीमांसकांन काव्याचे अनेकांगी व्याख्या केल्या पण काव्याची नेमकी व्याख्या कोणाला सांगता आली नाही.**

काव्य ही अशी गोष्ट आहे, जिला कोणत्याही एका साच्यात बांधू शकत नाही.
ती मनमुक्त आहे. प्रतीक, प्रतिमा, अलंकार आणि भावनांचा उत्तम समतोल साधून कविता अवतरते. प्रथम ती कवीच्या मनात स्फुरते , त्यानंतर ती कागदावर अवतरते. जेव्हा ती शब्दात व्यक्त होते तेव्हा ते अनुभव फक्त कवीचे राहत नाहीत तर त्याला सार्वत्रिकता प्राप्त होते.

कविता स्फुरण्यासाठी सूक्ष्म निरीक्षणशक्ती, आकलन क्षमता आणि स्फूर्ती सोबतच काव्यप्रतिभा असणं आवश्यक आहे आणि ही वैशिष्ट्ये, काव्यप्रतिभा कवयित्री माधुरी वैद्य यांच्याकडे उपजतच आहे. याची प्रचिती त्यांचे साहित्य वाचताना जाणवते. आतापर्यंत त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली. पण आपल्या उत्कट भावनांना व्यक्त करण्यासाठी त्यांनी कुठलीही घाई न करता त्यासाठी एक ठराविक काळ दिला, तो भावनिक संयम राखला. वैचारिक संयम राखण्याची ही कला कवयित्रीला अवगत आहे. 'मनमीत' आणि 'स्वप्नझुला' या कवितासंग्रहानंतर त्यांचा 'युरेका' हा तिसरा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित झाला.

शारदा प्रकाशन प्रकाशित 'युरेका' हा कवितासंग्रह अगदी शीर्षकापासून कवयित्रीला काहीतरी गवसल्याची सूचना देत आहे. या कवितासंग्रहात एकूण ३६ कविता समाविष्ट केल्या असून , त्या कवितांमध्ये सर्व घटकांविषयी भाष्य केले आहे. स्वप्न, स्व या प्रतिमांऐवजी समाजातील समस्या, विसंगती, माणुसकीच्या प्रतिमा, स्त्री जीवनाचे रंग, परमेश्वराप्रति भाव, हरवत चाललेली माणुसकी, एकाकीपण अर्थात मनातील तळमळ, वेदना, खंत व्यक्त करणारा हा कवितासंग्रह आहे. यातील काही कवितामधून यमक साधले आहे, तर काही मुक्तछंदातील कविता आहेत. कवयित्री माधुरी वैद्य आपल्या आजुबाजुच्या सामाजिक स्थित्यंतरांकडे किती डोळसपणे पाहतात, याची जाणीव होते. अगदी नेमकेपणाने आणि तटस्थपणे त्या प्रत्येक घटकांकडे पाहतात.




'युरेका' कवितासंग्रहातील 'तुळशी माते ' या कवितेतील पुढील ओळी पाहू :

**'तुळशीची माती**
**लाविते मी भाळी**
**सकाळी सकाळी '**

या कवितेतून हिंदू संस्कृतीतील तुळशीचे महत्त्व , त्यामागील भावना आणि भक्तिभाव अधोरेखित केले आहे. तसेच तुळशी आणि स्त्री याच्या पावित्र्याचे महत्त्व , स्त्रीच्या जीवनाशैलीतील तुळशीपुजेचे स्थान , ही परंपरा हल्ली दिसत नाही. इमारती उभ्या राहिल्या आणि अंगण नाहीसे झाले त्यामुळे तुळशी वृंदावन फार दिसून येत नाहीत. तिन्ही सांजेला तुळशीपाशी दिवा लावून प्रार्थना करणं , या संस्कारक्षम भावनेचे सुंदर वर्णन या कवितेत केले आहे.

एक दिवस स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या महान व्यक्तिमत्वांचे स्मरण करून त्यानंतर समाजात सुयू असलेली अराजकता , विकासाच्या नावाखाली सुरु असलेली फ़सवणूक यावर 'स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा' या कवितेद्वारे कवयित्रीने तिरकसपणे भाष्य केले आहे. प्रस्थापित व्यवस्थेप्रति आपला रोष व्यक्त केला आहे.

**'देवा, अशी वेळ तू**
**का आणलीस ?**
**एकाकी, निर्मनुष्य, उदास ! '**

कोरोना काळातील भीषण परिस्थिती तसेच निर्मनुष्य झालेल्या या वातावरणाचे वर्णन 'अशी वेळ' या कवितेत केले आहे. या वर्णनाने त्या एकाकीपणाची पुन्हा एकदा जाणीव झाली.

शेती ही संपूर्णतः पावसावर अवलंबून असते. पण पाऊस हा बेभवरशी आहे. कधी इतका धो धो पडतो, की लावलेली पिके वाहून नेतो , तर कधी कुठे गायब होतो काही कळत नाही. या अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे होणारे हाल आणि नुकसान डोळ्यात पाणी आणते . पावसाच्या या लहरी वागण्यावर कवयित्री म्हणते,

**'हे पावसा तू हो शहाणा, ऐक माझे जरा!**
**नको खाऊस मार तू, अन् शिस्तीत राज्य कर जरा...**

'तूच अन्नदाता' कवितेतून कवयित्री पावसाला अधिकारवाणीने विनवणी करत आहे. तूच अन्नदाता आहेस, आमची दुर्दशा करु नकोस, अशी समज देत आहे. 'युरेका' ही शीर्षक कविता सत्य परिस्थितीवर भाष्य करणारी आहे. एकीकडे पाण्याचे दुर्भिक्ष आहे पण दुसरीकडे तेच पाणी शेतकऱ्याच्या डोळ्यात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पाणी टंचाई , धान्याची साठेबाजी, वाढती महागाई या विषयांवर कवयित्रीने उपहासात्मक प्रहार केला आहे पण सोबतच पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्याची सूचनाही केली आहे. जीवनाकडे तसेच आजुबाजुच्या घटकांकडे व्यापक दृष्टीने पाहण्याची सजग दृष्टी कवयित्रीकडे आहे, त्याच दृष्टीने टिपलेला हा भवताल 'युरेका' कवितासंग्रहात अनुभवायला मिळेल.या कवितासंग्रहाला प्रा. मंजिरी गजरे यांनी यथोचित प्रस्तावना लिहिली आहे. तसेच दर्शन कोळंबकर यांनी सूचकतेने मुखपृष्ठ साकारले आहे.

**(युरेका – कवितासंग्रह / कवयित्री : माधुरी वैद्य / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १०० रुपये )**

# दु:ख प्राणप्रिय नातेवाईकांच्या मृत्यूचे...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**गावात जिकडे तिकडे दिवाळी सणाची धूमधाम सुरू होती. घराघरांत सगळे नातेवाईक एकत्र जमून दिवाळी सण साजरा करण्यात मग्न आहेत.दिवाळी फराळाचे पदार्थ तयार केले जात आहेत. आकाशकंदिल,दिवे व विद्युत रोषणाईने घरे उजाळून निघाली आहेत.लहान सहान मंडळी फुलबाजी,भुईचक्र, पावसाळी व कमी आवाजाचे फटाके फोडून आनंद व्यक्त करत आहेत.फराळाचे पदार्थ मनसोक्त खाल्ले जात आहेत.एकीकडे सारा गाव दिवाळीच्या आनंदात न्हाऊन निघाला आहे आणि दुसरीकडे पंडितरावांच्या घरी भयान शांतता पसरली आहे.त्यांच्या घरचे लोक दु:खात बुडाले आहेत.**

दिवाळी सणाच्या चार दिवसांपूर्वी पंडितरावांचा एकुलता एक मुलगा अपघातात मृत्यू पावला आहे.असा कसा काळाचा घाला आला आणि त्यांच्या मुलाचा भीषण अपघात होऊन तो जागीच गतप्राण झाला. ध्यानीमनी नसताना डोळ्यांदेखत मुलाचे या जगातून निघून जाणे
कोणत्या आईवडिलांना हे सहन होईल बरे! त्यांच्या सगळ्या स्वप्नांचा चुराडा झाला होता. मुलगाच जीवंत राहिला नाही तर आपण जगायचे कुणासाठी? कशासाठी?आणि ते आईवडील या दुःखातून बाहेर येण्यास तयार नाहीत!

या जगात असे कितीतरी लोक आहेत जे त्यांच्या प्राणप्रिय नातलगाच्या मृत्युमुळे दुःखात आकंठ बुडालेले असतात. आप्तेष्ठांचा मृत्यू हा सहन न होणारा व जीवनातला आनंद हिरावून नेणारा असतो.ध्यानीमनी नसताना काळाचा घाला येतो आणि आपल्या जीवलग नातलगाचा मृत्यू होतो.माझे वडील दामोदर गुळवे आणि वडील बंधू नवनाथ गुळवे यांच्या दुःखद निधनाने माझ्या कुटुंबावर जो आघात झाला तो फार जिव्हारी लागणारा होता.या दुःखातून आम्ही स्वतःला अजूनही पुरते सावरु शकलो नाही.माझा पुतण्या विजयकुमार बारावी सायन्सला होता. अभ्यास व कॉलेज नियमित कर म्हणून आईवडील थोडे रागावले. आणि ते त्यांच्या कामात व्यस्त राहिले.पुतण्याने टोकाचे पाऊल उचलले आणि त्याने गळफास लावून घेतला.त्यात तो मृत्यू पावला.त्याच्या आईवडिलांना हा फार मोठा धक्का होता.मुलाचा मृत्यू झाला यावर त्यांचा विश्वास बसायला तयार नाही.ते या वेदना देणाऱ्या दुःखातून अजुनही नीट सावरलेले नाहीत.

माझे एक शिक्षक मित्र आहेत संभाजीराव कासले.अतिशय शांत, समजदार,सुस्वभावी व सुहृदयस्थ व्यक्तिमत्त्व असलेले संभाजीराव आपल्या मुलांसोबत मित्रांसारखे राहायचे,क्रिकेट खेळायचे,विनोद करायचे.त्यांचा थोरला मुलगा आयआयटीला लागला.मोठ्या भावाचा आदर्श घेऊन लहान मुलगा नीट परीक्षेची तयारी करण्यासाठी राजस्थान कोटा येथे वास्तव्यास होता.सराव परीक्षेचा पेपर अवघड गेल्याने त्याने सहाव्या मजल्यावरुन उडी घेऊन आत्महत्या केली.ही घटना संपूर्ण भारतभर पसरली होती.या अत्यंत वेदनादायक घटनेने आम्हा सगळ्यांच्या मनाला अतिव दुःख झाले व हृदयाला पीळ पडला.संभाजीराव व त्यांच्या पत्नीची अवस्था तर कल्पनेच्या पलीकडची अत्यंत दुःखी व वर्णन न करता येण्यासारखी झाली होती.

सामाजिक व शैक्षणिक संघटनेत सतत क्रियाशील राहून समाजकार्य करणारे सुहृदयी शिक्षक व जो हाक मारेल त्याच्या



मदतीला धावून जाणारे बालाजीराव तुरेवाले सर यांच्या आयुष्यात अतिशय क्लेशदायक व मनाला खूप वेदना देणारी घटना घडली. त्यांच्या पत्नी वैशालीताई यांना हृदयविकाराच्या वेदना होऊ लागल्याचे लक्षात येताच उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. परंतु दुर्दैव असे की दवाखान्याच्या गेटवरच त्यांची प्राणज्योत मालवली.बालाजीराव तुरेवाले यांच्यासाठी हा फार मोठा आघात होता.खरे तर डॉक्टरांनी त्यांनाच हृदयविकाराचा धोका सांगितला होता.ध्यानीमनी नसताना पत्नीचे निधन झाले.हे दुःख सहन न झाल्याने त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तात्काळ दवाखान्यात भरती करण्यात आले.तेथून त्यांना पुण्याला हलविण्यात आले. त्यांच्यावर बायपास सर्जरी करण्यात आली. सरांचे प्राण वाचले.परंतु सरांच्या मनाला व हृदयाला एक सल कायमची वेदना देतेय की ते त्यांच्या पत्नीला वाचवू शकले नाहीत व पत्नीच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करु शकले नाहीत!

मानवी जीवनात सुख व दुःख हे ठरलेले आहे.आणि सुस्वभावी नातेवाईकांची संगत लाभली की जीवनात सुसुत्रता येते,जीवनात गोडवा येतो व अभिरुची निर्माण होते.परंतु,कधी कधी काळाचा घाला येतो आणि जीवलग नातलगाचा मत्यू होतो.हा मृत्यू आपल्या मनाला इतका जिव्हारी लागतो की त्या वेदना असाह्य होतात. काळ मागे पडत गेला की ते दुःख विरळ होत जाते.पण हृदयाचा एक कोपरा कायम झुरत राहतो.यालाच नात्यांमधील ओलावा म्हणतात.हा ओलावा कायम टिकून राहण्यामध्ये मानव जातीचे हीत लपले आहे.

# नकळत हरवलेल्या...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**इवल्याशा मनाच्या कुठल्याश्या कोपऱ्यात किती तरी स्मृती अगदी अलगद विसावलेल्या असतात ना!.....नकळत हरवलेल्या एकाद्या क्षणी आठवणीत येऊन रमतात. झाडे, वेली, पक्षी, ऊन सावल्या, डोंगर माथा, यांची अपूर्वाई कधीतरी डोळ्यासमोर येते अन् तन मनाला ताजेतवाने करून जाते. तेव्हाच्या उत्कंठेची अपूर्वाई जाणवते. अशा भारावलेल्या क्षणांची हिचं आगळीक कधी कधी लेखणीतून कागदावर उतरते. आजूबाजूच्या वातावरणात हरवलेलं मन आज कळत नकळत शेकोटीच्या उबिला नाही घेऊन गेलं तर नवलच.**

खर तर आज खेडेगावातील एक रम्य सायंकाळ आणि शेकोटी भोवतीची माणसे पहिली,आणि त्या दिवसांची आठवण झाली. नि मग..
त्या दिवशी असाच सहज फिरायला म्हणून गेल्यानंतर सायंकाळी डोंगर माथ्यावरून पाहिलेला गावं, झाडांमध्ये हरवलेली ती हेमंत ॠतूतली सायंकाळ अगदी गारठून पहुडलेली आणि त्यावर सायंकाळच्या वेळी पडलेली ती उतरती उन्हे, आणि भरीला म्हणून गावातली काही उंच नारळाची झाडे.त्याखाली दूरवरून दबली आहेत अशी वाटणारी काही आब्यांची आणि वेगवेगळी झाडे,कुठेतरी गावाच्या बाहेरून गेलेला ओढ्याच्या तो परिसर. अलिकडे वेगळे नावं अन् पलिकडे वेगळे नाव. झाडाझुडपातून गावावर पसरलेली ती कोवळी किरणे, झाडा आडून निघणारा तो धूर पाहताना तल्लीन झालेलं मन तेव्हा भानावर येते,जेव्हा रस्त्यांनी घरी चाललेली गुरे वासराच्या ओढीने चाललेल्या गायी त्यांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज कानी पडतो. अन् मग अनामिक ओढीने समोर एक चित्र येते. आईला पाहताच मागल दारी गोठ्यात धपडणारे ते चार दिवसाचे वासरू .अन् त्याचा बे बे आवाज आणि त्या हरवलेल्या एखाद्या क्षणी त्या क्षणाना मनाच्या कुठल्याशा कोपऱ्यात ते चित्र अगदी हुबेहूब उभे राहते. स्मृतीतून अगदी जसच्या तसं समोर येतात.अन् अशा भारावलेल्या अशाच क्षणी डोकावतो अंगणातल्या रांजनाखाली थंडगार ओलाव्याला पडलेला तो मंद कवडसा. असाच आठवणीत येऊन रमतो.अन् एक नवी स्फूर्ती देऊन जातो.या अशा कितीतरी आठवणी मनाच्या मनपटालावर रुंजी घालत असतात. हायस्कूल मध्ये असताना आठवणीतील डोंगरातलं ते डेरेदार असं भल मोठ वडाचं झाड. शाळेतून आल्यावर पाच साडे पाच वाजता



माडीच्या गैलरीतून पाहिले की त्याच्यावर पडलेली उन्हे आणि पूर्वेला दूरवर विसावलेली त्याची सावली कुठेतरी खूप जवळची वाटायची. त्यांची ती मूक भाषा काहीतरी खुणावत असायची.ती कुठेतरी खूप जवळची वाटायची याच नि आपलं काहीतरी नातं असावं का? असे नेहमी वाटतं राहायचे. तारीख वार महिना संपत जातात. तसतशी कॅलेंडरची पाने एकामागून एक उलटून जातात. दिवस वर्षे संपून काळाच्या ओघात लुप्त होऊन जातात. पण... पूर्वनियोजित असल्यासारखे ते झाड पुन्हा कुठल्याशा कारणाने जोडले जाते. तेंव्हा वाटतं राहते काही नाती खोलवर कुठतरी गुंतलेली असतात का! काही नाती निसर्गाने निर्माण केलेली असतात असे वाटते.अन् मग त्याच्याविषयीची उत्कंठा अजूनच वाढत जाते. एवढेच नव्हे,पुढे जाऊन ती शब्दांच्या रुपानं नविन आकार घेत पुन्हा एकदा आयुष्याचा भाग होतात ना तेव्हां निसर्ग विषयी चे कुतूहल वाटते. सुटलेल्या त्या क्षणांना मनाच्या एका कोपर्‍यात पुन्हा नव्याने कायमसाठी जपले जाते. तेव्हाचा तो आनंद शब्दात काय वर्णावा.....

तान्हुल्याच्या त्या हरएक दिवसाच्या बाललीलात दिवसागणिक नवनवे रुप पहायला मिळावे.आणि त्यात जे सुख मिळावे असेच... आठवणीतले सुटलेले काही सुखद क्षण रोज नव्याने जगायला नवी उमेद देवून जातात.
स्मृती पटलावरील स्मृति
ऊन सावल्यातून भेटताना
निशेत विरलेल्या कवडास्यातून पुन्हा सकाळच्या कोवळ्या उन्हात अंगाला बिलगताना
सूर्याच्या एका किरणातून आशेच्या नव्या उमेदीतमळभ दूर होऊन सारे काही स्पष्ट होताना चाआनंद शब्दात तो कसा वर्णावा. अशा अनेक आठवणी ..पण शब्दांनाही कोड पडावं की..अन्...

# विद्यार्थ्यांचे प्रेरणास्रोत साने गुरुजी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**जीवनातील वास्तवता लक्षात घेऊन ध्येयवादी प्रवृत्तीने कार्य करणाऱ्या व येणाऱ्या अडचणींना हसत हसत तोंड देणारा खरा ज्ञानी असतो हा सिद्धांत मला आवडतो ,वास्तवता स्वप्न,सृष्टी व हास्य रस या तिन्ही गोष्टीचे एकत्र मिश्रण म्हणजे साने गुरुजी होय. हे जीवनाचे गणित आज मला मान्य आहे. जीवनात जे सुखाचे क्षण येतात ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे सोनेरी व सतेज असतात; ते क्षणभंगुर राहतात आणि नंतर भडक होतात. परंतु ज्यावेळीही किरणे कोवळी दिसतात त्यावेळी त्याची तेज ते रम्य स्वरूप पाहून मला आनंद वाटतो.**


साने गुरुजींच्या प्रयत्नाने अनेक योजना, संघर्ष लढे , सभा, मिरवणुका यशस्वी झाल्या, त्यांच्या मूल्याधिष्ठित जीवन धोरणेमुळे अनेकांच्या जीवनाचे सोने झाले , आपुलकीचा, ममतेचा कर्तुत्वाचा आणि सद्भावना त्यांच्या मनात होत्या,जंगलाच्या वाटेने जात असताना उन्हाच्या वेळी एखादा झरा दिसला की त्याचे पाणी पिताना केवढा आनंद होतो तसे साने गुरुजी कडे पाहिल्यानंतर अनेक लोकांना वाटत होते .जुन्यापासून बोध आणि नव्याचा शोध घेत घेत जाणारा हा मानवी जीवन प्रवाह आहे असे ते तत्त्वनिष्ठ ध्येयनिष्ठ विचारवंत साने गुरुजी होते. मराठीतील एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, प्रतिभावंत लेखक, समाज सुधारक, स्वातंत्र्यसैनिक ,पत्रकार, समाजसेवक ,लोकशिक्षक साने गुरुजी यांची आज जयंती खरा तो एकची धर्म ।जगाला प्रेम अर्पावे।। जगामध्ये हिंदू ,मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन ,ज्यू असे कितीतरी धर्म आहेत. वेगवेगळ्या धर्मामध्ये मत मतांतरे आहेत ,तेढ आहेत पण सर्वांनीच एकमेकांशी सदभावनेने प्रेमाने वागले तर मानवी जीवन सुखी होईल जगावर प्रेम करणे हाच खरा धर्म सर्वांनी मानला पाहिजे असे आपल्याला मानवतावादी धर्म शिकविणाऱ्या साने गुरुजीचे नाव पांडुरंग सदाशिव साने असे होते. त्यांचा जन्म 24 डिसेंबर 1899 रोजी कोकणातील पालगड या गावी झाला. समाजातील जातीभेद ,अस्पृश्यता, अनिष्ट रूढी प्रथा परंपरा, वेडगळ समजूती यांना त्यांनी नेहमी विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मंदिरात त्यांनी सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून महाराष्ट्राचा दौरा केला. शेवटी उपोषण केले आणि त्यांच्या या कार्याला यश आले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यांनी मुक्त कंठाने पंढरपूरच्या विठ्ठलाला म्हटले.

संपूर्ण भारत जोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला .मानवतावाद सामाजिक सुधारणा व देशभक्ती ही मूल्ये त्यांच्या साहित्यात पावलोपावली दिसतात कथा, कादंबऱ्या ,लेख ,निबंध, चरित्रे ,कविता स्फूटलेखन यांचा समावेश त्यांच्या साहित्यात आहे त्यानी संपूर्ण हयातीत 80 पुस्तके लिहिली भारताचा शोध, तीन मुले, महात्मा गौतम बुद्ध ,कर्तव्याची हाक, सुंदर पत्रे ,सुंदर कथा, स्वर्गातील माळ असे अनेक पुस्तक प्रसिद्ध आहेत त्यात श्यामची आई ही कादंबरी आजरामर झाली, धुळे येथील तुरुंगात त्यांना कारावासाची शिक्षा झाली ,15 महिने ते तेथे होते.

मातेबद्दल असणारे प्रेम भक्ती व कृतज्ञता यांच्या अपार भावना श्यामची आई या पुस्तकात मांडलेले आहेत. पूज्य साने गुरुजी हे अतिशय मृदू संयमी व्यक्तिमत्त्वाचे होते करी मनोरंजन जो मुलाचे। जडेल नाते प्रभुशी तयांचे हे गुरुजीच्या जीवनाचे सार होते.भारतीय संस्कृती व हिंदू धर्मावर अतिशय प्रेम त्यांनी केले .

मोरी गाय, मोलकरीण या कादंबऱ्या अंतःकरणात बसतात, :* ते नेहमी सर्वधर्मसमभावाची शिकवण देतात, समतेसाठी शिक्षण असावे असे ते नेहमी म्हणत असत, हसत खेळत शिक्षण देण्यावर त्यांचा भर होता. आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी अनेक राज्यात दौरे काढून लोकांमधील तेढ एकमेकाविषयी असणारा द्वेष संपवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या मनावर महात्मा गांधीजींच्या विचाराचा प्रभाव होता. म्हणून आज संपूर्ण भारतात विद्यार्थ्यांचे श्रद्धास्थान / प्रेरणास्थान म्हणून गुरुजीला ओळखले जाते, गुरुजीचे गुरुजी अशाही त्यांना काही जण उपाधी लावतात, तसेच मातृहदयी साने गुरुजी असेही म्हटले जाते. समाजाला अंधारातून प्रकाशात आणण्याचे महत्त्वाचे कार्य जर कोणी केले असेल तर ते त्या काळात साने गुरुजींनी केले. यात तीळ मात्र शंका नाही.

निर्मळ वस्त्र परिधान करून निर्मळ मनाने मानवतावादी विचार मुखातून प्रकट करणारे एकमेव शिक्षक म्हणजेच साने गुरुजी होत . त्यांच्या साहित्यातून समाज उभा राहिला आहे. त्यांचे साहित्य दर्जेदार व मानवतावादी आहे. समाजाचे वास्तव त्यांनी त्यांच्या साहित्यात मांडलेले आहे. आई काय असते? हे त्यांनी श्यामची आई या



पुस्तकातून जगाला सांगितलेले आहे।.सुसंस्कृत व्यक्तिमत्व कोट्यावधी लोकांचे प्रेरणास्त्रोत म्हणून आजही त्यांच्याकडे पाहिले जाते .

1938 मध्ये पूर्व खानदेशात एकाएकी अतिवृष्टी झाली त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक बुडाले, सर्वत्र हालाखीची परिस्थिती निर्माण झाली सर्व शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करण्यासाठी साने गुरुजींनी जागोजागी जाऊन सभा घेतल्या ; मिरवणुका काढून कलेक्टर कचेरीवर गेले, त्यावेळेस मोठ्या संख्येने शेतकरी 1942 च्या क्रांतिपर्वात सामील झाले होते .अमळनेरच्या गिरणी कामगार युनियनचे ते अध्यक्ष झाले, किसान कामगारांची एकजूट त्यांनी बांधली. खानदेशातील धुळे, अमळनेर हे कामगार संघटनाची प्रबळ केंद्रे उभारण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे साने गुरुजीचे नाव सर्वत्र मानवतावादी व लोकशिक्षक म्हणून घेतले जाते, राष्ट्रपुरुषांच्या, देशभक्तीच्या विश्वबंधुत्वाच्या, समतेच्या ,एकात्मतेच्या अशा अनेक कविता लिहून समाजाला निःस्वार्थी पणाचा, सदगुणांचा मांगल्याचा, जनसेवेचा, देशभक्तीचा संदेश त्यांनी सर्व समाजाला दिला.

भारतीय समाजाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक पुसून काढण्याचे महान कार्य साने गुरुजींनी केले. सुंदर पत्रे मधून त्यांच्या पुतनीला सुधा हिला पत्र लिहिता लिहिता महाराष्ट्रातील सर्व मुलांना निसर्गाचे जीवनातील विविध अंगाचे दर्शन त्यांनी घडवले. काँग्रेसचे 50 वे अधिवेशन महाराष्ट्रा तील खानदेशातील फैजपूर या गावी घेण्याचे ठरले; तेव्हा साने गुरुजींनी लोकांना प्रत्यक्ष भेटून पदयात्रा काढून लोकांना माहिती दिली. निधी जमा केला, देशभक्तीपर गीते लिहून समाजात चैतन्याचे वातावरण निर्माण केले ,खानदेशातून अधिवेशनासाठी 45 हजार सभासद जमा झाले. असे महान कार्य त्यांनी केले, साधना साप्ताहिक काढून त्यामधून विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला . विद्यार्थी मासिका मधून त्यांनी परिवर्तनवादी विचार मांडले,

साने गुरुजींच्या दृष्टीने खेळ म्हणजे निष्ठा ,सत्यता आणि स्वतःचा विकास होय ,भुजंगासन, गरुडासन, शीर्षासन हे आसने ते रोज करत असत. स्वतःचे कपडे स्वतः धुवावे, खोली झाडावी, भांडी घासावी, घरात पाणी भरावे, कोणत्याही कामाची लाज वाटणार नाही हे श्रम संस्कार त्यांनी त्या काळात मुलांना शिकविले. प्रभूची लेकरे सारी ।तयाला सर्वही प्यारी। कोणांना तुच्छ लेखावे। जगाला प्रेम अर्पावे ।। असा महान संदेश त्यांनी दिला अशा विशाल विचाराचे काव्य लिहून सर्व मानव जातीला एकात्मता शिकवली. कोणी कोणाला दलित, वंचित, दीन, हीन समजू नये आपण सर्वजण एक आहोत असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो असे स्फूर्तीदायी गीते त्यांनी गाऊन देशाला मानाचे स्थान दिले आहे, प्रत्येक कर्तबगार पुरुषाच्या पाठीमागे एकादी थोर स्त्री असते असे ते नेहमी म्हणत, माता आणि मातृभूमी ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ असतात म्हणून मातृदेवो भव असे म्हटले जाते, आई विना दुसरे दैवत नाही स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी।।अशी आई बद्दल त्यांना वाटे त्यांची आई यशोदाबाई मरण पावल्यानंतर त्यांना फार दुःख झाले त्यांनी आईची आठवण म्हणून श्यामची आई ही एक करुणामय कादंबरी लिहिली या कादंबरीवर आधारित आचार्य अत्रे यांनी चित्रपट तयार केला या चित्रपटाला राष्ट्रपती कडून सुवर्णपदक मिळाले; अनेक संस्थांमध्ये हा चित्रपट करमुक्त दाखवण्यात आला. सत्कार आणि प्रसिद्धी पासून ते नेहमी दूर राहिले साहित्यिक आचार्य अत्रे यांनी *मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी म्हणून त्यांचा गौरव केला ,मराठीतील कोणत्याही मनोवृत्तीच्या समीक्षकांनी पूज्य साने गुरुजींच्या साहित्याची समीक्षा योग्य केली नाही. म्हणून त्यांच्या साहित्याचे मूल्य कधीच कमी होत नाही उलट जसा जसा काळ जातो तसे तसे ते जनमानसात अधिकाधिक मानाचे स्थान मिळत आहेत ,त्यांच्या विचारांना देशात सन्मानाचे स्थान आहे. आजही ते अनेक लोकांचे/ समाजाचे प्रेरणास्त्रोत आहेत ,आजचा विद्यार्थी काय करीत आहे ?आजच्या काही विद्यार्थ्याचे प्रेरणास्रोत वेगवेगळे नट नटी आहेत. आताचा विद्यार्थी ज्ञानार्थी नसून परीक्षार्थी झाले आहेत, श्रम प्रतिष्ठा कमी झाली, अनेक विद्यार्थ्यांचे सर्वत्र लाड केले जात आहेत.आठवीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जात आहे, त्यामुळे विद्यार्थी आळशी बनले आहेत, साने गुरुजींच्या काळातला विद्यार्थी *छडी लागे छम छम । विद्या येई घमघम*असे म्हणत असत, परंतु आजचा विद्यार्थी गुरुजीलाच भीती दाखवत आहेत. कारण त्याच्या मागे बालहक्क कायदा मजबूत उभा आहे. त्यामुळे तो वडीलधाऱ्या माणसांचा कोणत्याही मान ठेवेल की नाही, अशी शंका येत आहे, सर्वजण असे नसले तरी त्यांची संख्या काही कमी नाही असे मला वाटते, आपण सर्वांनी साने गुरुजींचे विचार आत्मसात केल्यास त्यांच्या कार्याचे सार्थक झाले;असे म्हणता येईल, त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने विठूमाऊली प्रतिष्ठान कडून विनम्रपणे अभिवादन.

# आभाळाएवढी ज्यांची उंची...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**जीवन जगत असताना आपल्याला तीन प्रकारची माणसे पाहायला मिळतात. एक म्हणजे जन्मतःच सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेली...म्हणजेच गर्भ श्रीमंत घरात जन्माला आलेली... दुसरे म्हणजे मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेली.. व तिसरे म्हणजे दोन वेळेच्या जेवणाची ही भ्रांत असणारी... असेच संकटांचे डोंगर पार करत आकाशाला गवसणी घालणाऱ्या ध्येयवेड्या माणसांची यशोगाथा म्हणजेच," आभाळाएवढी ज्यांची उंची..."हा लेखसंग्रह होय.**

सुप्रसिद्ध लेखक, संत साहित्याचे अभ्यासक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, इंग्रजी विषयाचे विद्यार्थी प्रिय शिक्षक, तबलावादक, पत्रकार, साहित्य संपादक,व्याख्याते म्हणून सर्वांना सुपरिचीत असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजेच मा.श्री. भगवान राईतकर सर होत. हिवरा आश्रम येथे शुकदास महाराज संस्थापित विवेकानंद आश्रम या संस्कार पिठात शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या राईतकर सरांनी आपल्या "आभाळाएवढी ज्यांची उंची..." या पुस्तकात समाजातील विविध क्षेत्रात संकटांचे डोंगर पार करून आपला वेगळा अमीट ठसा उमटविणाऱ्या १९ व्यक्तींचा, त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी प्रवास रेखाटला आहे. समाजात वावरत असताना आपण समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून भावी तरुण पिढीला प्रेरणादायी ठरणाऱ्या व त्यांच्या आस-पास वावरणाऱ्या काही लोकांचे कार्य या पुस्तकाच्या माध्यमातून पुढे आणण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. आपण केलेल्या कार्याला कौतुकाची थाप मिळावी असे प्रत्येकालाच वाटत असते व ही कौतुकाची थापच माणसाला पुढे प्रेरणादायी ठरते. अकोला येथील वैदेही ग्राफिक्स अँड ग्रॅव्हिटी पब्लिकेशनचे मा.श्री गजानन काटे यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले असून त्यांनीच पुस्तकाला साजेसे मुखपृष्ठही दिले आहे. अनेक मान्यवरांच्या शुभेच्छा सुद्धा या पुस्तकाला लाभल्या आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील पुन्हई या गावातील डॉ. प्रवीण सहावे यांनी आपल्या भारत देशातील (मुळव्याध) या आजाराने त्रस्त असणाऱ्या लोकांसाठी या विषयात स्पेशेलायझेशन करून ते पाईल्सचे मसिहा बनले. त्यांच्या कार्याची माहिती लेखकाने दिली आहे. मुळव्याध ,भगंदर ,फिशर, सारख्या आजारांचा योग्य उपचार करत अनेक रुग्णांना वेदनांमधून मुक्ती देणाऱ्या डॉ. सहावे यांना अनेक पुरस्कारांनी आहे सन्मानित करण्यात आले आहे. विनामूल्य शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करून ते रुग्णांची सेवा करतात. नागपूर येथे त्यांचे हॉस्पिटल असून लेखकांनी त्यांचा संपर्क क्रमांक सुद्धा प्रस्तुतलेखांमध्ये दिला आहे. पुढील लेख सतीश कृष्णा राऊत या सुतार काम ते एसबीआय मध्ये चीफ मॅनेजर पद भूषवणाऱ्या तरुणाचा प्रेरणादायी प्रवास व्यक्त करणारा आहे. प्रचंड मेहनत, जिद्द, ध्येयाने झपाटलेले कृष्णा राऊत अनेक संकटांवर मात करत स्वतःचे वेगळे विश्व निर्माण करतात. अपघातात पाठीच्या कण्याच्या बाजूचे हाड तुटलेले असतानाही पुन्हा धैर्याने उभे राहत वैदेही ग्राफिक्स व ग्रॅव्हिटी पब्लिकेशनची स्थापना करणारे गजानन काटे हेही समाजासमोर नवा आदर्श निर्माण करतात. कोरोना काळात नोकरी गमावल्यानंतर लोकमत, देशोन्नती सारख्या वृत्तपत्रा साठी काम करत स्वतःचे दैनिक विश्वजगत वृत्तपत्र निर्माण केले. काटे सर आज जवळपास१२ दैनिके, ८साप्ताहिके, काही दिवाळी अंकांचेही काम करत आहेत. वडिलांच्या पारंपारिक व्यवसाय वर्ग सातवीत असल्यापासून करणारे विष्णू पारेकर आज "सेलिब्रिटी हेअर स्टायलिस्ट "म्हणून नावारूपाला आले आहेत. आज पुण्यामध्ये त्यांच्या प्रोफेशनल हेअर सलून च्या दोन शाखा आहेत. नामांकित अकॅडमीत डिप्लोमा पूर्ण करून फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये नोकरी केल्यानंतर त्यांना ही संधी उपलब्ध झाली. कुष्ठरोगाचे निदान वयाच्या१५-१६व्या वर्षी झाल्यानंतर समाजाची मिळालेली वागणूक , त्यांतून लाभलेले काही लोकांचे सहकार्य , प्रचंड जिद्द, मेहनतीच्या जोरावर भरारी घेतलेले व्यक्तीमत्व म्हणजेच कुष्ठरोग्यांचा देवदूत सुरेश धोंडगे हे होत. कुष्ठरोगी व अपंग विद्यार्थ्यांना रोजगाराची माहिती देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम धोंडगे करतात. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

आर्थिक परिस्थिती खूपच बिकट असल्याने तिच्यापुढे हतबल न होता रांगोळी कलेतून स्वयंरोजगार निर्माण करून कुटुंबाला भरभक्कम आर्थिक हातभार देणाऱ्या कृष्णा सासवडकर यांच्या कार्याविषयी चा लेख ही भावी पिढीला प्रेरणादायी असाच आहे. लग्न, साखरपुडा, जयंती इ.बरोबरच धार्मिक कार्यक्रमांमध्ये हुबेहूब रांगोळी काढून कृष्णा यांनी विक्रम निर्माण केले आहेत. पाककलेमध्ये फारशी आवड नसतानाही पतीला




आवडणारे खाद्यपदार्थ बनवायला शिकलेल्या सौ.अरुणा आशिष तनपुरे या सुद्धा सर्व महिलांच्या समोर एक आदर्श निर्माण करतात. गृहिणी ते उद्योजिका हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे.

त्यांच्या एस. एस.टी ॲग्रो मसाला फॅक्टरीमध्ये विविध प्रकारचे मसाले व हळद पावडर, मिरची पावडर तयार केले जातात. आई-वडिलांचे छत्र हरवल्यानंतर अनाथ झालेले प्रदीप जाधव यांचा एक अनाथ मुलगा ते आंतरराष्ट्रीय खेळाडू पर्यंत प्रवास ही लेखकाने खूप सुंदर शब्दात मांडला आहे. मिक्स मार्शल आर्ट ओ-स्पोर्ट जाधव आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळतात. प्रत्येक व्यक्ती उच्च शिक्षण घेतल्यानंतरच जीवनात यशस्वी होते असे नाही तर योगेश सुभाष गारडे यांनी शिक्षण सोडून "बळीराजा गांडूळ खत"सुरू करत स्वयंरोजगार निर्माण केला. सुरुवातीला पेपर वाटप करणारे राजू लक्ष्मण चिमणगावकर आज दै. लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक आहेत. जावेद खान पठाण यांनी कबड्डीच्या खेळांमध्ये ग्राम पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत यश मिळवले आहे. तोरणा अमृततुल्य चहाचा ब्रँड निर्माते रमेश पांडुरंग चानखोरे आजच्या बेरोजगार तरुणांकडे आदर्श निर्माण करतात. पारंपारिक शेती व्यवसाय करताना द्राक्ष लागवडीतून जीवन समृद्ध बनवणारे नितीन पिसे पाटील यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रातील तरुण शेतकऱ्यांना प्रेरणादायी आहे. पुस्तक वाचन चळवळीतून प्रा. सचिन सावरकर यांनी ग्रामीण भागातील मुलांना पुस्तकाशी दोस्ती करायला शिकवले आहे. त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण केली आहे. भावी पिढीसाठी हे खूप लक्षवेधक कार्य आहे. अनाथ मुलांना मायेची छत्र दे त्यांचे नाथ बनलेल्या श्री अनंत शेळके यांचे कार्य खरोखरच खूप मोलाचे आहे. अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांना पित्यासमान माया देण्याचे शेळके यांचे कार्य खरोखरच खूप महान आहे.

आर्थिक परिस्थिती पुढे हतबल असल्यामुळे झालेल्या अल्सर सारख्या आजारातून बरे होत संकटांचे अनेक डोंगर पार करत शिक्षण घेऊन इतरांनाही शिक्षण देणारे लेखकाचे वडील म्हणजेच श्रीविष्णुदास तुळशीराम राईतकर होत. संकटात ज्यांनी साथ दिली त्या सर्वांची जाणीव ठेवून पुढील जीवनात इतरांना सहकार्य करण्याची वृत्ती जोपासत धर्मपत्नी सौ. विमल राईतकर यांच्यासह संसाराचा रथ यशस्वीरित्या ओढणाऱ्या विष्णुदास राईतकर यांचे कार्य खरोखरच प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. आपल्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित करून स्वावलंबी बनवणारे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणारे विष्णुदास राईतकर आज वयाच्या ७५व्या वर्षी सुद्धा प्रत्येकाच्या मदतीला तत्पर असतात. लेखकाचे व्यक्तिमत्त्व घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. एका तमाशा कलावंताच्या घरी जन्म घेऊनही उच्च शिक्षण घेत चाफेश्वर गांगवे आज अवघ्या महाराष्ट्रभर प्रसिद्ध निवेदक व कवी म्हणून परिचित आहेत. मानाचे समजले जाणारे ८० पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

वडील शिक्षक असताना स्वतःची आवड जोपासत गॅरेज मेकॅनिकल बनलेले रवींद्र अरुण राऊत (बालुभाऊ) यांचा टू व्हीलर दुरुस्ती पासून स्वतःचे "श्री स्वामी समर्थ ऑटोमोबाईल दुकान" सुरू करण्यापर्यंतचा प्रवासही असाच थक्क करणारा आहे. आय. टी. आय.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपली आवड जोपासत कोणतेही काम छोटे किंवा मोठे नसते तर आपण मन लावून काम केल्यास कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

अशा प्रकारे लेखक मा.भगवान राईतकर यांनी बेरोजगार तरुणांसाठी अनेक यशस्वी लोकांचा प्रेरणादायी परिचय घडवून आणला आहे. आजच्या तरुण पिढीने वाचावे यातून प्रेरणा घेऊन स्वतःचे जीवन घडवावे व सदैव संग्रही ठेवावे असे हे पुस्तक आहे. राईतकर सरांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

पुस्तक परीक्षण-लेखिका सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे,परभणी (कवयित्री लेखिका, समीक्षक,म.सा.अभ्यासिका, कार्यकारी संपादिका-साहित्य जगत ) ९८२३०६६६०६.

**पुस्तकाचे नाव -आभाळाएवढी ज्यांची उंची...**
**लेखक -भगवान विष्णुदास राईतकर**
**प्रकाशक-गजानन काटे**
**वैदेही ग्राफिक्स, अकोला**
**(ग्रॅव्हिटी पब्लिकेशन)**
**पृष्ठे -९६ किंमत-२००**

# ए.आय. : भारताची नवी गरुड झेप



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**ए.आय. हे जसे परिवर्तनशील आहे, तसे ते पारदर्शक करणे आवश्यक आहे. या क्षेत्रामध्ये सकारात्मक पैलूंचा विकास करून नकारात्मक पैलूवर मात केली पाहिजे. नव्या जगाचे ए.आय. क्षेत्रात भारत समर्थ पणे नेतृत्त्व करू शकेल एवढी क्षमता भारतीय तंत्रज्ञ व शास्त्रज्ञाकडे आहे, असा संदेश दिल्ली शिखर परिषदेने दिला आहे. त्यामुळे प्रगत विज्ञान, तंत्रज्ञान देश म्हणून भारताची प्रतिमा अधिक उजळली आहे. 2027 मध्ये भारत अमेरिकेला मागे टाकून जगामधील सर्वांत मोठी सत्ता म्हणून उदयास येणार आहे.**

नव्या जगामध्ये ए. आय. म्हणजे कृत्रीम बुद्धिमत्ता हा जणू मंत्र बनला आहे. लंडन येथे झालेल्या ए. आय. शिखर परिषदेनंतर नवी दिल्ली येथे नुकतीच कृत्रीम बुद्धिमत्ता भागिदारीसाठी 3 दिवसांची शिखर परिषद पार पडली. 28 तासांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर 28 देशांच्या प्रतिनिधीनी आणि युरोपीयन युनियनच्या सभासदांनी कृत्रीम बुद्धिमत्तेवरील जागतिक भागिदारीवर भर देणारे नवी दिल्ली घोषणापत्र स्वीकारले. भारताने या शिखर परिषदेचे आयोजन केले होते आणि जी.पी.ए.आय. या गटाचे अध्यक्ष पद भारत भूषवित आहे. विश्वसनीय दृष्टीने कृत्रीम बुद्धिमत्तेच्या जबाबदार कारभारासाठी तत्त्वे तयार करणे हा या परिषदेचा हेतू होता.

लोशाही मूल्ये आणि मानवी हक्काच्या रक्षणासाठी विश्वासार्ह, जबाबदार, शाश्वत आणि मानवी मूल्ये संवर्धनासाठी देशांच्या वचन बद्धतेची पुष्टी करण्यात आली. ए.आय. चा मानव केंद्रीत अधिक जबाबदार व पारदर्शी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. नवी दिल्ली घोषणापत्र हे 29 देशांच्या सामुदायिक लोकभावनेचे प्रकृतिकरण होय.

या घोषणापत्रामध्ये मानव केंद्री विकासावर भर देण्यात आला आहे. सर्व समावेशक्ता विकासातील सहभाग आणि जबाबदार तसेच नैतिक दृष्टीने योग्य वापरावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

जी. पी.ए. आय. हा उत्तर आणि दक्षिण अमेरिका युरोप आणि पूर्व आशियातील देशांचा समुह आहे. तो विश्वासार्ह व विकास योग्य उपयोजन आणि ए.आय. चा समर्पक वापर या दिशेन काम करण्याचा प्रयत्न करत आहे. या शिखर परिषदेच्या पहिल्या चरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घडविलेले विचार मंथन दिशा दर्शक ठरले.

ए.आय. बाबत मागील शिखर परिषद जपानमध्ये ओसाका येथे आयोजित करण्यात आली होती. या देशांनी हे मान्य केले आहे की, भागीदार देशांच्या गरजेनूसार दक्षिणेकडील जागतिक देशांची एक सर्व समावेशक चळवळ उभी करावयाची असेल तर जगातील सर्व लोकांना ए.आय. चे फायदे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असा सूर या परिषदेत व्यक्त झाला.

**प्रयोजन व साफल्य :** ए.आय. ची वाढती लोकप्रियता लक्षात घेऊन आणि त्याचे महत्त्व व उपयुक्ता या आधारे तंत्रज्ञानाचे फायदे गरीब व विकसनशील देशांपर्यत पोहचविणे हे सूत्र समोर ठेवून दिल्ली परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. प्रामुख्याने नव्या जगापुढे आज बेकारी, अज्ञान, चुकीची माहिती, पारदर्शकता, निपष्कपाती पनाचा अभाव तसेच बौद्धिक संपदा आणि वैयक्तीक बेटाचे संरक्षण यातील अडचणी तसेच मानवी हक्क आणि लोकशाही मुल्यांना वाढत असलेला धोका या सर्व समस्या डोके वर काढत आहेत. या समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी दिल्ली शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती.

“आम्ही आमच्या लोकांच्या भल्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्तेचे उपयोजन करू इच्छितो आणि कुशल प्रशासनासाठी सर्वोत्तम संभाव्य उपाययोजना करण्यासाठी क्षमतांचा वापर करू इच्छीतो''. असे प्रतिपादन करून सर्व देशांचे एकत्रीत हीत साध्य करण्यासाठी या परिषदेत चर्चा करण्यात आली. फ्रान्सचे डिजिटल संक्रमण आणि दूर संचार मंत्री जीन नोयल बॅरेट यांनी दिल्ली परिषदेच्या उद्दिष्ट व साफल्याबाबत मांडलेले मत महत्त्वाचे आहे.




त्यांच्या मते अधिकाधिक सर्व समावेशक धोरण ठेवून या परिषदेत विचार करण्यात आला. अधिक प्रमाणात अनेक विकसनशील देशांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न या परिषदेत करण्यात आला आहे. जपानचे प्रतिनिधी व संप्रेषण मंत्री हिरोशी ऐशिदा यांच्या मते विकसनशील देशांना ए.आय. साठी प्रोत्साहीत करणे हा या परिषदेचा केंद्र बिंदू होता. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना ए.आय. तंत्रज्ञानाच्या वापरासाठी वातावरण तयार करणे, त्यांना समावेशित करणे हा हेतू समोर ठेवून विचार मंथन करण्यात आले. सेनेगल हा छोटा देश सुद्धा सुकानू समिती मध्ये समाविष्ट झाला आहे. ए.आय. च्या विषय पत्रिकेचा एक मुख्य भाग कृषी क्षेत्र आहे. कृषी क्षेत्रामध्ये ए.आय. चा वापर कसा करता येईल या दृष्टीने भारताच्या योगदानाचा एक परिछेद समाविष्ट करण्यात आला होता. आणि शेतीमधील ए.आय. च्या वापराबाबत प्राधान्याने विचार म्हणून आम्ही काही नवे प्रयोग करत आहोत. शाश्वत शेतीला समर्थन देण्यासाठी ए.आय. इनोव्हेशनचा वापर भारताने स्वीकारला आहे आणि इतर देशांनी सुद्धा त्याचे अनुकरण करावे असे घोषणा पत्रात म्हटले आहे.

**मोदी यांचे प्रमेय :**

सामाजिक विकास आणि सर्व समावेशक वाढीसाठी ए.आय. क्षमतांचा पुरेपूर फायदा घेण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ए. आय. शिखर परिषदेमध्ये दिलेल्या मुख्य भाषणात प्रभावि सुत्र मांडले. त्यांनी कृत्रीम बुद्धिमत्तेची साधने दहशदवाद्यांच्या हातात पडण्याचा धोका जगासमोर मांडला. त्यांनी ए.आय. च्या नैतिक वापरासाठी जागतिक रचना चौकट (फ्रेम वर्क) तयार करण्याचे समर्पक आवाहन केले. कृत्रीम बुद्धिमत्ता मानवी विकासासाठी वरदान ठरू शकते. 21 व्या शतकामध्ये समग्र विकासाचे मोठे साधन बनू शकते परंतु ते तितकेच एक शक्तीस्त्रोत बनू शकते. 21 व्या शतकासमोर असलेल्या अनेक संकटाशी सामना करण्यास त्याचा उपयोग होऊ शकतो. त्यांनी कृत्रीम बुद्धिमत्तेच्या वापरातील समस्या व अडचणी यांचा वेध घेऊन जागतिक भागिदारीची गरज प्रतिपादन केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणामध्ये उच्च मूल्य कौशल्य अभ्यासासह आपले तंत्रज्ञान वाढविण्यावरही भर देण्यात आला. तसेच डीप फेक सायबर सुरक्षा आणि डेटा चोरीच्या अडचणी बरोबरच ए.आय. टूल चा दूरउपयोग दहशवाद्यांकडून होऊ शकतो या बाबत धोका ही त्यांनी मांडला. तसेच जागतिक सुरक्षा आणि शांतता यासाठी ए.आय. चा कसा चांगला उपयोग करता येईल या मुद्यावर विचार मंथन करावे लागेल. तसेच गैर वापर थाबविण्यासाठी ठोस उपाययोजना करावी लागेल असे, सूतोवाच त्यांनी केले. भारताने जी-20 चे अध्यक्षपद आपल्याकडे असतांना जबाबदार मानव केंद्री प्रशासन फ्रेम वर्क तयार करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यानुसार ए.आय. च्या वापरा बाबत या परिषदेत मंथन करण्यात आले. विविध अंतरराष्ट्रीय करार आणि प्रोटोकॉलचा विकास करतांना ए.आय. चा नैतिक वापर करावा लागेल. उच्च जोखिम आणि सीमावर्ती साधनांची चाचणी व उपायांचाही त्यात समावेश असेल. भारत ए.आय. च्या जबाबदार व नैतिक वापरासाठी कट्टीबद्ध आहे. भारतामध्ये ए.आय. क्षेत्रात एक लॅण्ड स्केप क्रांती घडवून आणण्याची क्षमता आहे. त्यासाठी भारत सरकार लवकरच न्याय मिशन सुरू करणार आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याची क्षमता या तंत्रामध्ये आहे. त्यासाठी सकारात्मक दृष्टीने विचार केला पाहिजे. मानवी मूल्ये आणि लोकशाही मूल्ये यावर श्रद्धा ठेवून वाटचाल करावी लागेल. नैतिक आर्थिक आणि सामाजिक समस्याकडे लक्ष दिल्यास ए.आय. वरचा विश्वास वाढेल त्यासाठी निश्चित कालावधीत जागतिक फ्रेम वर्क तयार करण्यावर त्यांनी भर दिला.

**भारताकडे नेतृत्त्व :** ए.आय. बाबत सर्व सामावेशक रचनात्मक विचारामूळे भारताकडे जगाचे नेतृत्व आले आहे. ए. आय. च्या वापराचे सर्वांगिण फायदे लक्षात घेऊन भारत सकारात्मक दृष्टीने विचार करत आहे. ए. आय. हे केवळ नविन तंत्रज्ञान नाही तर जगभरातील विकासाची चळवळ व्हावी अशी भारताची भूमिका आहे. सर्वांगिण प्रगती आणि मानवी कल्याणासाठी ए. आय. चा वापर केला पाहिजे. व्युत्पन्न आणि प्रतिभाशाली माहिती कशी विश्वासार्ह बनविता येईल यावर भारत विचार मंथन करत आहे. हे तंत्रज्ञान परिवर्तनशील आहे. ते पारदर्शक करणे आपल्यावर अवलंबून आहे. डेटा आणि अल्गोरिजमचा वापर करतांना कोणत्याही पूर गृहापासून मुक्त असले पाहिजे. नैतिक वापरासाठी फ्रेम वर्क तयार करतांना जगातील सर्व देशांनी एकत्र यावे त्यातून आंचारसंहिता तयार करावी असे भारताला वाटते. ए.आय. चे अनेक सकारात्मक पैलू आहेत पण त्याच्याशी संबंधीत नकारात्मक पैलू चिंतेचा विषय बनले आहेत.

जग आज एका नव्या युगात प्रवेश करत आहेत. भविष्यात कोणतेही निर्णय घेण्यासाठी ए.आय. हा सर्वात मोठा आधार बनू शकतो. भारत ए.आय. च्या क्षेत्रात जबाबदार आणि नैतिक वापरासाठी वचन बद्ध आहे. तसेच आज भारत ए.आय. टॅलेट क्षेत्रात एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून उदयास आला आहे. नवीन कल्पनांचा विकास करण्यास, नवीन शोध लावण्यास, तरूण भारतीय शास्त्रज्ञ संशोधक हे ए.आय. च्या क्षमता व मर्यादाचा शोध घेत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणामध्ये भारताच्या ए.आय. क्षमतावर सकल अंगानी प्रकाश टाकला व भावी काळात भारत ए.आय. क्षेत्रात जगाचे नेतृत्व करेल असा विश्वास प्रकट केला.

**समारोप :** माईक्रोसॉफ्ट कंपनीचे दक्षिण आशिया प्रमुख अहमद मजहरी यांनी अलिकडे असे प्रतिपादन केले आहे की, 2027 पर्यंत ए.आय. क्षेत्रात अमेरिकेला मागे टाकून भारत पहिल्या क्रमांकावर पोहचेल. भारतातील तरूण शास्त्रज्ञ व माहिती तंत्रज्ञान ही भारताची सर्वात मोठी क्षमता आहे. नव्या कल्पनांचा विकास आणि प्रखर बुद्धिमत्ता हे भारताचे खरे भांडवल आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे गणित, विज्ञान, भाषा, माहिती तंत्रज्ञान, समाज विज्ञान या क्षेत्रात भारत मोठी झेप घेत आहे. त्यामुळे नवी दिल्ली शिखर परिषद ही ए.आय. तंत्रज्ञानाच्या जागतिक भागिदारीत भारताचा सिंहाचा वाटा असणार आहे, याची प्रचिती देण्यात उपयुक्त ठरली आहे. नवी दिल्ली शिखर परिषदेतील घोषना पत्र भारताच्या सामर्थ्याचे व आत्मविश्वासाचे प्रतिबिंब उमटविणारे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रगतीशील नेतृत्त्वाचा हा आणखी एक आगळा वेगळा पैलू आहे. त्यांच्या काळातील वैज्ञानिक प्रगतिच्या मुकूटातील तो एक शिरपेच आहे यात शंका नाही.

# अहिंसेचा उदय होण्यासाठी ज्ञान रूजले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**चरा चरात ईश्वर पाहण्याची द्दष्टी विकसित होण्यासाठी अहिंसेच पुजारी व्हावं लागतं. जगातील सर्वच धर्माचं तत्वज्ञान जिथं आरंभ होत ती अहिंसा वृत्ती हि मानवतेचा आधारस्तंभ असून मनात ज्ञान रूजल्या शिवाय अहिंसेचा उदय होत नाही.जमिनीत बी रूजल तर नवीन रोपट जन्माला येत असत.आपल्या मनात ज्ञान रूजल तर आपोआप अहिंसा वृत्तीचा उदय होतो.आपण किती ज्ञानी आहोत अथवा आपल्याकडं ज्ञान भांडर किती आहे याच मोजमाप आपली वृत्ती कशी आहे यानुसार ठरत असतं.**

लोककल्याणकारी कार्य करण्यासाठी उपयुक्त असणारी अहिंसा वृत्ती जीवनात निर्माण होण्यासाठी आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण करणं खुप आवश्यक आणि गरजेचं आहे. एकदा आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण झालं कि आपली वृत्ती आपोआप अहिंसक होते.मानवता हे सृष्टीच भुषण असून अहिंसा हा मानवतेचा पाया आहे.अहिंसा हि मानवी जीवनातील एक अवस्था असुन हि अवस्था ज्ञानाच मनात झालेलं बीजारोपण यावर निर्धारित होत असते.निसर्गाने निर्माण केलेली सुंदर रचना अनुभवयाची असेल अथवा त्याचा खरा आनंद लुटायचा असेल तर अहिंसेचे पुजारी व्हावं लागतं. तेव्हाच वास्तविक सृष्टीच सौंदर्य अनुभवता येईल. सृष्टी वर मानवा सोबत इतर देखिल बहुतांश प्राणी वास्तव्यास आहेत त्यांना सुद्धा आपला कोणाताही उपद्रव त्रास आपल्या आचरणातून कृतितून होणार नाही असं आचरण म्हणजे अहिंसा वृत्ती असून हि वृत्ती अर्जित करणं जीवनाचं आद्य कर्तव्य असलं पाहिजे.निसर्गाच्या रचनेत हास्तक्षेप होईल असं कृत्य घडता कामा नये.मनात ज्ञान रूजल नाही तर आपसुकच आपल्या कडून कळत न कळत अहिंसा वृत्तीच उल्लंघन होऊन आपण हिंसक होतो. हिंसा कोणत्याही प्रकारची असो ती घडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज भासत नाही.अंहकार,द्वेष,स्वार्थ,मन भेद,आकस, व्यसनाचे विविध प्रकार,संगत,यापैकी एखादाही दुर्गुण आपल्या अंगी रूजला तर आपोआपच आपण हिंसक मार्गावर मार्गक्रमण करतो.हे सगळं अगदी सहज घडतं.खरे परिश्रम करावे लागतात. ते अहिंसक होण्यासाठी.भौतिक जीवनात वावरत असताना मनात ज्ञान रूजवण हे वाटत तितका सोप नसतं.हिंसा म्हणजे फक्त शरिरावर,जखम इजा जीवतीस धोका निर्माण करणं,किंवा वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान पोहचण इथपर्यंत मर्यादित अर्थाने केलेल कृत्य म्हणजे हिंसा असं आपण ढोबळमानाने मानतो समजत असतो पण वास्तवात असं नाही खरंया अर्थाने विचार केला तर सृष्टी वरील कोणाताही जीव आपल्या कृतीतून व्यथित होणार नाही याची काळजी दक्षता घेण्याची हि वृत्ती मनात ठेवून आचरण करण्यासाठी आपल्या मनात ज्ञानाच बीजारोपण झालं कि अहिंसा वृत्तीचा उदय आपोआप आचरणात होतो.मन बुद्धी,वृत्ती,व अंतःकरणाने अहिंसक होण्यासाठी ज्ञान हे मनात रूजल पाहिजे.आपल्या आचरणातून कृतितून इतर कोणताही जीव दुःखी होणारं नाही याची दक्षता हिच खरी मानवता असून मनवतेचा विकास होण्यासाठी अहिंसा वृत्तीच बीजारोपण झालं पाहिजे.एकदा अहिंसा वृत्ती निर्माण झाली कि आपोआप आपल्या मध्ये असणारे सगळे सात्विक लोककल्याणकारी गुण नक्कीच प्रकट होऊन त्याचा उपयोग इतरांना झाल्याशिवाय राहणार नाही. सृष्टीच सौंदर्य अहिंसेत आहे सृष्टी



वरील कोणत्याही प्रकारच्या जीवाला आपल्यामुळे वेदना दुःख होणार नाही.याची काळजी घेणं खुप गरजेचं आहे.एकमेका सहय करू अवघे धरू सुपंथ सृष्टीच्या रचनेतील सगळे पशु पक्षी प्राणी,वेगवेगळे जीव हे आपलं कर्म बंधन घेऊन आले आहेत. प्रत्येक जण आप आपल्या कार्यक्षेत्रात आपलं जीवन जगत आहे.मग इतरांना त्रास इजा होईल असं आचरण करण कित पत योग्य आहे. मानव हा पृथ्वीवरील सगळ्यात बुद्धिमान शक्तिशाली बलाढ्य प्राणी आहे.पण आज आपण सृष्टी वरील इतर जीव सृष्टी सह परस्परांना कसं आशांत आणि अस्थिर करता येईल यासाठी प्रयत्नशील असून आपण स्वतःची व इतरांची शांती हिरावतो आहोत याची जाणीव जागृती सध्या लोकांना राहिली नाही.याच कारणही तसंच आहे ज्ञान आहे पण ते मनात रूजल नाही.त्यामुळे त्याचे दुष्परिणाम हे आपल्याला सगळीकडे सध्या दिसत आहे.आणि हि परस्थिती हाता बाहेर जाऊ नये म्हणून योग्य वेळी सावध होण्याची आवश्यकता आहे.ज्ञान मनात रूजण हि काळाची गरज आहे.हि काळजी दक्षाता घेतली तर नक्कीच आपल्या जीवनात अहिंसेचे अनुकरण होईल.याचा लाभ निसर्गाचं सौंदर्य रक्षण संवर्धन करण्या सोबतच सृष्टी च्या कल्याणार्थ नक्कीच योग्य लाभ होईल.मनात ज्ञानाच बीजारोपण झालं तर या हिंसेच्या प्रभावातुन आपला बचाव होऊन जगाचं कल्याण करणारी अहिंसा त्याचे खरे पाईक आपण ठरतो.

# तुका म्हणे सांडा देखीचा दिमाख। मोडसीचें दु:ख गांड फाडी॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**शांती! आनंद! हाच तुकोबांच्या जीवनातील अनादी अनंत उद्देश! तुकोबांची घरातील आणि सांप्रदायातील परंपरा मोठी समृद्ध आहे. घरात पणजोबापासून पंढरीची वारी, भजन-कीर्तन परंपरा चालत आली होती. याच्या जोडीला जवळच्याच आळंदीचे संत ज्ञानदेव, पंढरपुरचे संत नामदेव, पैठणचे संत एकनाथ, संत चोखोबा, संत सावतोबा, संत गोरोबा, संत कबीर, संत जनाबाई, संत कान्होपात्रा आणि अन्य संतांचे अनमोल वैचारिक वाङ्मय त्यांना चिंतन करण्यासाठी उपलब्ध होते. थोडीफार अक्षर ओळख असलेले तुकोबा या सर्वच लेखनाकडे चुंबकासारखे आकर्षिले गेले. त्यांच्या अभंगातून त्यांचे विचार आणि जीवनाचे सखोल ज्ञान झाले. नामदेवांची लडिवाळ भक्ती, जनाबाईचे सडेतोड देवाकडे तक्रार करणारे अभंग, ज्ञानदेवांची ज्ञान-भक्ती-वैराग्य या दृष्टीने लिहिलेली ज्ञानेश्वरी, अभंग, हरिपाठ, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, चोखोबांचे जात उतरंडीच्या त्रासाचे अभंग निवेदन, सावतोबाचे निसर्ग-कर्मातील देवाचे अस्तित्व, कान्होपात्रेची भक्ती, नाथांची भारुडे आणि भागवत, कबिरांचे दोहे इत्यादी वाङ्मय तुकोबांना जीवनाचे चिंतन करायला प्रवृत्त करत होते.**

दुसरीकडे युवा तुकोबांना संसारातील अनंत अडचणींनी विळखा घातला होताच! आई-वडिलांचे निधन, मोठा भाऊ घरातून निघून जाणे, पहिली पत्नी आजारी असल्यामुळे दुसरा विवाह, दुष्काळ, गुरे-ढोरे मरणे इत्यादी संकटांची मालिकाच त्यांच्या जीवनात सुरु होती. एवढे सगळे 'दुःख मूळ' सुरु असतांना याच्या जोडीला समकालीन धर्ममार्तंडांनी आपला डाव साधला नसता तर नवल! याचा परिपाक असा झाला की; तुकोबांना या सर्वच बाबींचा प्रचंड वीट आला आणि ते नामे निराळे होऊन कधी भंडारा तर कधी इंद्रायणी तीरी एकांतात एकतारी घेऊन भजनाद्वारे आत्मसंवाद करत बसत. हे करत असतांना ते अनेक अभंग उत्स्फुर्तपणे म्हणत असावेत, परंतु ते ओसंडून वाहणारे शब्द लिहून घेण्यासाठी त्यांच्या सोबतीला कुणीही नसल्यामुळे ते हवेत विरून गेले. त्यातील काही रचना त्यांच्या मनात शिल्लक राहायच्या, त्या ते सायंकाळी एखाद्या कीर्तनात किंवा भजनात ऐकवायचे!

**नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ॥१॥ देहाच्या निग्रही त्याचा तो सांभाळी । मग नये कळि अंगावरी ॥ध्रु.॥ आपुलिया इच्छा माता सेवा करी । न बाधी ते थोरी येणें क्षोभें ॥३॥ तुका म्हणे सांडा देखीचा दिमाख । मोडसीचें दुःख गांड फाडी ॥४॥**

**तुकारामनीती**
**भाग -७३**

त्यापैकी हा एक त्यांचा वैराग्याने ओतप्रोत अभंग.

संत असो की सामान्य माणूस, त्याने कसे वर्तन करावे? या संदर्भात हा अभंग आजही तेवढाच अनमोल आणि अनुकरणीय आहे. महाबोधी तथागत बुद्धांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे 'इच्छा हेच संपूर्ण दुःखाचे मूळ आहे!' याच न्यायाने संसारात लोकांती किंवा एकांती जीवन जगतांना कुणाकडूनही आपली सेवा घडावी किंवा कुणीतरी आपला उदोउदो करावा अशी इच्छा कधीही करू नये. असा विचार करणे आणि कुणाकडून काहीतरी सेवा करून घेणे म्हणजे खऱ्या अर्थाने ईश्वराची अवज्ञा होय. ईश्वर म्हणजे काय? तो कुठे असतो? मंदिर-मस्जिद-चर्च-गुरुद्वारा-स्तूप इथे माणूस ईश्वराला शोधतो आहे, पण तो तिथे कुठेही नाही. तो तुमच्या माझ्या हृदयात विराजमान आहे. आपला श्वास म्हणजेच ईश्वर! आपले चित्त, मन आणि हृदय सदैव शांती-प्रेम-आनंद-कणव-करुणा-आपुलकी-जिव्हाळा-गोडवा इत्यादी अलौकिक सद्गुणांनी ओतप्रोत असणे म्हणजेच खरे ईश्वराचे आढळ स्थान! हाच ईश्वर! हीच त्याची जागा. कस्तुरी मृगाप्रमाणे आजही आपण ईश्वराचा शोध घेण्यासाठी रानोमाळ भटकत आहोत. कोण कुठे जातोय तर कोण कुणाला तरी मला आनंद-सुख कशात भेटेल? हे विचारण्यासाठी गर्दीचा बळी ठरतोय. माय-बापहो, ईश्वर हा आनंद, शांती, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सहृदयता यातच सामावलेला आहे. तो दुसरीकडे कुठेच नाही. त्यासाठी आपण देह सेवेच्या आग्रहाऐवजी निग्रह करायला हवा.

आपण आपली सर्व कामे आपण स्वतः करायला हवी. असे झाल्यास कली आपल्यावर स्वार होणार नाही. कळी किंवा कली स्वार होणे म्हणजे काय? आपल्यात षड्विकार संचारणे म्हणजे कली स्वार होणे! काम-क्रोध-लोभ-मद-मोह-मत्सर यांनी आपल्या हृदय-मनाची जागा घेणे म्हणजेच मंदिराचे अस्तित्व संपणे होय. या सर्वच दोषाच्या मुळाशी इच्छाच आहे. तुकोबाराय याला मातेच्या सेवेची जोड देतात. बाळाची आई लहानपणी कोणत्याही इच्छेशिवाय त्याची सुश्रुषा करते. आई कोणत्याही थोरवीसाठी आपल्या बाळाचे संगोपन करत नाही. बाळाची शी-शु काढण्यापासून ते त्याला न्हाऊ-माखू घालणे, नटवणे इथपर्यंत कामे मोठ्या आवडीने करते! आपले बाळ सुंदर दिसायला लागले की; आईचा आनंद गगनात मावत नाही! बाळाला मेकअप काही कळत नसतं, ते फक्त आई आपल्या वात्सल्याखातर करंत असते. हेच वात्सल्याने ओतप्रोत असणारे आईचे हृदय आपला बाळ मोठा झाल्यावर रहात नाही. का? याचे कारण म्हणजे बाळ आणि आईच्या हृदयातील निरागस प्रेमाने अपेक्षेची, इच्छेची जागा घेतलेली असते. इथेच खरी समस्या निर्माण होते. त्यासाठी आईने आपली थोरवी आणि बाळाने आपले प्रेम कमी न होऊ दिल्यास मरेपर्यंत माय-लेकराचे प्रेम अबाधित-वैश्विक राहील यात तिळमात्र शंका नाही! त्यासाठी जगद्गुरू तुकोबाराय शेवटच्या चरणात आपल्या सर्वांनाच सणसणीत चपराक देऊन जाग्यावर आणतात. तुकोबा एखाद्या महान शल्यचिकित्सकाप्रमाणे आपले निदान करतात. एखाद्याला मोडशी म्हणजेच हगवण लागल्यानंतर काय काय त्रास होतो? पोटात कळा येणे, वांरवार सौच्याला जाऊन जाऊन अनंत हाल होतात. त्यासाठी माणसाने योग्य आहार घेणे जसे गरजेचे आहे, त्याच शरीर धर्माच्या न्यायाने माणसाने देखीचा दिमाख म्हणजे दाखवेगिरी करू नये. मी कोण? माझी ओळख काय? माझे पद-पदवी काय? यापेक्षा मी समाजाच्या किती उपयोगी येतो? माझ्याकडून कुणाला काहीही लाभ होत नसेल तर माझे पद-पदवी काय कामाची? याचे नित्य चिंतन व्हायला हवे. असे झाले तरच तमाम मानव जात आनंदी-निरोगी राहील अथवा मोडसी झालेल्या रोग्याप्रमाणे प्रत्येकाची अवस्था होईल! आज



आपण पळतोय, पण कुठे? कशासाठी? आपले धेय्य काय? याचा पण चालतांना सर्वांगीण विचार व्हायला हवा. त्यासाठी तुकोबांच्या अभंगांचे सखोल चिंतन आणि मनन होणे कळीची आणि काळाची नित्य नित्य गरज बनली आहे.

वर्तमानात सगळीकडे धावाधाव सुरु आहे. ज्याला काहीच कळत नाही तो पण मुंबई शेअर मार्केट किती वाढले-पडले? च्या गप्पा करतोय. मिडीयाने जवळपास ७० टक्केपेक्षा जास्त लोक गिळंकृत केले आहेत. पाच मिनिटे सुद्धा आपण स्क्रीनपासून वेगळे राहू शकत नाही. कुणाच्याही हातात फक्त आणि फक्त मोबाईल! पैसे द्यायचे-घ्यायचे? मोबाईल. खरेदी? मोबाईल. विक्री? मोबाईल. शुभेच्छा? मोबाईल. हसलं? मोबाईल. रडलं? मोबाईल. उठलं? मोबाईल. बसलं? मोबाईल. जन्मलं? मोबाईल. मेलं? मोबाईल. भजन? मोबाईल. कीर्तन? मोबाईल. आता तर लग्न सुद्धा मोबाईलवरच लागत आहेत. निश्चितच हे माणसातील जिवंत माणूस जाळण्याचे उत्तम साधन बनले आहे. आज चार-दोन टक्के सृजन सोडले तर कुणाच्याही हातात पुस्तक दिसत नाही. याचा अर्थ पूर्णपणे मोबाईल वापर हा घातक आहे असे नाही, परंतु त्याच्या वापरावर मर्यादा येणे मात्र काळाची गरज बनली आहे. असे नाही झाले तर प्रत्येकाची अवस्था मोडशी झालेल्या रूग्णासारखी होऊ शकते.

आज कुणाकडे वेळच नाही! काय करतात? तर काहीच नाही. एक काळ होता, माणसे देवाण-घेवाणीसाठी एकमेकांकडे जायचे. चहा-पाणी, उठ-बस व्हायची. गप्पा-टप्पा व्हायच्या. ख्याली-खुशाली-पाहुणचार व्हायचा. आज मात्र येणे-जाणे, भेटी-गाठी बंद झाल्यात. आता रक्षाबंधनाला भाऊ बहिणीकडे जात नाही, भाऊबीज-दिवाळीला बहिण भावाकडे येत नाही. परिणामी ओव्या गाऊन आपल्या दादाला दीर्घायुष्य मागणारी ताई वडिलांच्या संपत्तीचा हिस्सा मिळावा म्हणून चक्क न्यायालयात आहे! मनामनात आणि त्यातूनच माणसामाणसाच्या हृदयात गाठी निर्माण झाल्या! ब्लॉकेज निर्माण झाले. हल्ली जवळ बसलेला माणूस बाजुच्याला बोलत नाही. माणसं अति आत्मकेंद्रित झाली. प्रत्येक जण मी, माझा मोबाईल अन माझा मिडिया! यातच गुंतला आहे. पण त्यावर आपण काय पाहतोय? ऐकतोय? हे कुणाच्याच ध्यानात येत नाही. परिणामी ऐन तिशीतील तरुण दुष्टीदोष, डोकेदुखी, शुगर, बिपी, हृदय विकार आदिच्या विळख्यात आलाय. याचे कारण आपण शोधणार की; आणखीणच खोल खोल गर्तेत जाणार? ही मोठी गंभीर बाब आहे. यावर आपण सार्वांनीच सखोल चिंतन करणे काळाची गरज बनली आहे. दिवसभरात काही तास तरी मोबाईल, स्क्रीन सोडून बाहेर फिरायला जाणे, प्रार्थना स्थळी जाणे, पुस्तक घेऊन वाचत बसने, घरातील व्यक्तीशी गप्पा मारणे, आपल्या लेकरांच्या वह्या-पुस्तके-दप्तर तपासणे इत्यादी कामे करायला वेळ दिला पाहिजे. त्याचबरोबर दिवसातील एकवेळचे जेवण सर्वांनी एकत्र बसून केलेच पहिजे. घरातील पुरुषांनी स्वयंपाक घरात काय सुरु आहे? मृत मोबाईलवर व्यर्थ वेळ घालवण्यापेक्षा घरातील जिवंत माणसांना, आपल्या पत्नीला काही मदत करता येईल का? याचा विचार का करू नये? असे केल्यास आपल्यापर्यंत येणारे चवदार, खमंग, गरम गरम जेवण कसे येते? ते कळेल. एखादेवेळी चपाती भाजून पहावी. चटका बसल्यानंतर करणाराची किव येईल! असे झाले म्हणजे घरातील एकमेकांचे संबंध आणखी दृढ होतील. घराघरातील अन्न प्रसाद होईल! माणसं आनंदी, निरोगी, प्रसन्न होतील! असे होणे म्हणजेच तुकोबांच्या अभंगांचे आणि त्याच न्यायाने चालणाऱ्या या तुकाराम नीतीचे फलित होईल! जय तुकोबाराय!

# दहशतवाद्यांचा लष्कराच्या ताफ्यावर पुन्हा हल्ला



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**एकिकडे सत्ताधारी जम्मू काश्मीरमधून दहशतवाद्यांचा नायनाट करण्यासाठी प्रयत्न करत असतानाच दुसरीकडे या भागात दहशतवादी आणि कट्टरतावाद्यांचा सुळसुळाट वाढताना दिसत आहे. त्यातच एका घटनेनं संपूर्ण देशाला हादला दिला. गुरुवारी रात्री येथील राजौरी भागात दहशतवाद्यांनी लष्कराच्या ताफ्यावर हल्ला करत लष्करी वाहनाला निशाण्यावर घेतलं. ज्यामुळं या भागात परिस्थिती प्रचंड तणावात पाहण्यास मिळाली.**



दहशतवाद्यांनी लष्कराच्या वाहनाला निशाणा करत केलेल्या या बेछूट गोळीबारामध्ये ४ जवान शहीद झाले, तर तीन गंभीररित्या जखमी झाल्याचं सांगण्यात आलं. दहशतवाद्यांच्या या भ्याड हल्ल्यानंतर आता सूडाच्या भावनेनं पेटून उठलेल्या भारतीय लष्करानं पूंछ, राजौरी भागामध्ये शोधमोहिम हाती घेतली आहे. राजौरीमध्ये सुरु असणाऱ्या या दहशतवादी कारवाया आता पुन्हा एकदा डोकं वर काढू लागल्याचं चित्र पाहायला मिळत असतानाच प्रत्येक हल्ल्याची परतफेड करण्यासाठी भारतीय लष्करानं कंबर कसली असून, आता या भागाताच कानाकोपरा पिंजून काढला जात आहे. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार दहशतवादी हल्ला करण्यासाठी 'गोरिल्ला युद्ध निती'चा अवलंब करत आहेत. जिथं ते हल्ला केल्यानंतर दाटीवाटीच्या जंगलांमध्ये लपण्यासाठी आधार घेत आहेत. जंगलाच्या दुसऱ्या बाजूनं बाहेर पडत हे भ्याड हल्लेखोर पुन्हा नव्यानं हल्ल्यांसाठी सज्ज होकत आहेत. राजौरी आणि पूंछ सीमाभागात ढेरा की गली आणि बुफलियाज या भागांमध्ये घनटाद जंगलांचं प्रमाण अधिक असल्यामुळं लष्कराच्या शोधमोहिमेत अनेक आव्हानं उभी राहत आहेत. पीटीआयच्या वृत्तानुसार, पाकिस्तानी दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा (एलईटी) ची शाखा असलेल्या पीपल्स अँटी फॅसिस्ट फ्रंट (पीएएफएफ) या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. शहीदराजौरी आणि पूँछ जिल्ह्यांच्या सीमेवरील ‘ढेरा की गली’ आणि बुफलियाज दरम्यानचा भाग घनदाट जंगलाचा आहे. तेथून पुढे चमरेर आणि भाटा धुरियन जंगल लागते. याच भागात या वर्षी २० एप्रिलला लष्कराच्या वाहनावर झालेल्या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले होते.मे महिन्यात, चमरेर जंगलात ५ जवान शहीद झाले आणि एक प्रमुख अधिकारी जखमी झाला. एक विदेशी दहशतवादीही मारला गेला.ऑक्टोबर २०२१ मध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या दोन हल्ल्यांमध्ये नऊ जवान शहीद झाले होते. ११ ऑक्टोबरला चमरेर येथे एका कनिष्ठ अधिकाऱ्यासह (जेसीओ) पाच जवान शहीद झाले, तर १४ ऑक्टोबरला जवळच्या जंगलात एक जेसीओ आणि तीन जवान मारले गेले होते. या आधीजम्मू आणि काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यात भारतीय लष्कराच्या जवानांवर दहशतवाद्यांनी मोठा हल्ला केला होता. बारामुल्ला जिल्ह्यातील हीगम परिसरात लष्करी जवानांच्या वाहनांच्या ताफ्यातील एका वाहनावर हा दहशतवादी हल्ला करण्यात आला होता.

यानंतर सर्वात मोठा दहशतवादी हल्ला जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील लेथपोराजवळ श्रीनगर-जम्मू महामार्गावर जहालवाद्यांनी आयईडीचा स्फोट घडवत केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांच्या बसला लक्ष्य केलं.या हल्ल्यात ३४ जवान ठार झाले होते.

पाकिस्तानी दहशतवादी कधी सामान्य जनतेला तर कधी लष्कराच्या जवानांना लक्ष करत आहे. सामान्य लोकांना लक्ष करण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्याचे प्रमाण कमी न होता वाढतच आहे. भारताला लष्करी ठाण्यांवर होत असलेले हल्ले रोखण्यात फारसे यश आले नाही. सार्जिकल स्ट्राईक नंतर लष्करी तळावरील व जवांनवरील हल्ले कमी न होता वाढतच आहे.भारताला पुन्हा एकदा ठोस प्रत्युत्तर देण्याची गरज आहे.

एखाद्या देशाच्या सार्वभौमत्वाचा फायदा घेत तेथील दुर्गम भागांत सक्रिय असणारे दहशतवादी गट अन्य देशांत दहशतवादी कारवाया करतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक व सुरक्षात्मक उपाय म्हणून त्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देण्यात काहीच गैर नाही. ९/११सारखे दहशतवादी हल्ले टाळण्यासाठी संबंधित देशांपुढे स्वसंरक्षणाचा पर्याय खुला आहे, असे सुरक्षा परिषदेच्या १,३६८ (२००१) आणि १,३७३ (२००१) या ठरावांत म्हटले आहे. संयुक्त राष्ट्र सनदेच्या ५१व्या कलमानुसार प्रत्येक देशास दहशतवादी संघटनांच्या हल्ल्यास प्रत्युत्तर देण्याचाही अधिकार आहे.

# मंगलमैत्रीने पहाटचा शीतल वाराही गंधाळून गेला !

## भोकर शहरात श्रामनेर संघाची प्रभात फेरी : बुद्धविचारांचा जागर

आधुनिक केसरी न्यूज

भोकर : बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून भिख्खू संघ बूध्दाच्या विचाराची पेरणी करीत आहेत.शहरात श्रामनेर शिबिर सुरू असुन पहाटेच्या अल्हाददायक वातावरणात शहरातील प्रमुख मार्गावरून फेरी काढून बूध्द विचार पेरीत आहेत..गुलाबी, बोच-या थंडगार हवेच्या मखमली झुळकीत..बूध्दाच्या मंगलमय मैत्री भावनेने रम्यपहाट आणि शीतलवाराहि गंधाळुन जातो आहे.

भारतीय बौद्ध महासभा शाखा भोकर व महात्मा फुले नगर यांच्या संयुक्त विद्यमाने लुबींनी बूध्द विहाराच्या प्रांगणात दहा दिवशीय श्रामनेर व बोध्दाचार्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. रविवारी (ता.२४) शिबीराचा समारोप होणार आहे. शिबीरात भारतीय बौद्ध भिक्खू महासंघाचे अध्यक्ष भंन्ते बी. संघपाल याच्या प्रमुख उपस्थितीत श्रामेनेर झालेल्या (४६) जणास प्रवचनातून नित्य धम्मऊपदेश दिला जातो आहे. या शिवाय शहरातील प्रमुख मार्गावरून पहाटेच्या सुमारास फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.फेरीत भिख्खू संघ, ऊपासक, ऊपासीका सहभागी होत आहेत. सदरील फेरीत भगवान गौतम बुद्ध यांनी दिलेल्या विचाराचा जागर केला जातो आहे. पहाटेच्या रमनीय वातावरणात बूध्दविचाराचे स्फुल्लिंग तनमन प्रभूल्लीत करीत आहेत. गारवा पांघरूण बोचणा-या थंडीत नवचैतन्य फुलुन येत आहे. नव्हे तर अशा मंगल भावनेनी वैभव संपन्न रम्य पहाट अधिकच तजेलदार होत आहे. हिरव्यागर्द तर्ण पात्यावर पडणारे दव नव तजेलता बहाल करते आहे. बुध्दानी दिलेल्या प्रज्ञा,करुणा,शिलाचे आचरण, आर्य अष्टांगिक मार्ग, पंचशील आणि त्रिशरणाने माणसाला नवा आयाम मिळतो हे अधोरेखित केले जात. पहाटेच्या रम्यप्रहरी मंगलमैत्री भावनेनी परीसर अक्षरशा गंधाळुन गेला



आहे. शिबीरात भन्ते महानाम, भन्ते बोधीधम्मो याचाहि सहभाग आहे. शिबीर यशस्वी करण्यासाठी शाखेचे अध्यक्ष बाबूराव सोनकांबळे, साहेबराव मोरे, अप्पाराव येरेकार, डी.जी. सोनकांबळे, संजु गर्जे, गोविंद गायकवाड, संघपाल पाटील, श्रीधर घूले, राजु दांडगे, भीमराव दूधारे परिश्रम घेत आहेत.



## अनुलोम अनुगामी लोकराज्य व अभियान संस्थेच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यामधील लिहा जहागीर येथे अनुलोम-अनुगामी लोकराज्य महाअभियान संस्थेच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा गावातील गरजू लाभार्थीने लाभ घेतला.ह्या शिबिरात गावातील ११२ लाभार्थींने आपले नेत्र तपासून घेतले.. यात १२ जणांना मोतिबिंदू असल्याचे निष्पन्न झाले. याचबरोबर ज्यांना नंबर आहे अशा गरजूंना अल्प दरात चष्मा उपलब्ध करून देण्याचे काम अनुलोम संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी अनुलोम चे भाग जनसेवक सुहास दुतोंडे, वस्तीमित्र समाधान पाटील नवले, स्थानमित्र ज्ञानेश्वर रसाळ यांनी मेहनत घेतली. यावेळी सरपंच सुधाकर पवार, उपसरपंच ज्ञानेश्वर निकम,माजी सरपंच आसाराम पाटील चव्हाण,माजी चेअरमन फकीरराव बनकर, सुखदेव पवार, भावसिंग बैनाडे, महादु दांगोडे, परमेश्वर सावळे, सुर्यकांत वाघ, कारभारी बनकर, योगेश नवले, नारायण रसाळ, गणेश करवंदे, सह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## निरोगी राहण्यासाठी आपले गाव हागणदारीमुक्त असावे : प्रा.योगेश चोपडे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे दि.२२ रोजी गाव हागणदारीमुक्त असावे यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो. आरिफ मो. लुखमान ग्रामसेवक सुधीर भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा भरविण्यात आली होती.पाणी, स्वच्छता आणि आरोग्य हे आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनातील तीन महत्त्वाचे घटक आहेत. स्वच्छता ही काळाची गरज असून लोकसहभाग ही तितकाच महत्त्वाचा आहे. ग्रामसभा ही केवळ प्रबोधनासाठी उपलब्ध साधन नसुन ती गावाला दिशा देणारी विशेष सभा आहे. तसेच गाव स्वच्छतेसाठी ग्रामसभा प्रभावशाली साधन असून नागरिकांचे आरोग्य सदृढ, निरोगी राहण्यासाठी गाव सातत्याने हागणदारी मुक्त असावे.अशी माहिती प्रा योगेश चोपडे यांनी बोलताना सांगितले. त्यासाठी सुंदर, स्वच्छ गावची ओळख निर्माण करण्यासाठी नागरिकांनी समाजाप्रती आपले निरंतर कर्तव्य पार पाडावे आणि ज्या नागरिकांनी आतापर्यंत शौचालय बांधलेले नाही अश्या नागरिकांनी तात्काळ अमोल राऊळकर आँनलाईन अर्ज भरून द्यावे व आपले शौचालय बांधून घ्यावे .असे आवाहन उपसरपंच मो आरिफ मो लुखमान यांनी ग्रामसेभेत येथे केले सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा पार पडत आहेत. सावळदबारा ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेतून झाली. याप्रसंगी ग्रामसभेला सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे,मो आरिफ मो लुखमान, ग्रामसेवक सुधीर भालेराव, सरपंचपती शिवाआप्पा चोपडे, ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर,प्रा योगेश चोपडे, डॉ विठ्ठल कोते, विठ्ठल आप्पा, पंढरी गिरी, पांडुरंग टिकारे, ग्रामपंचायत कर्मचारी सुभाष मानकर,आणिल राजपूत, अमोल राउळकर,संजय नप्ते, पत्रकार बंन्धू,यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कृषी.उ.माजी सभापती शिवाआप्पा चोपडे म्हणाले की, संपर्ण ग्रामीण महाराष्ट्र सन २०१८ मध्येच हागणदारी मुक्त म्हणून जाहीर करण्यात आला होता. तथापि सन २०१८ नंतर राज्यातील ग्रामीण भागात नवीन कुटुंबाची वाढ झाली असल्याने नव्याने वाढलेल्या ठिकाणी वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय शासन स्तरावरून करून देण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी युवक प्रदेश उपाध्यक्षपदी प्रा. प्रशांत सुधीर गोळे यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे निष्ठावंत आणि धडाडीचे युवा नेतृत्व म्हणून प्रा. प्रशांत सुधीर गोळे हे संपुर्ण जिल्ह्यात सुपरिचित आहेत. त्यांच्या कामाची योग्य दखल घेत, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनात युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी प्रा. प्रशांत गोळे यांची युवक प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. मुंबई येथे त्यांना सदर नियुक्तीचे पत्र देण्यात आले आहे. प्रा.प्रशांत गोळे यांची राष्ट्रवादी युवक प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मुंबईत त्यांना नियुक्तीपत्र युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या मान्यतेने दिले. प्रा. प्रशांत गोळे हे माझी जिल्हा परिषद सभापती सुधीर पाटील गोळे यांचे चिरंजीव आहेत. याआधी त्यांच्या वडिलांनी तालुक्यासह जिल्ह्यामध्ये विविध पदे जसे की अध्यक्ष संजय गांधी निराधार समिती,बालाजी सहकारी पार्टिकल बोर्ड संचालक, सभापती जिल्हा परिषद, सदस्य ग्रामपंचायत इत्यादी पद्य भूषवले. त्यांचा राजकीय सामाजिक वारसा घेऊन अल्पावधीतच गेल्या सात ते आठ वर्षांमध्ये समाजकारणासह राजकारणामध्ये उत्तुंग भरारी घेतली. कदाचित स्व.अरुण बाबा इंगोले तथा स्व.विनायक मेटे त्याच्याशी असलेले सौख्य सुद्धा कामी आले असावे; प्रा.प्रशांत गोळे म्हणाले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून पक्ष संघटना मजबुतीने उभी करण्यास हातभार प्रामाणिकपणे करीन ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. माझ्यावर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, तथा पार्थ दादा पवार आणि सुरज भाऊ चव्हाण , जिल्हाध्यक्ष वाशिम व तसेच महाराष्ट्रात सह जिल्ह्यातील सर्व वरिष्ठांनी शिफारस करून ही मोठी जबाबदारी टाकली. पक्षाने दिलेल्या जबाबदारीला योग्य न्याय देताना अजित दादांनी टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरवून अजितदादा च्या विचाराचा आमदार रिसोड - मालेगाव मतदार संघात आणण्यासाठी जीवाचे रानकरू ही इच्छा देखील व्यक्त केली.




आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

टोमॅटो सूप बरोबरच मनचाव सूप सुद्धा सर्वांना तेवढेच मनापासून आवडते. हे इंडो चायनीज सूप प्रकारात मोडते. हॉट अँड सोअर सुपा सारखेच पण थोडे माईल्ड. .कमी आंबट, कमी तिखट, भाज्या भरपूर असे असल्यामुळे जास्त टेस्टी लागते. म्हणून हे आरोग्यासाठी उत्तम असल्यामुळे बाराही महिने आवडीने घेतात . उन्हाळ्यात जास्त स्पायसी, आंबट पदार्थामुळे ऍसिडिटी होण्याची शक्यता असते. म्हणून इंडोचायनीज सुपामध्ये हे जास्त बनवले जाते.

**साहित्य :** 2 चमचे ओलीव्ह ऑइल , 3 चमचे कॉर्न फ्लोअर , 2 चमचे टोमॅटो केचप , 1 चमचा लसूणाचे एकदम बारीक तुकडे , अर्धा इंच आल्याचे तुकडे , 1 चमचा सोया सॉस , अर्धा चमचा रेड चिली सॉस किंवा 2 हिरव्या मिरच्यांचे तुकडे , 2 चमचे कांदा पात ,2 चमचे कोथिंबीर , पाव कप कोबी ,1 सिमला मिरची , 2 चमचे गाजराचे तुकडे , 2 चमचे बीन्स ,2 मशरूम , 2 चमचे कांदा , 2 चमचे सेलरी, चवीनुसार मीठ.

**कृती :** प्रथम भाज्या स्वच्छ धुवून एकदम बारीक कट कराव्यात . मग गॅसवर कढई मध्ये तेल घालून त्यात कांदा पारदर्शक होईपर्यंत परतावा .नंतर मशरूम सॉफ्ट होईपर्यंत परतावेत व मग त्यात आले व लसूण घालून सर्व भाज्या घालून व्यवस्थित परताव्यात. आता त्यात सॉसेस् घालून कॉर्नफ्लोअर 3 कप पाण्यात विरघळवून घालावे व सतत ढवळावे. म्हणजे गुठळ्या होणार नाहीत. शेवटी कोथिंबीर व कांदा पात घालून हवा तसा दाट पणा आला की चवीनुसार मीठ व उग्रपणा कमी होण्यासाठी आवडत असेल तर किंचित साखर घालावी. शेवटी सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून वरून थोडी चॉप्सी म्हणजेच फ्राईड नूडल्स घालून गरम गरम सर्व्ह करावे.




**वैशिष्ट्य :** हे गरम गरम सूप विशेष करून थंडी व पावसाळ्याच्या दिवसात खूप छान वाटते. आरोग्यासाठीही भरपूर भाज्यांमुळे बेस्ट आहे. घट्टपणा असल्याने पोटभरीचे सूप आहे. भाज्यांमध्ये भरपूर व्हिटॅमिन्स, फायबर्स असल्यामुळे तब्येतीसाठी आरोग्यदायी आहे तर टेस्टी असल्यामुळे सर्वांचे आवडते आहे.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.



हनिमून भाग 3 पुढे सुरू.. : प्रेग्नन्सी कशी टाळावी? : स्त्री किंवा पुरुष दोघांपैकी एकाने याची काळजी घेणे किंवा दोघांनीही काळजी घेणे अति उत्तम. वेगवेगळ्या निरोधकांचा वापर करावा. सेफ पीरियड किंवा गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर करावा. बऱ्याच वेळा 'जोश में होश खोने का डर' यामुळे निरोध ब्रेक होणे किंवा गर्भनिरोधक गोळी घेणे विसरणे इ. गोष्टी होतात त्याची काळजी घ्यावी. अशा वेळी मॉर्निंग आफ्टर पिलचा पर्यायही वापरला जातो. इमर्जन्सी पिल्स या सहसा नेहमी वापरू नयेत कारण त्यामुळे हार्मोनल इम्बॅलन्स होऊ शकतो. प्लॅन बी नावाच्या पिल्स आधीच घेऊन ठेवाव्यात कारण अनेकदा काही ठिकाणी त्या मिळत नाहीत. परदेशामध्ये 'झीक व्हायरस' आढळून येतो. त्यामुळे आधीच लस टोचून घेणे आवश्यक आहे. या व्हायरसचे इन्फेक्शन झाले तर जन्माला येणाऱ्या बाळामध्ये जन्मतः व्याधी निर्माण होण्याची शक्यता अधिक प्रमाणात आढळून आली आहे. परदेशातून आल्यावर कमीत कमी सहा महिने बर्थ कंट्रोल पिल वापराव्यात. कारण एखाद्या व्हायरसची लागण झाली असेल तर तो व्हायरस जाण्यास किमान ५ ते ६ महिने लागतात. हनिमून सिस्टायटीस म्हणजे काय ? हनिमूनला गेल्यानंतर सेक्स ही पेनफुल अवस्था होत असेल किंवा आजारी पडण्याची वेळ येत असेल तर काय करावे ? १) हनिमून सिस्टायसीस हे मूत्राशयाचे इन्फेक्शन होऊन संबंध आल्यानंतर केव्हाही होऊ शकते. २) यामुळे मूत्राशय व किडनी इन्फेक्शन देखील होते. लक्षणे काय ? लघवीला जळजळ होणे, वारंवार लघवीला होणे, पांढरी लघवी, लालसर रंग येणे, ओटीपोटात दुखणे या सगळ्यांमुळे हनिमूनची पूर्ण रंगतच संपून जाते. बऱ्याचदा संबंध आल्यानंतर दोन तीन दिवसांनी असे होते किंवा तापही येतो. तपासणी - युरिन टेस्टमध्ये जंत आढळतात. उपचार - अँटिबायोटिक्स (३ ते ५ दिवस), पेन किलर्स, व अँटिस्पासमोडिक्स वापरतात. तसेच अल्कलायझर्स वापरतात. हे दुखणे २ ते ३ दिवसांत कमी होते. दक्षता- अशा वेळी साथीदाराची साथ खूप महत्त्वाची असते आणि या काळात संबंध न ठेवणे महत्त्वाचे ठरते. काळजी - कोमट पाण्याने अंग धुणे, साबण नसलेल्या पाण्याचा वापर करणे, भरपूर पाणी पिणे, कॅनबेरी ज्यूस, लेमन वॉटर यांचं प्राशन करणं फायद्याचं ठरतं. यामुळे हे दुखणं लवकर आटोक्यात आणणं शक्य होतं. टाळण्याचे उपाय भरपूर पाणी पिणे. कॅनबेरी, लेमन ज्यूस प्राशन करणे. कॉफी, सोडा, फ्रूट ज्यूस यांचे प्राशन न करणे. फास्ट फूड न खाणे. संबंध येण्याआधी आणि संबंध आल्यानंतर लगेच बाथरूमला जाणे. जेणेकरून मूत्रमार्गातील जंतू फ्लश केले जातील. कोणत्याही प्रकारचा स्प्रे, मलम किंवा लुब्रिकंट्स बाह्यांगाला लावू नयेत. संबंधांवेळी इजा होऊ नये म्हणून वॉटर बेस्ड लुब्रिकंटचा वापर करावा. हनिमूनहून आल्यानंतरही जर हे इंफेक्शन राहिले तर ताबडतोब युरॉलॉलिस्ट, एन्ड्रोलॉजिस्ट आणि सेक्सॉलॉजिस्टना दाखवावे. फायमोसिस - पुरुषांनी सहसा हनिमूनला जाण्याआधी कोणत्याही प्रकारची लैंगिक समस्या असेल तर आधी ट्रीटमेंट घ्यावी आणि मगच हनिमूनचा प्लॅन करावा. बऱ्याचदा स्किन टाइट असल्यामुळे ती ब्रेक होते आणि रक्तस्राव होतो. प्याराफायमोसिस- अशी टाइट स्किन जर मागे गेली आणि तशीच मागे राहिली तर त्या भागाला भरपूर सूज येते. अशा वेळी त्वरित युरॉलॉजिस्ट, एन्ड्रॉलॉजिस्टना दाखवून उपचार करून घ्यावेत.







डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# एक हसीन शाम को दिल मेरा खो गया

आधुनिक केसरी



१९६६ साली प्रदर्शित झालेल्या सी. एल. रावळदिग्दर्शित `दिल ने फिर याद किया' या चित्रपटात धर्मेंद्र, नूतन आणि रहमान हे दर्जेदार व लोकप्रिय कलावंतांचे त्रिकूट एकत्र आले होते. १९६७ साली डी. डी. कश्यप यांनी निर्माण आणि दिग्दर्शित केलेल्या `दुल्हन एक रात की' या चित्रपटाद्वारे हेच त्रिकूट पुन्हा एकदा पडद्यावर आणले. हा चित्रपट थॉमस हार्डी यांच्या `टेस' या कादंबरीवर आधारलेला होता. या चित्रपटात लीला चिटणीस, मुमताज बेगम, जॉनी वॉकर, कन्हैयालाल चतुर्वेदी, तबस्सुम, हेलन आदी सहकलावंत होते. या चित्रपटासाठी गीतकार राजा मेहदी अली खान आणि संगीत दिग्दर्शक मदन मोहन ही अव्वल जोडी श्रोत्यांना सांगीतिक आनंद देण्यासाठी पुन्हा एकदा एकत्र आली होती. गीते अर्थातच लोकप्रिय झाली. या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे अशोक (धर्मेंद्र) आणि निर्मला (नूतन) यांची डेहराडून रेल्वे स्थानकाच्या फलाटावर भेट होते. नंतर शहरातही ते भेटतात. एकमेकांकडे आकृष्ट होतात. आपल्या आईने (लीला चिटणीस) आपल्या शिक्षणासाठी घर गहाण ठेवले असल्याचे निर्मलाला समजते. म्हणून एका श्रीमंत अंध स्त्रीकडे ती परिचारिका म्हणून नोकरी करू लागते. त्या अंध स्त्रीचा मुलगा रणजीत (रहमान) निर्मलावर भाळतो. निर्मलाच्या ते लक्षात येतेही आणि ती त्याला शक्य तो चार हात दूरच ठेवते. अशोकला बाहेरगावी नोकरी मिळते. लवकरच परतेन असे निर्मलाला आश्वासन देऊन तो जातो. निर्मलाच्या मालकिणीच्या घरातील एका पार्टीनंतर तिला तिच्या इच्छेविरुद्ध रणजीतबरोबर गाडीतून जावे लागते. तो या संधीचा गैरफायदा घेऊन तिच्यावर लैंगिक बळजबरी करतो. तिला दिवस गेल्याचे लक्षात आल्यावर आई तिला शहराबाहेर नेते. ती एका मृत अर्भकाला जन्म देते. दरम्यान, अशोकचे पिता त्याचा विवाह आपल्या एका स्नेह्याच्या कन्येशी ठरवितात; पण अशोकचा मित्र बन्सी (जॉनी वॉकर) विवाहाचा तो बेत उधळून लावतो. आपण एका मुलीला लग्नाचे वचन दिले असल्याचे अशोक वडिलांना सांगतो तेव्हा तेही आपल्या मित्राला आपण वचन दिल्याचे त्याला सांगतात. इकडे निर्मला आईबरोबर परत येते. तिला मसुरीत शिक्षिकेची नोकरी मिळते. अशोकही मसुरीतच अभियंता म्हणून काम करीत असतो. निर्मलाला पाहून त्याला अत्यानंद होतो; पण ती आता बदललेली असते. तो तिला लग्नाविषयी विचारतो तेव्हा प्रथम ती नकार देते; पण नंतर सगळे स्पष्ट करणारे पत्र पाठविते. अशोक तिच्याकडे उत्तर मागण्यासाठी जातो तेव्हा त्याने ते पत्र वाचले आहे असे समजून ती होकार देते. त्यांचा विवाह पार पडतो आणि ते रात्री एका हॉटेलमधे जातात. तिथे नेमके काय घडते ? याचे उत्तर पडद्यावरच मिळते. या चित्रपटातील "एक हसीन शाम को दिल मेरा खो गया" हे गीत मोहम्मद रफी यांनी अजरामर करून टाकले आहे. दिग्दर्शक कश्यप यांनी केलेले त्याचे चित्रीकरण उल्लेखनीय आहे. एका उंचच उंच खांबांच्या इमारतीच्या पायऱ्या उतरून अशोक-निर्मला बाहेर येतात तेव्हा ग्रुप व्हायोलिनचा तुकडा टाकला आहे. मग अन्य काही वाद्यांचे आवाज आणि त्यामागून रफीसाहेबांचे अप्रतिम गुणगुणणे (हमिंग)! गीत सुरू होते. अशोक आपले मनोगत गीताद्वारे व्यक्त करतो. ती दोघे उंच वृक्षांच्या तसेच बांबूच्या झाडांमधून मार्गक्रमण करतात. पहिल्या आणि दुसऱ्या अंतऱ्यात कॅमेरा जलाशयातील कमळाच्या दोन फुलांवर! राजा मेहदी अली खान यांचे शब्दसौंदर्य आणि मदन मोहन यांची गुणगुणावी अशी चाल अत्यंत आकर्षक! चित्रपट कृष्णधवल असल्याचा कोठेही अडथळा नाही! या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणेः



**एक हसीन शाम को**
**दिल मेरा खो गया**
**पहले अपना हुआ करता था**
**अब किसी का हो गया**
**मुद्दतों से आरजू थी**
**मेरे दिल में कोई आए**
**सूनी सूनी जिंदगी में**
**एक शमा झिलमिलाए**
**वो जो आए तो रोशन**
**जमाना हो गया**
**मेरे दिल के कारवां को**
**ले चला है आज कोई**
**शबनमी सी जिसकी आंखें**
**थोडी जागी थोडी सोई**
**उनको देखा तो मौसम**
**सुहाना हो गया**

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा घसरला



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**भारतीय जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा हा १९९०-९१ मध्ये ३५ टक्के वरून मागील आर्थिक वर्षात १५ टक्क्यापर्यंत घसरला आहे हि घसरण कृषी GVA मध्ये झालेल्या घसरणीमुळे नाही तर औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात झालेली जलद वाढ यामुळे दिसून येते. अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा घसरला असला तरी हि घसरण कृषी क्षेत्रात झालेल्या घसरणीमुळे झालेली नाही तर, भारतातील औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे आणि विस्तारामुळे झालेली आहे. जागतिक स्तरावर देखील, जगाच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा ४ टक्के इतका झाला आहे. तरीही याला काही अंशी का होईना केंद्र सरकारचे आयात निर्यात धोरण जबाबदार आहेच.**

दि.२० डिसेंबर २०२३ अखेर महाराष्ट्रात ३३२.२७ लाख टन ऊस गाळप झाल्याची माहिती साखर आयुक्तालयाकडून देण्यात आली. सरासरी ८.६ च्या उताऱ्याने २८.५ टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यात १९२ साखर कारखान्यांनी गाळप हंगामात सहभाग घेतला ज्यामध्ये ९४ सहकारी आणि ९८ खाजगी साखर कारखान्यांचा समावेश आहे. भारतातून साखरेच्या निर्यातील बंदी असतानाही २० हजार टन साखर केनियाला निर्यात होऊ शकते. ऍडव्हान्स अथॉरायजेशन स्कीमच्या अंतर्गत कच्या साखरेची आयात करून पक्या साखरेची निर्यात प्रक्रियेनंतर केली जाऊ शकते. यासाठी ऍडव्हान्स अथॉरायजेशन स्कीमच्या अंतर्गत निर्यात करत असताना सरकारच्या विशेष परवानगीची आवश्यकता नाही. केनियाच्या सरकारने ५ लाख टन साखरेची मागणी भारताकडे केली होती. केंद्रसरकाने ऊस, ऊसाचा रस, आणि बी-मोलॅसिसचा इथेनॉल निर्मितीमध्ये वापर करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यासाठी साखरेची मर्यादा १७ लाख टन निश्चित करण्यात आली आहे. त्यातून साखर उद्योगाला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. इथेनॉल निर्मितीसाठी उसाचा रस आणि साखेरची मळी वापरण्यास सरकारने दि.७ डिसेंबर रोजी बंदी घातली होती. मात्र ही बंदी आता मागे घेण्यात आली असून यामध्ये इथेनॉल निर्मितीसाठी १७ लाख टन साखरेच्या मर्यादेत रस आणि बी-हेवी मळी वापरण्यास सरकारने परवानगी दिली आहे. केंद्रसरकारने इजिप्तमधून ५० हजार टन कच्च्या साखरेची आयात करण्यास मंजुरी दिली आहे. देशातील साखरेची उपलब्धता वाढविण्यासाठी आणि साखरेचे भाव नियंत्रणात रहावे यासाठी सरकारने हा निर्णय घेतला. इथेनॉल निर्मितीस पुन्हा मंजुरी दिल्यामुळे साखरेचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. मागील १० वर्षात साखर कारखान्यांद्वारे ९४ हजार कोटी रुपयांची कमाई झाली.

सरकार २५ लाख टन तांदूळ विक्री करणार आहे. यावर्षी आतापर्यंत २५ लिलावामध्ये ४८.१२ लाख टन गहू खुल्या बाजारपेठेत FCI (FOOD CORPORATION OF INDIA) ने विक्री केले तर तांदूळ १.१९ लाख टन विक्री केले. खुल्या गहू आणि तांदळाचे बाजारपेठेतील भाव नियंत्रित आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात वितरित केले गेले. आता केंद्र सरकार तांदळाचे भाव नियंत्रित करण्यासाठी १ टनापासून २००० टनापर्यंत बोली लावण्यास मुभा दिली आहे. जे या आधी १० टनापासून १००० टनापर्यंत बोली लावू शकत होते. मागील वर्षापेक्षा तांदळाचे भाव १३ टक्यांनी अधिक असल्या कारणाने सरकार उपलब्धता वाढवण्यासाठी हा निर्णय घेतला. FCI कडे चांगल्या दर्जाचे तांदूळ उपलब्द आहेत. सरकारकडे २०० लाख टन तांदूळ अतिरिक्त आहे. त्यामधील २५ लाख टन तांदूळ त्वरित विक्री केली जाऊ शकतात. तांदळाचे भाव १५ वर्षातील उच्चांकी स्तरावर आहेत. भारतातुन तांदळाची निर्यात मोठया प्रमाणात कमी झाली. परिणामी जागतिक स्तरावर तांदळाची उत्पादकता घटुन भावात मोठी वाढ झाली. ५०० डॉलर प्रति टन या दरम्यान असणारे तांदळाचे भाव सध्या ६७० ते ६८० डॉलर प्रति टनापर्यंत पोहोचले आहेत.मागील १५ वर्षातील उच्चांकी स्तरावर हे भाव पोहोचले. व्हिएतनाममधुन मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात होत आहे. जागतिक स्तरावर भाव आणखी वाढतच राहतील. ई-लिलावाद्वारे धान्य विक्री देशांतर्गत पुरवठा वाढविण्यासाठी आणि किरकोळ किमती नियंत्रित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सरकारकडून ई-लिलावाद्वारे ३.४६ लाख टन गहू आणि १३,१६४ टन तांदूळ विकले आहेत. खुल्या बाजार विक्री योजने अंतर्गत (OMSS) किरकोळ किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी बफर स्टॉक मधून गहू आणि तांदळाची विक्री होत आहे. दि.२० डिसेंबर रोजी २६ वा ई-लिलाव झाला ज्यामध्ये ४ लाख टन गहू आणि १३,१६४ टन तांदूळ विक्री करण्यात आली. गव्हासाठी २,१७८.२४ रुपये प्रतिक्विंटल आणि तांदुळासाठी २९०५.४० रुपये प्रतिक्विंटल या सरासरी भावाने विकले गेले असे अधिकृत सूत्राकडून सांगण्यात आले. मागील महिन्यात केनियाला १ लाख टन बिगर बासमती तांदळाची निर्यात झाली.

ब्राझील मध्ये सोयाबीन आणि मक्याची उत्पादकता घटण्याचे अंदाज आहे, याचाही भारताच्या आयात निर्यातीवर परिणाम होणार आहे. ब्राझील मध्ये सोयाबीन आणि मक्याची उत्पादकता अनियमित पाऊस यामुळे घटण्याचे अंदाज तेथील कृषी विभागाने (CONAB) प्रसारित केले. पण लागणक्षेत्र अधिक असल्यामुळे सोयाबीन उत्पादन मागील वर्षापेक्षा ३ टक्यांनी अधिक राहील. ९ डिसेंबर पर्यंत ९० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची लागण पूर्ण झाली. मागील ८ वर्षातील ही हळुवार लागण करणारे वर्ष ठरेल. जवळपास ५ टक्के क्षेत्रावर पुनर्लागण ही केली जाऊ शकते. ब्राझीलमध्ये पश्चिम भागात ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात मागील ३० वर्षाच्या सरासरीच्या तुलनेत फक्त ५३ टक्केच पाऊस झाला, पण ब्राझीलच्या दक्षिण भागात सरासरी प्रमाणात पाऊस झाला. देशात मक्याचे उत्पादन एल-निनोमुळे घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कृषी विभागाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार या खरीप हंगामात २२५ लाख टन आणि रब्बी हंगामात १२५ लाख टन मक्याचे उत्पादन होऊ शकते. बाजारपेठेत डिसेंबर ते जानेवारी अखेरपर्यंत आवक जास्त असते. इथेनॉल निर्मितीसाठी मक्याची खपत वाढल्यामुळे मक्याच्या भावात चांगली वाढ झाली. २०२१ मध्ये १३०० ते १४०० रुपये पर्यंत मिळणारे भाव आता सरासरी २२०० रुपये पर्यंत मिळत आहेत. जानेवारी ते मार्च या कालावधीमध्ये सरासरी २२०० ते २४०० प्रतिक्विंटल इतके भाव मिळतील असे वर्तविण्यात आले. गेल्या पंधरा दिवसांत पुन्हा दोनशे ते अडीचशे रुपयांनी क्विंटलमागे दरात घट झाली आहे. सद्या सोयाबीनला ४८०० ते ४९५० सरासरी भाव आहेत. सोयाबीन दर वाढेल या आशेने शेतकऱ्यांनी सोयाबीन साठा करून ठेवलेला आहे. तेल विभागातून मागणी कमी मिळत आहे पण DOC ला चांगली मागणी निर्यातदारांच्याकडून मिळत आहे. पोल्ट्री विभागातून हि उठाव चांगला आहे. सोयाबीन च्या भावावर थोडा दबाव टिकून राहील असे वाटते. पोल्ट्री विभागातून खाद्यासाठी मका आणि सोयाबीनचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. **क्रमशः**

# जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी सज्ज व्हा

## सुजात आंबेडकर : नांदेडला लवकरच महामेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** राज्यभरात वंचित बहुजन आघाडीची ताकद वाढली असून येणाऱ्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाच्या युती किंवा आघाडीची वाट न पाहता जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे असे आवाहन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू सुजात आंबेडकर यांनी केले. ते शहरातील शासकीय विश्रामगृहात आंबेडकरी बुध्दीजिवी आणि वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो, नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, शिवा कांबळे, माधवदादा जमदाडे, इंजि. प्रशांत इंगोले, प्रा. डॉ. जे. टी. जाधव, उप प्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, पि.आय.भगवान धबडगे, एस.एन.गोडबोले, प्राचार्य केशव जोंधळे, रामराव भुक्तरे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ बाळासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र युवा नेते सुजात आंबेडकर नांदेड दौऱ्यावर असताना त्यांनी शासकीय विश्राम गृह नांदेड येथे लोकांसोबत संवाद साधला. पुढे बोलताना आंबेडकर म्हणाले की, गत लोकसभा, विधानसभा निवडणुकीत आपण हारलो नसून या माध्यमातून संघटन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. आपण अनेक ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर होतो. आज जिल्हा, तालुक्यासह राज्यातील प्रत्येक शहरातील वार्डा वार्डात बुथ कमिट्यांचे जाळे निर्माण झाले आहे. तसेच ग्रामीण भागातही मोठ्या संख्येने युवा वर्ग आणि मतदार खंबीरपणे आपल्या पाठीमागे उभा आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत विजय आपलाच होणार असून नांदेड लोकसभेची जागा आपण बहुमताने जिंकणार आहोत. त्यासाठी सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, महिला पदाधिकारी यांनी कामाला लागावे, असेही ते म्हणाले.

जिल्ह्यातील बहुजन समाजाची एकजूट दाखवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचा लवकरच महामेळावा नांदेडमध्ये घेतल्या जाईल, असे सुजात आंबेडकर म्हणाले. त्यासाठी सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी व्यापक स्वरूपाचे नियोजन करावे. पक्षाचे सर्वेसर्वा ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार नांदेडमध्ये आयोजित होणाऱ्या महामेळाव्यासाठी आत्तापासूनच तत्परतेने कामाला लागावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



# लोहगाव, टाकळी जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले तारांगणाचे जग

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** लोहगाव व टाकळी अंतुर येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी तारांगण उपक्रमांतर्गत आकाशगंगा पाहण्यासाठी 'पोलाद स्टील' कंपनीतर्फे निर्माण करण्यात आलेल्या प्लनेटोरियम म्हणजेच कृत्रिम "आकाशगंगा" चे प्रात्यक्षिक पोलाद स्टील यांचे अधिकृत विक्रेता योगेश ट्रेडर्स पिशोर चे मालक भीमराव गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून दाखविण्यात आले. दहा लाख रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या या मॉडेलचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी शाळेमध्ये एक दिवस सेटअप लावण्यात आले होते तर कंपनीचे भगवान मनगटे व महादेव माने यांनी दोन्ही शाळेतील 300 विद्यार्थ्यांना या मॉडेल चे ऑडिओ व्हिडिओ विज्युअल थ्रीडीच्या माध्यमातून अवकाशात होणाऱ्या सर्व बदलाची माहिती दिली. तारांगण, सूर्यमाला,ग्रहांची माहिती, ग्रहांची सद्यस्थिती, आकाशगंगेत होणारे स्थित्यंतरे, चंद्र व चंद्राच्या कला ,पहिल्या चंद्र मोहिमेचे प्रात्यक्षिक इत्यादी विज्ञान व गणित विषयाचे प्रत्यक्ष नॉलेज आणि त्यावर आधारित माहिती दिवसभर विद्यार्थ्यांना घेता आली. भूगोल आणि विज्ञान विषयाचा हा संपूर्ण डेटा विद्यार्थ्यांनी पाहिला व प्रत्यक्ष अनुभवला.भविष्यात मुलांना याचा उपयोग इसरो व नासामध्ये जाण्यासाठी व वैज्ञानिक होण्यासाठी खूप उपयोगी पडणार असे चिंचोली केंद्राचे केंद्रप्रमुख श्री के.आर. सपकाळ साहेब व शेलगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बिलंगे साहेब यांनी सांगितले. विज्ञान विषयाचे शिक्षणातील महत्व पाहता अशा प्रकारचे माडेल तालुक्याच्या ठिकाणी किमान एका शाळेत असणे गरजेचे आहे कारण विज्ञान व भूगोल हे विषय प्रात्यक्षिकासह विद्यार्थी सहज शिकतात विद्यार्थ्यांनी या तारांगण उपक्रमातून प्रत्यक्ष ऍस्ट्रॉनॉमीची माहिती अनुभवण्याचा अनोखा आनंद द्विगुणीत केला. या उपक्रमाची माहिती देण्याचे काम शाळेचे मुख्याध्यापक श्री आर.जे.सोळुंखे सर,श्री जगताप,श्री पठाण, श्री मोकसे, श्री भंडारे, श्री थोटे, श्री वीर, श्री भारत सपकाळ, श्री मोरे, श्री झोन्ड ,श्रीम संगिता वाघमारे मॅडम, सह सर्व शिक्षकांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री रावसाहेब मनगटे पाटील व उपाध्यक्ष श्री सोमनाथ गाडेकर यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

# देशी दारूचे 8 बॉक्स कारमध्ये वाहतूक करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यात पिशोर येथील पिशोर ठान्यामध्ये नव्याने रुजू झालेले पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोड़े यांनी रुजू होताच कार्यवाहीचा धड़ाका सुरु केल्यामुळे परिसरातील नागरिकांमुळे सर्वत्र कौतुक केला जात आहे, त्यांची राहण्याची लाइफ स्टाइल घिम चित्रपट सारखी आहे तसेच काम पन तसाच दिसत आहे. दिनांक 22 /12 /2023 रोजी 7.17 वाजता पोलिस स्टेशन पिशोर येथे मिळालेल्या माहिती नुसार, पोलीस उपनिरीक्षक बडे , बिट अमलदार विलास सोनवणे, किरण गंडे, सोपान डकले, संजय लगड, अन्सार पटेल ,होमगार्ड देवरे व गोरे या पथकाने पिशोर पोलिस निरीक्षक वाघमोडे, यांच्या मार्गदर्शना खाली 9.00 वाजता पळशी खुर्द ते पळशी बुद्रुक जाणाऱ्या रोड वरती 700000 रू किमतीची ईरटीका कंपनीची चार चाकी वाहन तिचा रंग ढवला , पासिंग क्रमांक एम एच 14 डी एन ५१२५ यामध्ये सोपान उत्तम जाधव ,42 वर्ष, राहणार पळशी खुर्द, तालुका कन्नड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे ताब्यात 33600 रू किमतीच्या देशी दारू संजीवनी संत्र्याच्या 180 एम एल च्या 336 बॉटल व 5000 रू किमतीच्या 90 एम एल च्या 100 बॉटल मिळून आल्या.

सदरची कारवाई मा पो अ श्री मनीष कलवानिया सर, मा ऑडिशन इस पी श्री सुनिल लांजेवार सर, मा डी वाय इस पी श्री विजयकुमार ठाकूरवाड, कन्नड, पोलीस स्टेशन पिशोर पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे,यांच्या मार्गदर्शन खाली पिशोर बिट अमलदार श्री विलास सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक बडे , बिट अमलदार विलास सोनवणे, किरण गंडे, सोपान डकले, संजय लगड, अन्सार पटेल ,होमगार्ड देवरे व गोरे यांनी केली आहे.

कन्नड तालुक्यात पिशोर एका व्यक्तीची मोटरसाइकिल चोरीला गेली होति दि. १४/१२/२०२३ रोजी फिर्यादी शेख आकेब महमूद रा पिशोर यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुरनं ३८१/२०२३ कलम ३७९ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्याचा तपास पिशोर बिट अमलदार श्री विलास सोनवणे यांचे कडे देण्यात आला होता. तपास अमलदार यांनी गुन्ह्यातील घटनास्थळाच्या आजुबाजुला असलेल्या सी.सी.टि.व्ही. फुटेज वरुन (१) कडूबा नामदेव श्रीखंडे व (२) प्रितम साहेबराव श्रीखंडे दोन्ही रा. वाहेगांव ता. फुलंब्री यांना आरोपी म्हणून निष्पन्न केले. त्यानंतर नमुद आरोपीचा दि. २१/१२/२०२३ रोजी शोध घेतला असता, आरोपी कडूबा श्रीखंडे यांच्या राहते घराजवळील गोठ्यामध्ये गुन्हयातील गेला माल १५,०००/- रु. किंमतीची एच. एफ. डीलेक्स मो.सा. क्रमांक एम.एच. २० सी.एन. ६६४८ हि मिळून आली असून, ती जप्त केली आहे. तसेच प्रितम साहेबराव श्रीखंडे वय १९ वर्षे रा. वाहेगांव ता. फुलंब्री यास दि. २१/१२/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपी कडुबा नामदेव श्रीखंडे याचा शोध घेतला असता तो मिळून आला त्यास अटक केली आहे. नमूद दोन्ही आरोपी हे घटनेच्या दिवशी गुन्हा घडवून आणण्यासाठी ज्या मो सा वर आले होते ती आरोपी कडुबा श्रीखंडे याची मो सा क्र MH 20 GR 0592 ही जप्त केली आहे. दोन्ही आरोपीला न्यायालय मध्ये हजर केले असता त्यांना जामीन वर सोडण्यात आले आहे.



# मोराणे सैनिकी विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेचा बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बाबा बागरेचा**

**धुळे :** इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय मोराने प्र. नेर येथे दिनांक 21 ते 23 या तीन दिवसीय वार्षिक मैदानी स्पर्धेला इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते झाला कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन प्रमुख पाहुणे मा. आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू डॉ. आनंद दिवाण पवार सर यांनी केले यावेळी हर्षल भदाणे,विद्यालयाचे प्राचार्य एस. बी. बेहरे व सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी खेळाडू उपस्थित होते.100 मीटर रनिंग रेसला क्लॅप अँड शूट करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. स्पर्धेच्या शुभारंभप्रसंगी मनोगत व्यक्त करताना श्री.बाळासाहेब भदाणे यांनी सांगितले की विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात विविध खेळांमध्ये राज्य पातळीवर नाव पोहचवले असुन याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.तसेच खेळाडू व क्रीडा शिक्षकांचे कौतुक केले व होऊ घातलेल्या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडूंना यावेळी शुभेच्छा दिल्या.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# नांदेडला आज 6 वे राज्यस्तरीय डॉ.अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण करणार उदघाटन; साहित्यिक डॉ. प्रल्हाद लुलेकर संमेनाध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** बिसेफ प्रणित डॉ.अण्णा भाऊ साठे साहित्य परिषदेच्या वतीने रविवार दि. 24 डिसेंबर रोजी सहाव्या राज्यस्तरीय डॉ.अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलनाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे. या निमित्ताने भरगच्च कार्यक्रम व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेड येथील शुभारंभ मंगल कार्यालय जिल्हाधिकारी निवासाच्या पाठीमागे लेबर कॉलनी नांदेड येथे दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता आयोजित या संमेलनाचे उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण तर संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील माजी मराठी विभाग प्रमुख डॉ.प्रा. प्रल्हाद लुलेकर यांची उपस्थिती राहणार आहे. या साहित्य संमेलनात माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डी. पी. सावंत, विधान परिषदेचे सदस्य माजी आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार मोहनराव हंबर्डे, आमदार जितेश अंतापुरकर, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम, प्रदेश सचिव सुरेंद्र घोडजकर, नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे माजी उपमहापौर तथा स्थायी समिती अध्यक्ष उमेश पवळे यांच्यासह अनेक क्षेत्रातील विचारवंत सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. माजी मंत्री कमलकिशोर कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, बार्टीचे महासंचालक सुनील जी. वारे , आयकर आयुक्त मुंबई कैलासजी गायकवाड, मुंबई विद्यापीठाचे प्रा. डॉ. संजय देशपांडे, दिव्य अमृत कन्स्ट्रक्शन तथा अमृत मॉल विष्णुपुरी नांदेड येथील मॅनेजिंग



डायरेक्टर रोशनसिंग सरदार, सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध व्याख्याते पी. डी. जोशी, लेखक तथा प्रसिद्ध वर्णनकार डॉ. अच्युत बन, गंगापूर येथील मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. जगदीश कदम, कोकण ज्ञानपीठ व मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. डॉ. बळीराम गायकवाड, इत्यादी मान्यवरांचा या साहित्य संमेलनात सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यभरातील मान्यवरांना विविध पुरस्कार देऊन या साहित्य संमेलनात गौरविण्यात येणार आहे. "भारतीय संविधान हाच फुले आंबेडकरी राष्ट्रवाद", व "परिवर्तन चळवळी विषयाची माझी भूमिका" या महत्त्वपूर्ण विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. निमंत्रित कवी यांची काव्य मैफिल ही या साहित्य संमेलनात रंगणार आहे. सकाळी ९ वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर बापूराव जमदाडे आणि संच यांच्या शाहिरी जलशाचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर चालणाऱ्या या राज्यस्तरीय साहित्य संमेलनास नांदेड जिल्हा व परिसरातील श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष लालबाजी घाटे, निमंत्रक माजी सनदी अधिकारी व्ही. जे. वरवंटकर, महानगरपालिका नांदेडचे माजी कार्यकारी अभियंता सुग्रीव अंधारे, संयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. जी. एल. सूर्यवंशी, संयोजन समितीचे निमंत्रक एच. पी. कांबळे, संयोजन समितीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. शंकर गड्डमवार, संयोजन समितीचे सदस्य प्रा. संजयकुमार मांजरमकर, संयोजन समितीचे कोषाध्यक्ष ॲड . एस. एम. गारे यांच्यासह बीसेफ व अण्णाभाऊ साठे साहित्य परिषद महाराष्ट्र राज्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षक भरतीसाठी पोर्टलवर जाहिरातीची कार्यवाही २५ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार

## विद्यार्थी घडवून शिक्षण व्यवस्थेचे केंद्रबिंदू व्हा!

आधुनिक केसरी न्यूज

**विलास कांबळे (देवांग)**

**येवला :** राज्यभरातील शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी पोर्टलवर जाहिरातीची कार्यवाही २५ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार आहे. लवकरच रिक्त पदे भरली जाणार आहे.शिक्षकांकडे वारंवार विविध माहिती मागितली जात असल्याने अध्यापनावर परिणाम होत असून ते टाळण्यासाठी सर्व सुविधा नियुक्त मोठे सॉफ्टवेअर विकसित करण्यात येणार आहे.परीक्षांचे सुपर व्हिजन, विद्यार्थ्यांचे निकालासह इतर सुविधा त्यात देण्याचा मानस असल्याची माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी दिली.शिक्षकांचे प्रश्न सुटतील पण विद्यार्थ्यांचे नुकसान झाले तर त्यांचे भविष्य काय हा सवाल करून विद्यार्थ्यांचा खुर्दा होण्यासाठी शिक्षण व्यवस्था जवाबदार होऊ देऊ नका. प्रयोगशील व लोकप्रिय होऊन गावातल्या शिक्षण व्यवस्थेचे केंद्रबिंदू व्हा असा मौलिक सल्ला त्यांनी दिला.

शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या संकल्पनेतून आज बाभूळगाव येथील एस.एन.डी. शिक्षण संकुलात आयोजित उत्तर महाराष्ट्रातील नाशिक,नगर,धुळे, जळगाव,नंदुरबार येथील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सहविचार सभेप्रसंगी ते बोलत होते.या सभेला उत्तर महाराष्ट्रातून सुमारे ३ हजार मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.मांढरे होते तर व्यासपीठावर आमदार नरेंद्र दराडे,शिक्षक आमदार किशोर दराडे,माजी नगराध्यक्ष रामदास दराडे,नाशिकचे शिक्षण उपसंचालक डॉ.बी.बी.चव्हाण, नाशिकचे शिक्षणाधिकारी उदय देवरे व प्रवीण पाटील,नगरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस,प्राथमिकचे शिक्षणाधिकारी बी.जे.पाटील,जळगावच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुवर,प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील,नंदुरबारचे शिक्षणाधिकारी प्रविण अहिरे,नाशिकचे उपशिक्षणाधिकारी गणेश फुलसैंदर,वेतन अधीक्षक नितीन पाटील,नगरचे अधीक्षक रामदास मस्के तसेच मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष जे. के.पाटील,शिक्षक नेते संभाजी पाटील तसेच शालिग्राम भिरूड, सुनील पंडित,आप्पासाहेब शिंदे,आर.एस.बाविस्कर मातोश्री शिक्षण संस्थेचे सरचिटणीस कुणाल दराडे, जगदंबा शिक्षण संस्थेचे संचालक रुपेश दराडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी आमदार किशोर दराडे तसेच आयुक्त श्री.मांढरे यांच्या हस्ते जळगाव,धुळे जिल्ह्यातील अनुकंपावरील शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश प्रदान करण्यात आले. शिक्षक दिशादर्शक असतो, त्याने विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे महान कार्य केले आहे.यापुढील काळात या कामात अधिक झोकून द्यावे लागेल असे आमदार नरेंद्र दराडे म्हणाले.नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने होत आहे.काळाबरोबर तुम्हालाही बदलावे लागत असून नवीन प्रवाह समजून घ्या व ते स्वीकारा.त्याचा शिक्षण क्षेत्रात अवलंब करून आपली शाळा आणि आपल्या विद्यार्थ्यांना नेहमीच टॉपवर ठेवा. परीक्षा पद्धतीतही बदल होत असून सर्वच परीक्षा निकोप व स्वच्छ पारदर्शक वातावरणात पार पाडा असे असे आवाहन शिक्षण उपसंचालक डॉ. चव्हाण यांनी केले. जुनी पेन्शन योजना लागू व्हावी,सेवानिवृत्तीचे वय ६० व्हावे,उर्वरित शिक्षकांना शालार्थ आयडी मिळावे,वैद्यकीय व इतर थकीत बिले मिळावीत,संच मान्यता दुरुस्त कराव्यात,समायोजन थांबवावे या शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्याची मागणी यावेळी शिक्षक नेते एस.बी.देशमुख,मोहन चकोर,जे.के.पाटील,साहेबराव कुटे,आर.डी.निकम,डी.पी.महाले,उदय तोरवणे,एस. टी.कदम,एस.के.सावंत, संभाजी पाटील,किरण पगार आदींनी यावेळी केली. सूत्रसंचालन संतोष विंचू यांनी केले तर युवा नेते कुणाल दराडे यांनी आभार मानले.

**शिक्षकांचे प्रश्न सोडवण्याचा लढा सुरूच राहणार : किशोर दराडे**

शिक्षण क्षेत्रापुढे अनेक आव्हाने असून ती आनंदी वातावरणात शिक्षकांनी पेलवत नव्या शैक्षणिक धोरणालाही उत्साहाने सामोरे जावे .शिक्षकांना बीपी, शुगरचा त्रास अधिक आहे मात्र स्वत :ची तब्येत सांभाळतानाच तणाव विरहित काम करा आणि विद्यार्थी हिताला प्राधान्य द्या असे आवाहन शिक्षक आमदार दराडे यांनी केले गेले .साडेपाच वर्षे सतत शासन आणि अधिकाऱ्यांची भांडण तुमचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी झटत आहे याचमुळे विनाअनुदानित माध्यमिक शाळांना २० व ४० टक्के अनुदानासाठी ११३८ कोटी तर उच्च माध्यमिक शाळांना २० व ४० टक्के अनुदानासाठी १६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात यश आले, २००५ पूर्वीच्या नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय झाला असून नव्याने नियुक्त शिक्षकांचे शालार्थ आयडी उपोषण करून मिळवून दिले, सभागृहात हजार वेळेस शिक्षकांचे प्रश्न मांडून त्याची सोडवणूक केली आहे .आता जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी माझा लढा सुरू असून तो सतत सुरूच ठेवेल, शिक्षकांचे असंख्य प्रश्न असून ते सोडवण्यासाठी माझे प्रामाणिक प्रयत्न सुरू असल्याचे दराडे यांनी सांगितले .



# भारतीय जनता पार्टी रत्नपूर तालुका कार्यकारणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आज केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड साहेब, आमदार श्री प्रशांत भाऊ बंब साहेब, श्री संजय भाऊ खंबायते जिल्हाध्यक्ष संभाजीनगर दक्षिण, श्री विकास कापसे विधानसभा निवडणूक प्रमूख,श्री ज्ञानेश्वर नलावडे, तालुका अध्यक्ष, यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नपुर तालुका कार्यकारणी व विविध सेल व मोर्चा आघाडी यांचे अध्यक्ष जाहीर करण्यात येत आहे.

दिव्यांग सेल श्री हरिदास म्हसकर, वैद्यकीय सेल डॉ श्री अतुल दांडेकर, शिक्षण सेल श्री अरुण पाटे सर, मच्छीमार सेल श्री ज्ञानेश्वर खरात, माजी सैनिक सेल श्री सोमपुरी नारायण पुरी, विद्यार्थी आघाडी श्री शुभम बारगळ, आध्यात्मिक आघाडी श्री अजिनाथ जाधव, कामगार आघाडी श्री अविनाश वेताळ, व्यापारी आघाडी श्री भाऊसाहेब दांडेकर, सहकार आघाडी श्री सुरेश जाधव, विधी आघाडी श्री ॲड. दिनकर काळे, शहर अध्यक्ष श्री परसराम बारगळ, सोशल मीडिया प्रमूख श्री किरन बोडखे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष श्री सतिष खंडागळे, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष श्रीमती रेखा विधाटे, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष श्री प्रकाश चव्हाण, अल्पसंख्यांक मोर्चा तालुका अध्यक्ष मुक्तार पठाण, ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष श्री रावसाहेब देशमुख, अनुसुचीत जमाती मोर्चा तालुका अध्यक्ष श्री दिनेश अंभोरे, भटक्या विमुक्त जाती मोर्चा तालुका अध्यक्ष श्री बबन वरदे यांची निवड करण्यात आली.

तसेच तालुका कार्यकारणीत 61 पदाधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे यात तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर नलावडे, उपाध्यक्ष श्री गणेश अधाने, युवराज ठेंगडे , संतोष राजपूत, विजय जाधव, राहुल चव्हाण, सुनिल शिंदे, सुषमा भावसार, सुरेखा ठेंगडे .सरचिटणीसः श्री शिवाजी गायकवाड, सतिष दांडेकर, प्रशांत गदानकर, राहूल निकुंभ, चिटणीस :श्री गणेश झुरावत, सतिष आहेवाड, बाबासाहेब औटे, नरेन्द्र साळवे, प्रेमसिंग जोनवाल,मनोज गुळवे कोषाध्यक्षः श्री सुखदेव ठेंगडे व कार्यकारणी सदस्य यांचा तालुका कार्यकारणी मध्ये समावेश आहे. रत्नपुर येथे कार्यकारणी जाहीर करण्यात आली यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रकाश वाकळे,तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर नलावडे, विधानसभा निवडणूक प्रमूख श्री विकास कापसे, दिनेश अंभोरे माजी उपसभापती, शिवाजी गायकवाड, मुक्तार पठाण, रंगनाथ काळे, अंकुश काळे,भागचंद जोनवाल, सचिन महालकर, साहेबसिंग जोनवाल, निलेश हरणे, सागर मालोदे, अनिल कारभार , दिनेश भारती यांची उपस्थिती होती.

# सिन्नर सायकलिस्ट ची ५० कि.मी. सायकल स्पर्धा जिंकणारे ज्ञानेश्वर जाधव यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील सायकलिस्ट सेवा निवृत्त प्राध्यापक ज्ञानेश्वर जाधव यांनी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर सायकल असोसिएशन ने आयोजित५०की,मी, सायकल स्पर्धा जिंकून ३१००/-चे प्रथम बक्षीस,स्मृतिचिन्ह व प्रमाण पत्र जिंकल्यानंतर येथील सायकलिस्ट व स्वीमिंग असोसिएशन च्या वतीने गुरुवार( ता.२१ )रोजी आधार रुग्णालय च्या सभागृहात त्यांचा सत्कार आ,रमेश पा, बोरनारे व माजी शिक्षणाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते सत्कार व गौरव करण्यात आला,ज्ञानेश्वर जगताप यांनी ६२वर्ष वयोगटात ही स्पर्धा जिंकली त्यांचा शहरातील विविध संस्था, मंडळे यांनी ही सत्कार केला,आजच्या काळात शारीरिक तंदुरुस्ती साठी"सायकल चालवा-आयुष्य वाढवा"-देखना है कल--तो चलाओ सायकल"हा संदेश तळा- गळातील नागरिकांपर्यंत पोहचावा हा संदेश वैजापूर सायकलिस्ट गेल्या अकरा महिन्यापासून देत आहेत,आ,बोरनारे,व धोंडीराम राजपूत यांनी सायकल चालविण्याचे महत्व विशद करीत जाधव यांचा गौरव केला,छत्रपती संभाजीनगर( औरंगाबाद ) सायकलिस्ट संघाचे अध्यक्ष निखिल कचेश्वर,सचिव चरणजीत संभा सहसचिव अतुल जोशी,सिन्नर नाशिक चे अध्यक्ष शिवाजी लोंढे,संदीप ठोक,सुनील दाणे, जयेश नाईक,निलेश गोमे यांची उपस्थिती होती,प्रास्ताविक बाबासाहेब जगताप यांनी केले,आभार चरणसिंग काकरवाल यांनी मानले सूत्र संचलन जयराम खाडे यांनी केले, वैजापूर सायकल असोसिएशनचे अध्यक्ष योगेश खाडे , दिलीप अनर्थे,संजय लाडवाणी,डॉ,ईश्वर अग्रवाल,यांनी सहभाग नोंदविला या प्रसंगी दिनेश राजपूत,दशरथ बनकर,संजय बोरनारे,स्वप्नील जेजुरकर,प्रकाश माळी, जवाहर कोठारी,अमोल बोर-नारे,ॲड,देवदत्त पवार, संतोष बोथरा,काशिनाथ भावसार,इत्यादी उपस्थित होते.

# श्री संचारेश्वर विद्यालयात गीता जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील श्री संचालकांर विद्यालयात दिनांक 22 डिसेंबर 2023 वार शुक्रवार रोजी गीता जयंतीनिमित्त गीतेच्या बाराव्या अध्यायाचे सामूहिक पठण घेण्यात आले. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून महालिंगप्पा कुरे, मनिषा पोरवाल,राजाभाऊ नगरकर, मनोज सारडा,मनोज रजोतिया, रवीकुमार पेशकार, प्रसाद खेर्डेकर मुख्याध्यापक सुरेश अन्नदाते,डॉ.शैलेश मंत्री, शितल पोरवाल, पुनम सारडा, हेमलता वट्टमवार,राधा काबरा,सोनल सोनी, सुनिता मंत्री यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते भगवद् गीता व प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश अन्नदाते यांनी केले. इयत्ता पाचवी ते सातवीतील विद्यार्थ्यांनी सामूहिक बाराव्या अध्यायाचे सुंदर पद्धतीने पठण केले. सकाळ सत्रात इयत्ता पहिली ते चौथी तील विद्यार्थ्यांचे बाराव्या अध्यायाचे पठण झाले. मनोज सारडा यांनी व मनिषा पोरवाल यांनी विद्यार्थ्यांना छान मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी गीतेच्या अध्ययाचे पठण करून प्रत्येक श्लोकाचा अर्थ समजून घ्यावा तसेच गीतेचे महत्व सांगून मुलांकडून मान्यवरांनी घोषवाक्य वदवून घेतले.

संजय गायकवाड यांनी कार्यक्रमाचे ऋणनिर्देश केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण नाईक यांनी केले तर सांगता विजयमाला फड यांनी शांती मंत्राने केली.

तसेच शिवाजी सोमोसे, किरण नाईक, संजय गायकवाड, बाळासाहेब ठोंबरे, वैभव जोशी, दत्ता राठोड, विकास गिरे, उषा खराबे, विजयमाला फड,रूपाली सोनसळे, दिपाली देशपांडे, मनिषा धाबेवार, संगीता सेवलकर, मोनिका घोडके, वर्षा कोडगावकर, सुनिता टाक, पूजा बुधवंत, यांचे सहकार्य लाभले.



# माळेगाव यात्रेसाठी सहकार्याची भूमिका आवश्यक : खा चिखलीकर

## 10 ते 14 जानेवारी दरम्यान माळेगाव यात्रा भरणार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आपल्या नांदेड जिल्ह्यासह शेजारील कर्नाटक, तेलंगणा राज्यातील अनेक भक्तांचा ओढा हा माळेगावकडे असतो. असंख्य लोकांचे माळेगाव येथील खंडोबा कुलदैवत असून येथील जत्रा ही मागील अनेक वर्षांपासून भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र म्हणून ओळखल्या गेले आहे. याचबरोबर येथील यात्रेत असंख्ये भक्तांना करमणुकीसह वेगळा विरंगुळाही मिळतो. लहान-मोठे सर्वच यात्रेत आनंद घेतात. पूर्वापार परंपरेने ही यात्रा सुरू असून या यात्रेतील विविध उत्सवाला सकारात्मकतेने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्याची प्रशासकीय भूमिका अधिक महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले.

दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून नावलौकिक असलेली माळेगाव येथील यात्रा दिनांक 10 जानेवारी ते 14 जानेवारी दरम्यान भरणार आहे. या यात्रेच्या पूर्वतयारीसाठी स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेवून नियोजनाच्या दृष्टीने आज माळेगाव येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीस खासदार सुधाकर श्रृंगारे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय अधिकारी शरद मंडलीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, माळेगावच्या सरपंच कमलाबाई रुस्तुमराव धुळगंडे, प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंजूषा कापसे, पशुवैद्यकिय विभागाचे उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भुपेंद्र बोधनकर व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**पशुपक्षी बाजार व खरेदी विक्री :** सदर यात्रा ही जवळपास एक महिनाभर चालते. यात इथला जनावराचा बाजार हा सर्वदूर ओळखला जातो. यात घोडे, उंट, गाय, बैल, म्हैस, रेडे, गाढव, शेळया, मेंढया, कुत्रे आदी पशु पक्षी इतर राज्यातूनही लोक घेवून येतात. शासनाचा वन्य पशुपक्षांचा कायदा अंमलात आणल्यापासून कायद्याप्रमाणेच आता हा बाजार भरतो. कायद्यातील तरतुदीप्रमाणे या यात्रेतील इतर सर्व उपक्रम यशस्वी घेण्यासाठी योग्य ते नियोजन केले जाईल असे जिल्हा परिषदेच्यावतीने स्पष्ट करण्यात आले.

यात्रेच्या परंपरेप्रमाणे येथील पशुप्रदर्शन, शंकरपट याकडे भाविकांचा अधिक ओढा असतो. यासाठी खासदार सुधाकर श्रृंगारे व माझी सहमती आहे. पशुधनाच्या विविध स्पर्धेसह पशुपालकांचा, प्रगतशील शेतकऱ्यांचा, यात्रेत आपले कौशल्य दाखविणाऱ्या कलावंतांची अपेक्षा ही यात्रेच्या माध्यमातून खंडेरायाच्या दरबारात योग्य तो सन्मान व्हावा एवढीच अपेक्षा असते. यासाठी जिल्हा परिषदेने विशेष खबरदारी घेऊन प्रत्येकाच्या हक्काचे सन्मान हे त्या-त्या कार्यक्रमातच दिले जावेत याची विशेष काळजी घ्यावी, असे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी स्पष्ट केले.

येथील घोड्यांचा बाजार हे या यात्रेचे वैशिष्ट्ये आहे. यात्रेकरूंना त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कोरोनाचा एक दुसरा व्हेरिएंट आला असून त्याबाबत देशपातळीवर खबरदारी व काळजी घेतली जात आहे. अशा स्थितीत



आरोग्याशी तडजोड नको. यात्रेतील भाविकांसह सर्वांना पिण्याचे पाणी हे तपासणी करूनच दिले पाहिजे. याचबरोबर बाजारात विकल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांची वेळोवेळी तपासणी करून कसल्याही प्रकारची विषबाधा अथवा अनुचीत प्रकार होणार नाही याची खबरादारी घेण्याचे निर्देश खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी दिले. माळेगावसह माझ्या मतदारसंघातील असलेल्या गावांच्या विकास कामांना आजवर 50 कोटी रूपये एवढा निधी उपलब्ध करून देता आला याचे समाधान असल्याचे त्यांनी सांगितले.

यात्रेतील पावित्र्य, सामाजिक सलोखा, शांतता याबाबत कोणतीही तडजोड जिल्हा प्रशासनातर्फे केली जाणार नाही. यात्रेत कोणतेही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पोलीस विभाग दक्ष आहे. याचबरोबर माळेगावच्या ग्रामस्थही अधिक दक्षता घेतील, असा विश्वास प्रशासनातर्फे व्यक्त करण्यात आला.

यात्रेच्या सुरक्षेच्यादृष्टीने सुमारे 1 हजार 338 पोलीस कर्मचारी पोलीस विभागातर्फे नेमण्यात आले आहेत. यात 400 होमगार्ड आहेत.

यात्रेतील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षतेच्यादृष्टिने सीसीटीव्ही लावले जाणार आहेत. याचबरोबर अशा ठिकाणी हायमास्क लावले जाणार असून सीसीटीव्हीचे नियंत्रण हे पोलीस कक्षात ठेवण्यात आले आहे. यात्रेतील भक्ताच्या आनंद उत्सवाला सर्वाधिक प्राधान्य दिले गेले असून यात जर कोणी अडथळा अथवा गैरकृत्य केल्यास अशा संबंधीत व्यक्तींविरूद्ध तातडीने कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

10 जानेवारी ते 14 जानेवारी 2024 या पाच दिवसांच्या कालावधीत विविध महोत्सव व उपक्रमाचे आयोजन केले आहे. यात 10 जानेवारी रोजी देवस्वारी-मिरवणूक व विविध स्टॉल्सचे उद्घाटन, 11 जानेवारी रोजी कृषी प्रदर्शन, विविध स्पर्धा, पशु प्रदर्शन, 12 जानेवारी रोजी कुस्त्यांची दंगल, 13 जानेवारी रोजी लावणी व कलामहोत्सव, 14 जानेवारी कला महोत्सव व समारोप असे प्राथमिक नियोजन असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्यावतीने देण्यात आली.

# प्रत्येकाने आई-वडिलांची सेवा करावी : ह.भ.प. शंकर महाराज लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आईवडीलांचे स्थान हे जिवनात अतिशय महत्त्वाचे असून त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य असल्याचे हभप शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर यांनी सांगितले. पारडी येथे (दि.)२१.डिसेंबर २०२३ रोजी कै.पांडुरंग पाटील पवार यांच्या स्मरणार्थ श्री हभप शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर यांचा हरिकिर्तनाचा व गोडजेवणाचा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी श्री हभप शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर म्हणाले की,आई वडीलांची सेवा म्हणजे ईश्वर सेवा आहे. प्रत्येकांने आपल्या आई वडीलांची सेवा करावी.ईश्वराचे नाम घ्यावे. यावेळी संपुर्ण परिसर विठ्ठल नामाच्या गजरात,पांडुरंगाच्या नामस्मरणात किर्तनाने भाविक भक्त मंत्रमुग्ध होऊन गेला. हरि किर्तनाच्या कार्यक्रमानंतर गोडजेवणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी आमदार रोहिदास चव्हाण, शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.



मनोहर धोंडे, शिवसेनेचे संघटक एकनाथ दादा पवार, माजी नगराध्यक्ष सौ आशाताई रोहिदास चव्हाण, माजी जि प सदस्य विठ्ठलराव शेटकर, जि प सदस्य प्र. रंगनाथ राव भुजबळ, जिल्हा नियोजन समिती सदस्य नवनाथ (बापूसाहेब)रोहिदास चव्हाण,माजी सरपंच दिगांबर पाटील डिकळे,डी टी महामुने,शिवा संघटना उपाध्यक्ष साधू पाटील वडजे,सरपंच रामेश्वर पाटील,माजी सरपंच भिमराव पाटील शिंदे,व्हा.चेअरमन शिवाजी पाटील बुद्रुक,जेष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे,साहेबराव सोनकांबळे, बापू गायकर,संजय कहाळेकर,मोहन पाटील पवार,पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास सावळे,रमेश पाटील पवार,शिवराज दाढेल,प्रेस फोटोग्राफर विनोद महाबळे,टि के.दाढेल,सुलतान शेख,प्रदिप हटकर, दशरथ लिंबोटकर,माधव वंजारे, विनायक सेवनकर,विलास राठोड परिसरातील सरपंच,उपसरपंच,माजी सरपंच,चेअरमन,कै.पांडुरंग पाटील पवार यांचे सुपुत्र शिवराज पाटील पवार, भगवान पाटील पवार, गणेश पाटील पवार, पुतणे बालाजी संभाजी पाटील पवार, नातू गोविंद आनंदा पवार, नातेवाईक यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन मित्रांनीच केली तरुणाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** बडनेरा रेल्वे स्थानकापासून जवळच असलेल्या एका हॉटेलनजीक २७ वर्षीय तरूणाची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली. ही हत्या मृत तरूणाच्या दोन मित्रांनीच केल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपींच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. विक्रम पप्पू संगते (२७, रा. तिलकनगर, जुनी वसृती, बडनेरा) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणात आयुष नरेश मेश्राम (रा. प्रभात कॉलनी, बडनेरा) आणि लौकेश वीरेंद्र चौधरी (रा. गांधीनगर, बडनेरा) या आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मारेकरी आयुष आणि लौकेश हे विक्रमचे मित्र आहेत. एक महिन्यापूर्वी विक्रम आणि त्यांच्यात वाद झाला होता. हा वाद होण्यापूर्वी तिघेही सोबतच राहत होते. त्यांच्यात नंतर दुरावा निर्माण झाला होता. महिनाभरापुर्वी झालेल्या वादाचा वचपा काढण्यासाठी आरोपींनी विक्रमला बडनेरा रेल्वेस्थनका समोरील एका हॉटेल जवळ नेऊन त्याच्यावर चाकूने वार केले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर